CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
आसमंतसह
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | रविवार, १९ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १३० । पाने १२+८ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपले आचरण साधे, सोपे, सर्वांना समजेल असे मोकळेढाकळे असावे. बोलून ज्ञान प्रकट करण्यापेक्षा आचरण तसे हवे. आत्मपरीक्षण हवेच. दुसऱ्याला नावे ठेवताना तीन बोटे आपल्याकडे असतात याचे भान हवे.

**स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक



टाळ मृदंगाचा ध्वनी, अश्व धावले रिंगणी याची प्रचीती आज इंदापुरात आली. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या ३४१ व्या आषाढी वारीच्या पालखी सोहळ्यातील दुसरे गोल रिंगण कस्तुराबाई श्रीपती कदम विद्यालयाच्या मैदानावर अत्यंत उत्साह, भक्तिभाव आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाले. (छाया: नानासाहेब लोंढे)

### भारताची अंतराळात ऐतिहासिक झेप

# ‘विक्रम-१’चे यशस्वी प्रक्षेपण

### स्कायरूट एरोस्पेस कंपनीच्या ऑर्बिटल-क्लास रॉकेटला मिळाले यश



श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून विक्रम-१ च्या यशस्वी प्रक्षेपणानंतर स्कायरूट एरोस्पेसचे सीईओ पवन कुमार चंदना यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी मोबाईलवरून संवाद साधला

**श्रीहरीकोटा, १८ जुलै**

भारताच्या अंतराळ क्षेत्रासाठी शनिवारचा दिवस सुवर्णअक्षरांनी लिहिला जाणारा ठरला. हैदराबादच्या ‘स्कायरूट एरोस्पेस’ कंपनीने आंध्रप्रदेशातील इस्त्रोच्या श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून भारताचे पहिले खाजगी ऑर्बिटल-क्लास रॉकेट ‘विक्रम-१’ चे यशस्वी प्रक्षेपण केले. ‘आगमन’ या अभियानांतर्गत विक्रम-१ ला जमिनीपासून ४५० किमी उंचीवर पृथ्वीच्या खालच्या कक्षेत यशस्वीरीत्या स्थापित केले. खाजगी कंपनीकडून विकसित केलेले भारताचे हे पहिलेच रॉकेट आहे.

याच कंपनीने २०२२ मध्ये विक्रम-एस सबऑर्बिटल रॉकेट प्रक्षेपित केले होते, जे पृथ्वीपासून ८९.५ किमी उंचीपर्यंत पोहोचले होते. आता विक्रम-१ पृथ्वीपासून ४५० किमीच्या वर्तुळाकार खालच्या कक्षेत पोहोचले. या टप्प्यामुळे, खाजगीरीत्या कक्षीय प्रक्षेपण क्षमता प्राप्त करणारा भारत अमेरिका आणि चीननंतरचा तिसरा देश बनला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

> ही मोहीम देशातील तरुणांची प्रतिभा, नावीन्यता आणि उद्यमशिलतेचे प्रतीक आहे. २०२० मध्ये लागू झालेल्या अंतराळ क्षेत्रातील सुधारणांच्या सकारात्मक परिणामांना या मोहिमेने समोर आणले. मी कंपनीच्या सर्व संशोधकांचे अभिनंदन करतो.
> **- नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

## महत्त्वाचे

### नांदुरा रेल्वे स्थानकाचा कायापालट

**नांदुरा :** भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील नांदुरा रेल्वे स्थानकाचा १०.६३ कोटी रुपये खर्चून पुनर्विकास करण्यात आला आहे. या अत्याधुनिक स्थानकाचे लोकार्पण १७ जुलै रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. या कार्यक्रमात देशभरातील ७५ पुनर्विकसित रेल्वे स्थानके राष्ट्राला समर्पित करण्यात आले. नांदुरा रेल्वे स्थानकावर आयोजित मुख्य कार्यक्रमाला राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री संजय सावकारे, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार चैनसुख संचेती, नांदुरा नगराध्यक्ष मंगला मोरकर, माजी आमदार विजय शिंदे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनित अग्रवाल, सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संसदेचे पावसाळी अधिवेशन उद्यापासून

**नवी दिल्ली :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होणार आहे. विविध मुद्यांवरून सरकारला घेरण्याची भूमिका विरोधी पक्ष घेण्याची शक्यता असल्यामुळे हे अधिवेशन वादळी होईल असे दिसते. १३ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात सरकार सात विधेयके सादर करणार आहे, यात आयकर सुधारणा आणि वंदे मातरम् संबंधित विधेयकाचाही समावेश आहे. महिला आरक्षण तसेच मतदारसंघाच्या परिसीमनाबाबतचे विधेयक सरकार या अधिवेशनात मांडणार असल्याची चर्चा आहे, मात्र त्यासंदर्भात सरकारने अद्याप स्पष्टपणे काही सांगितले नाही. अधिवेशनातील कामकाज सुरळीत चालावे म्हणून सरकार रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावणार आहे. अधिवेशनाच्या दृष्टीने सरकारची भूमिका आणि व्यूहरचना ठरवण्यासाठी शुक्रवारी रालोआची बैठक झाली. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला गृहमंत्री अमित शाह आदी उपस्थित होते. ■

# राज्यभरात पावसाचा जोर वाढणार

**पुणे, १८ जुलै**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला तरी आता विदर्भात पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर या जिल्ह्यांमध्ये समाधानकारक बरसला. मात्र अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ येथेही हजेरी लावली. पुढील ४८ तासांत राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

झारखंड आणि उत्तर ओडिशाच्या परिसरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्याकडे मोठ्या प्रमाणात आर्द्रता येत आहे. ही प्रणाली वायव्य दिशेने सरकत असून, त्याचा परिणाम महाराष्ट्रातील पावसावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस राज्यात पावसासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे.

अरबी समुद्रातून येणाऱ्या मजबूत पश्चिमेकडील वाऱ्यांमुळे कोकणात व्यापक स्वरूपाचा मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

पुणे शहरात पुढील दोन दिवस हलका ते मध्यम आणि काही ठिकाणी तुरळक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मात्र, घाटमाथा आणि धरण परिसरात मध्यम ते काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. पावसासोबत मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता असल्याने पुढील ४८ तासांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यानंतर पुणे परिसरातील पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता आहे.

कोकण, घाटमाथा, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी पडण्याची शक्यता आहे. विदर्भातील काही भागांतही विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

हवामानशास्त्रज्ञ अनुराग कश्यपी यांच्या माहितीनुसार, पुढील ४८ तासांत राज्यात पावसाची शक्यता अधिक आहे. कोकणात व्यापक स्वरूपाचा मध्यम पाऊस, विदर्भातील अनेक जिल्ह्यांत बऱ्यापैकी व्यापक पाऊस, तर उर्वरित महाराष्ट्रात तुरळक पावसाची शक्यता आहे. पुण्यात तुरळक हलका पाऊस, तर मुंबईत १८ आणि १९ जुलै रोजी व्यापक स्वरूपाचा मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### भोंदू अशोक खरातविरुद्ध आरोपपत्र दाखल

**नवी दिल्ली, १८ जुलै**

आपण ईश्वराचा अवतार असल्याचे सांगून अनुयायांची फसवणूक आणि दोन सहकारी पतसंस्थांच्या माध्यमातून गुन्ह्यातून मिळालेला पैसा वैध केल्याचा आरोप करीत अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) विशेष न्यायालयात भोंदू अशोक खरातसह त्याची पत्नी आणि इतरांविरोधात मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात आरोपपत्र दाखल केले आहे. खरात पोलिस कोठडीत असताना ईडीने त्याला १९ मे रोजी अटक केली होती. मुंबईतील विशेष न्यायालयात शुक्रवारी आरोपपत्र दाखल करण्यात आले असून, त्यात खरात दाम्पत्यासह इतर चौघांना आरोपी करण्यात आले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# सहा बंडखोर खासदार शिवसेनेत विलीन

### लोकसभा अध्यक्षांचा निर्णय; उद्धव ठाकरेंना धक्का

**नवी दिल्ली, १८ जुलै**

उबाठा गटातून बंडखोरी केलेल्या सहा खासदारांच्या स्वतंत्र गटाला लोकसभा सचिवालयाने शिवसेनेत विलीन होण्यास शनिवारी अधिकृत मंजुरी दिली आहे. यासंदर्भात लोकसभा सचिवालयाने अधिकृत परिपत्रक जारी केल्यामुळे आता हे सहा बंडखोर खासदार तांत्रिक आणि कायदेशीरदृष्ट्या शिवसेनेचा अधिकृत भाग बनले आहेत. याव्यतिरिक्त, लोकसभा अध्यक्षांनी तृणमूलमधून फुटून एनसीपीआय स्थापन केलेल्या २० खासदारांना लोकसभेत स्वतंत्रपणे बसण्यासही मान्यता दिली आहे. तसेच एनसीपीआयला स्वतंत्र गटाचा दर्जा देण्यात आला आहे. या निर्णयामुळे उद्धव ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे.

काही दिवसांपूर्वी शिवसेना उबाठा गटातील खासदार संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर यांनी पक्षांतर्गत बंडखोरी करत स्वतःचा वेगळा गट स्थापन केला होता. या खासदारांनी लोकसभा अध्यक्षांकडे स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळवण्यासाठी आणि शिवसेनेत विलीन होण्यासाठी अधिकृत पत्र दिले होते.

**लोकसभेत शिवसेनेचे संख्याबळ वाढले**

अधिकृत मंजुरीमुळे बंडखोर खासदारांवर टांगती अपात्रतेची तलवार तात्पुरती दूर झाली आहे. लोकसभा अध्यक्षांच्या या निर्णयामुळे आता शिवसेनेच्या लोकसभेतील खासदारांची संख्या अधिकृतपणे १३ झालेली आहे. या गटाचे नेते म्हणून खासदार श्रीकांत शिंदे यांची घोषणा करण्यात आलेली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### श्रीरामाचा पुतळा उभारणाऱ्या हिंदूला अटक

**ढाका, १८ जुलै**

बांग्लादेशमध्ये प्रभू श्रीरामाची ८१ फूट उंच पुतळा उभारण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका हिंदू व्यक्तीला पोलिसांनी मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अटक केली. हरिदास चंद्र असे तरुणाचे नाव आहे. पोलिस कारवाईच्या विरोधात हिंदूंना संताप व्यक्त करत ढाका येथील नॅशनल प्रेस क्लबबाहेर जोरदार निदर्शने केली. एका कटाचा भाग म्हणून हरिदास यांना अटक केल्याचा आरोप अल्पसंख्यक नागरिकांनी केला.

कारवाईचा निषेध करण्यासाठी अल्पसंख्याक समुदायांनी (हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चन) शनिवारी ढाका येथे पोलिस आणि रहमान सरकारविरोधात जोरदार निदर्शने केली. बांग्लादेश हिंदू-बौद्ध-ख्रिश्चन ऐक्य परिषदेचे सरचिटणीस मनिंद्र कुमार नाथ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हरिदास चंद्र गायकबांधा जिल्ह्यातील पलाशबारी परिसरात प्रभू रामाचा पुतळा उभारत होते. ◂ (वृत्तसंस्था)

# संघ जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संघटना

### उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन् यांचे प्रतिपादन ● ‘आरएसएस १०० वर्षे, शतक संकल्पाचे’ पुस्तकाचे प्रकाशन




पुस्तक प्रकाशन करताना उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन्, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भाजपाचे नेते श्याम जाजू आणि दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष बीजेंद्र गुप्ता

**नवी दिल्ली, १८ जुलै**

गंगा ज्याप्रमाणे उगमाच्या ठिकाणी छोटी असते, मात्र नंतर ती विशाल रूप घेते, त्याप्रमाणे, रा. स्व. संघाचेही आहे. विनम्रपणे आपल्या कार्याची सुरुवात करत संघ आज जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संघटना झाली असल्याचे गौरवोद्‌गार उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन् यांनी काढले.

ज्येष्ठ भाजपा नेते श्याम जाजू आणि लेखक विचारवंत अनुपम त्रिवेदी यांच्या ‘आरएसएस १०० वर्ष, शतक संकल्पाचे’ या हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पुस्तकाच्या उपराष्ट्रपती भवनात झालेल्या प्रकाशन समारंभात राधाकृष्णन बोलत होते. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष वीजेंद्र गुप्ता, ज्येष्ठ संपादक आणि इंदिरा गांधी कला केंद्राचे अध्यक्ष रामबहादुर राय, रा. स्व. संघाचे उत्तर क्षेत्र संघचालक पवन जिंदल, लेखकद्वय श्याम जाजू आणि अनुपम त्रिवेदी तसेच प्रभात प्रकाशनचे प्रभातकुमार उपस्थित होते. एका तामीळ कवितेत रा. स्व. संघाची तुलना पवित्र गंगेशी करण्यात आली, याचा उल्लेख करत राधाकृष्णन म्हणाले की, गंगा नदीप्रमाणे संघही निः स्वार्थ भावनेने लोकांच्या कल्याणासाठी निरंतर काम करत आहे. संघाचा प्रवास हा देशाच्या सांस्कृतिक मूल्यांच्या मुळाशी जाण्याचा, गौरवशाली वारसा आणि परंपरांच्या पुनर्जागरणाचा तसेच सुदृढीकरण आणि पुनरुत्थापनेचा आहे. संघाच्या शाखांमधून चरित्रनिर्माण आणि नेतृत्व विकासाचे काम केले जाते, याकडे लक्ष वेधत राधाकृष्णन म्हणाले की, यासोबतच शाखा शिस्तीचे आणि वेळेच महत्व शारीरिक तंदुरुस्ती, संघटनशक्ती आणि समाज तसेच देशाबद्दलची कर्तव्यभावनाही जागृत करत असतात. लेखक श्याम जाजू यांनी पुस्तकामागची भूमिका विषद केली.

**संघ नेहमीच राष्ट्र प्रथम भावनेने काम करतो : राजनाथसिंह**

रा. स्व. संघाने नेहमीच राष्ट्र प्रथम, सदैव प्रथम भावनेने काम केले आहे, त्यामुळे संघ आज जगातील सर्वात मोठे स्वयंसेवी संघटन झाले आहे, असे आपल्या अध्यक्षीय भाषणात संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी म्हटले.

रा. स्व. संघाची तुलना आईच्या प्रेमाशी करत राजनाथसिंह म्हणाले की, आईचया प्रेमाला कोणते लायसन नसते. गुरुच्या संस्काराला कोणत्याही सरकारी मान्यतेची गरज नसते, मां गगेला वाहण्यासाठी सरकारी परवानगीची गरज नसते, त्याचप्रमाणे सूर्याला प्रकाश देण्यासाठी नोंदणी करावी लागत नाही. ◂ (तभा वृत्तसेवा)

## अंतरंग

३ व्याप्त काश्मिरात हस्तक्षेप करणार
४ युद्ध-आपत्तीमध्ये मानवरहित बचाव यंत्रणा (तंत्रवेध)
६ विश्वचषक विजेता स्पेन की अर्जेंटिना
८ ...तीन पोलिस कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा

# ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’ सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट

### राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर; कार्तिक आर्यन, मामुटी सर्वोत्कृष्ट अभिनेता

**नवी दिल्ली, १८ जुलै**

मराठी रंगभूमीवर गाजलेल्या नाटकाचे चित्रपटरूप असलेल्या दिग्दर्शक परेश मोकाशी यांच्या ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’ या चित्रपटाने यंदाच्या ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार पटकावला. सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार ‘आर्टिकल ३७०’ ला जाहीर झाला आहे.



भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेचे मानले जाणारे ७२ वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (२०२४) शनिवारी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाने जाहीर केले. यंदाच्या पुरस्कारांमध्ये मराठी चित्रपटसृष्टीने फीचर आणि नॉन-फीचर या दोन्ही विभागांत उल्लेखनीय कामगिरी करीत विविध मानाचे पुरस्कार आपल्या नावे केले. त्याचबरोबर हिंदी आणि प्रादेशिक भाषांमधील चित्रपटसृष्टीतील कलाकारांनीही अभिनय, दिग्दर्शन आणि तांत्रिक क्षेत्रातील प्रमुख पुरस्कार पटकावले.




फीचर फिल्म्स विभागात विवेक फिल्म्स आणि मयसभा करमणूक मंडळी एलएलपी निर्मित ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’ची सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट म्हणून निवड करण्यात आली. प्रभावी कथानक, उत्कृष्ट मांडणी आणि संवेदनशील दिग्दर्शनामुळे या चित्रपटाने राष्ट्रीय परीक्षकांची पसंती मिळवली.

**योगेश देशपांडे यांना पटकथा श्रेणीतील पुरस्कार**

मराठी चित्रपटसृष्टीला संगीत आणि लेखन क्षेत्रातही राष्ट्रीय स्तरावर मोठा गौरव मिळाला. ‘घरत गणपती’ चित्रपटातील ‘नवसाची गौरी माझी’ या गीतासाठी गायक अभय जोधपूरकर यांना सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. तसेच ‘स्वरगंधर्व सुधीर फडके’ या चरित्रपटासाठी योगेश देशपांडे यांना सर्वोत्कृष्ट रूपांतरित पटकथा या श्रेणीतील राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला.

**रणदीप हुड्डा सर्वोत्कृष्ट पदार्पण करणारा दिग्दर्शक**

‘भक्षक’साठी संजय मिश्रा यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. ‘श्रीकांत’ या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट पुरस्कार जाहीर झाला, तर रणदीप हुड्डा यांना ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पदार्पण करणारा दिग्दर्शक हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. ◂ (वृत्तसंस्था)

**यामी गौतम सर्वोत्कृष्ट अभिनेत्री**



अभिनय क्षेत्रातील प्रमुख पुरस्कारांमध्ये ‘चंदू चॅम्पियन’साठी कार्तिक आर्यन आणि ‘ब्रॅमायुगम’साठी मामुटी यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेता हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. तर ‘आर्टिकल ३७०’ या चित्रपटातील प्रभावी अभिनयासाठी यामी गौतम यांची सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून निवड जाहीर झाली. याच चित्रपटाला सर्वोत्कृष्ट फीचर फिल्म पुरस्कारही जाहीर झाला.

**नॉन-फीचर विभागातही मराठीचा ठसा**

नॉन-फीचर विभागातही मराठी चित्रपटांनी आपला ठसा उमटवला. ‘भंगार’ या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर फिल्म हा सर्वोच्च सन्मान तर ‘हमसफर’ या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट लघुचित्रपट पुरस्कार जाहीर झाला. ‘परत ४१ डिग्रीच्या मागावर’ या चित्रपटासाठी शिवपालसिंग कांग यांना सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शन पुरस्कार जाहीर झाला. तसेच ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’ला सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन पुरस्कार जाहीर झाला.

# समाजवादी विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन

**पुणे, १८ जुलै**

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, गांधीवादी कार्यकर्ते, लेखक आणि युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांचे शनिवार, १८ जुलै रोजी पुण्यात निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.



डॉ. सप्तर्षी यांना शनिवारी सकाळी अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना एरंडवणे येथील जोशी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांचे सुपुत्र डॉ. कबीर हे रविवारी लंडनहून पुण्यात दाखल होणार आहेत. त्यांचे पार्थिव सोमवारी सकाळी १० ते १२ या वेळेत गांधी भवन, कोथरूड येथे ठेवण्यात येणार असून, त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार करण्यात येईल. डॉ. सप्तर्षी यांनी १७ नोव्हेंबर १९६७ रोजी सिंहगडावर युवक क्रांती दलाची स्थापना केली होती. जयप्रकाश नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी बिहारच्या दुष्काळात मदतकार्य केले. १९७२ मध्ये मराठवाड्यातील दुष्काळग्रस्तांसाठी काम केले, तर १९७४ मध्ये राशिन येथे राशिन कम्युनची स्थापना केली. १९७८ मध्ये ते अहमदनगर शहर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले.

विद्यार्थी प्रश्न, कॅपिटेशन फी, दलितांना मंदिरप्रवेश, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आणि सामाजिक न्यायाच्या विविध आंदोलनांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. युवकांना सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे ठरले. त्यांना महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार, दमाणी साहित्य पुरस्कार, रणजित देसाई पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. ◂ (तभा वृत्तसेवा)

## महत्वाचे...



## हरि ओम संस्थेकडून वारकऱ्यांना महाप्रसाद वाटप

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

यंदाच्या वर्षी सुद्धा श्री शेगांव गजानन महाराजांची पूजा हरि संस्थेचे अध्यक्ष बालाजी जंगम यांचे हस्ते झाले. त्यानंतर पालखी बरोबर आलेले वारकऱ्यांना महाप्रसाद देण्यात आली. महाप्रसाद सोलापुरातील पूर्वभागातील पद्धतीने देण्यात आला. शेगाव गजानन महाराज सोलापूर जिल्हा संयोजक सुनील फाळके, सुनील कुलकर्णी, संजय क्षीरसागर यांचे संस्थेला नेहमी सहकार्य मिळते. यावेळी संस्थेचे पदाधिकारी इरण्णा चंशेट्टी, लक्ष्मीकांत दंडी, हिरालाल धुळम, संजीव नादरगी, अशोक यज्जा, अंबादास दिकोंडा, गणेश सिद्धांत, प्रकाश पल्ली उपस्थित होते. महाप्रसादाला जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल पद्मशाली शिक्षण संस्थेचे विशेषता सचिव दशरथ गोप यांचे आभार हरिओम संस्थेचे अध्यक्ष जंगम आणि व्यक्त केले.





## अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त वारकऱ्यांना फ्रेशअप किटचे वाटप

**सोलापूर, दि. १८ जुलै-**


राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे आणि माजी नगरसेवक गणेश पुजारी यांच्या वतीने देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त शेगावहून पंढरपूरकडे जाणाऱ्या संत शिरोमणी सद्गुरू गजानन महाराज पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांना फ्रेशअप किटचे वाटप करण्यात आले. दरम्यान, बुधवार पेठेतील श्राविका चौक येथे स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सोलापुरात आगमन झालेल्या संत शिरोमणी सद्गुरू गजानन महाराज यांच्या पालखीचे आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. यानंतर आनंद चंदनशिवे, उद्योजक सचिन कांबळे, माजी नगरसेवक गणेश पुजारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव इरफान शेख यांच्या वतीने फ्रेशअप किट वितरित करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, पी.बी. ग्रुपचे प्रमुख गौतम चंदनशिवे, चंद्रकांत सोनवणे, गौतम नागटिळक, ॲड. विशाल मस्के, आदित्य चंदनशिवे, पी.बी. ग्रुपचे अध्यक्ष प्रवीण शिंदे, बाबा गायकवाड, भैय्या कापुरे, प्रतीक चंदनशिवे उपस्थित होते.



## मोडनिंब येथे डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**मोडनिंब, दि. १८ जुलै-**

मोडनिंब (ता. माढा) येथे लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन करण्यात आले. प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बाबुराव सुर्वे, कैलास तोडकरी, मनसेचे प्रशांत गिड्डे,सदाशिव पाटोळे, बालाजी पाटील, दत्तात्रय सुर्वे,चांगदेव वरवडे,संतोष पाटील,डॉ.प्रशांत कोल्हे, राहुल पाटील,अमित कोळी, विजयसिंह गिड्डे, प्रमोद गाडे, डॉ. संजय लोखंडे, सोमनाथ माळी,अतुल गाडे, बाळासो ओहोळ, संजय पाटोळे उपस्थित होते. प्रसाद पाटोळे, विकास पाटोळे, विनायक खिलारे, अरुण जगताप, शेखर जाधव, धनाजी पाटोळे, सुनिल कसबे यांनी आयोजन केले.



## अण्णाभाऊ साठे यांना मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीकडून अभिवादन

**सोलापूर, दि. १८ जुलै-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, समितीचे अध्यक्ष साक्षांत लोखंडे, क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, ॲड. शैलेश पोटफफोडे, वैशाली डोलारे, मनोज लोंढे, लेखक किशोर जाधव, प्रवीण वाडे, विशाल लोंढे, सतीश बगाडे, गोविंद कांबळे, शंतीलाल साबळे आदी उपस्थित होते. अण्णाभाऊंचे साहित्य सामाजिक परिवर्तन, समता आणि न्यायाचा संदेश देणारे असून त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करावा, अशी मागणी समितीचे अध्यक्ष साक्षांत लोखंडे यांनी केली.

# प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात रंगला संत भेटीचा सोहळा

## संत भेटीच्या सोहळ्याने भारावले सोलापूरकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

पालखीच्या दर्शनाची भाविकांना लागलेली ओढ, टाळ - मृदुंगाचा अन 'जय जय रघुवीर समर्थ' चा अखंड गजर आणि पालख्यांची भेट होताच ज्ञानोबा - तुकोबांचा झालेला जयघोष अशा भक्तिमय वातावरणात शनिवारी सोलापुरात संत भेटीचा सोहळा रंगला. शेगावहून आलेली संत श्री गजानन महाराजांची पालखी आणि सम्राट चौकातील श्री सद गुरु प्रभाकर स्वामी महाराजांची पालखी या दोन्ही पालख्यांची भेट शनिवारी श्री सद गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात झाली.

संत श्री गजानन महाराजांची पालखी सोलापूर शहरात येताच सम्राट चौक येथील सदगुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात विसावली. आषाढी एकादशीनिमित्त शेगाव होऊन पंढरपूरला निघालेली शेगाव संस्थानची श्री संत गजानन महाराजांची पालखी श्री सदगुरू प्रभाकर महाराज मंदिरात येण्याचे हे ५३ वे वर्ष होते.

प्रारंभी सकाळी श्री सदगुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात पादुकांचे पूजन झाले. यानंतर पालखी सजवण्यात आली. तसेच पालखीचेदेखील पूजन झाले. हजारो भाविकांच्या उपस्थितीत दोन्ही पालख्यांची भेट झाल्यानंतर महाआरती करण्यात आली. श्री संत गजानन महाराजांचा आवडता पदार्थ असलेल्या पिठलं भाकरीचा नैवेद्य यावेळी दाखवला आला. यानंतर वारकरी बांधवांना तसेच सोलापुरातील भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू, मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे, ट्रस्टी उदय वैद्य, वसंतराव बंडगर, वामनराव वाघचौरे, कार्यकारणी मंडळातील सदस्य सुभाष बद्दूरकर, रवी गुंड, सम्राट राऊत, रमेश देशमुख, प्रभाकर कुलकर्णी, परशुराम व्हटकर, वेदांत कुलकर्णी, दत्तात्रय कुसेकर, प्रकाश कोथिंबीरे, मीनाताई जोशी मंदिराचे व्यवस्थापक निरंजन दंतकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**सुयोग्य नियोजनामुळे भाविकांना सुलभ दर्शन**

श्री सद गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टतर्फे यंदाच्यावर्षी दर्शनाचे उत्तम नियोजन करण्यात आल्यामुळे भाविकांना दर्शन सुलभ झाले. भाविकांनी या नियोजनाचे कौतुक केले.



**अडीच टन पिठलं आणि अडीच टन भाताचा महाप्रसाद**

संत भेटीच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना महाप्रसाद म्हणून अडीच टन पिठलं आणि अडीच टन भाताचा तसेच बुंदी, भाकरी, धपाटे, चपातीचा महाप्रसाद करण्यात आला होता. यावेळी सुमारे १० हजार भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला.



## माढ्यात अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १८ जुलै-**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५७ व्या पुण्यतिथीनिमित्त अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष गंगाराम पवार, डॉ. विकास मस्के, नगरसेवक अरुण कदम, उत्तम पवार, किरण पवार, कुंदन पवार, डॉ. क्षीरसागर, पवार, दत्त पवार, रोहिदास कदम मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष दर्शन कदम, उपाध्यक्ष विकी पवार, तेजस नवगिरे, शेखर कांबळे, निखिल पवार, अभिजीत पवार, सुमित थोरात, शंकर पवार आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## टेंभुर्णीजवळ उजनी जलवाहिनी फुटली; सोलापूरचा पाणीपुरवठा मात्र सुरळीत राहणार

### युद्धपातळीवर दुरुस्ती सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

उजनी धरणातून सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी टेंभुर्णी परिसरात शनिवारी फुटल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पाणी उपसा करणारे पंप तातडीने बंद करण्यात आले. सध्या संबंधित विभागाकडून जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून, काम पूर्ण होताच पाणीपुरवठा यंत्रणा पूर्ववत करण्यात येणार आहे.

महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जलवाहिनी फुटल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून पंप बंद करण्यात आले असले तरी शहरातील नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर कोणताही परिणाम होणार नाही. उपलब्ध पाणीसाठा आणि पूर्वनियोजनाच्या आधारे शहराला नियमित पाणीपुरवठा केला जाणार असल्याने नागरिकांनी चिंता करण्याचे कारण नसल्याचे मनपा सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी स्पष्ट केले आहे.

घटनास्थळी तांत्रिक पथक दाखल झाले असून, गळतीचे नेमके कारण शोधून जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करण्यात येत होते. महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी सांगितले की, उजनीहून सोलापूरकडे येणारी मुख्य पाण्याची जलवाहिनी टेंभुर्णी येथे फुटली आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून पंप बंद करण्यात आले आहेत. दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेतले असून, शहराच्या पाणीपुरवठ्यावर कोणताही व्यत्यय येणार नाही.

## 'सह्याद्री'मध्ये एम.फार्मसी मोफत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ जुलै-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे (ता.सांगोला) येथे एम.फार्मसी प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया अर्ज सुविधा केंद्र म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले यांनी दिली. या सुविधा केंद्रामध्ये बी.फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे एम.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेशकरिता ऑनलाईन अर्ज दि.१७ ते २७ जुलै दरम्यान स्वीकारले जाणार आहेत. मूळ कागदपत्रे पडताळणी, अर्ज निश्चिती दि.२७ जुलै पर्यंत होणार आहे. दि.३१ जुलै रोजी तात्पुरती व दि.६ ऑगस्ट रोजी अंतिम मेरिट लिस्ट लागणार आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पालक व विद्यार्थ्यांच्या असणाऱ्या विविध शंका व अडचणी याबाबत मोफत मार्गदर्शन या महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांमार्फत उपलब्ध होणार आहे असे विश्वस्त विश्वजीत इंगवले यांनी सांगितले. तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी प्रा.एस.एस.काळे (९८२२०४७२३६), डॉ.एस.ए.माळी (९७३९३६८५९०), प्रकाश पाटील (९८८१४३३६५८), पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.

## आर्यनंदी नगरातील रस्त्यांची दुरवस्था; तातडीने दुरुस्तीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

शहरातील सिक्युर हॉस्पिटलजवळील आर्य नंदी नगर परिसरातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, ड्रेनेज लाईनच्या कामासाठी रस्ते खोदून ठेवल्यानंतर त्यावर मुरूम अथवा अन्य कोणतीही तात्पुरती व्यवस्था न केल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सुमारे १,५०० लोकवस्ती असलेल्या या परिसरातील रस्ते पावसामुळे पूर्णपणे चिखलमय झाले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना वाढल्या असून, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना ये-जा करताना जीव धोक्यात घालावा लागत आहे. काही नागरिक जखमी झाल्याच्याही तक्रारी स्थानिकांकडून करण्यात आल्या आहेत. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतरही रस्त्यांवर साधा मुरूमदेखील टाकण्यात आलेला नाही. त्यामुळे परिसरातील दैनंदिन वाहतूक विस्कळीत झाली असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे



वातावरण आहे. आर्य नंदी नगरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. स्मार्ट सिटी म्हणून ओळख असलेल्या सोलापूर शहरात अशा मूलभूत सुविधांची झालेली दुरवस्था चिंताजनक असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.



## चरण सेवेच्या माध्यमातून चन्नवीर चिट्टे मित्र परिवारातर्फे वारकऱ्यांची सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

सोलापूर शहरात शेगावंच्या गजानन महाराजांच्या पालखीचे आगमन झाल्यानंतर परंपरेप्रमाणे दुपारी ती पालखी सम्राट चौक येथील प्रभाकर महाराज मंदिरात विसावली. तेथे गुरूभेट होवून प्रसाद घेवून वारकरयांनी थोडी विश्रांती घेतली. विश्रांती करणाऱ्या वारकरयांना मसाज देवून त्यांची 'चरण सेवा ' करण्याचा अनोखा उपक्रम यावेळी चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने राबविण्यात आला. मित्र परिवाराच्या वतीने याठिकाणी कांस्य थाळी मशीन्स उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. याशिवाय स्वयंसेवक तेल लावून वारकरयांच्या पायांची मसाज करत होते. थकलेल्या पावलांनी विश्रांती , सेवेतून भक्ती असा त्यांचा यातून उद्देश होता. या उपक्रमाचा अनेक वारकऱ्यांनी लाभ घेतला व समाधान व्यक्त केले. या उपक्रमासाठी प्रभाकर महाराज मंदिर ट्रस्टचेही मोलाचे सहकार्य लाभले. मंदिराचे ट्रस्टी उदय वैध यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या चरण सेवेत चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराचे श्रीनिवास दासरी , कल्याण करजगी, जगदीश नालवार, पप्पू क्षीरसागर, रवि शहापूरकर, सद्दाम कोसगीकर, सोमनाथ कलशेट्टी, गणेश गुल्लापल्ली, साईनाथ सज्जे, सागर अतनुरे, गुरूराज पदमगोंडा, सतिश पारेल्ली, करण हलसगी, श्रीनाथ संदुपटला, ओम जमादार, लक्ष्मीकांत बिराजदार, ओंकार होमकर , ऋतुराज वाघमोडे, सचिन घंटे, राजेश मंदकल, हणुमंत सुरवसे आदींनी सहभाग घेतला.

## मेहता प्रशालेत आषाढी एकादशीनिमित्त भक्तिरसाचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता माध्यमिक शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त तसेच आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला भव्य कीर्तन सोहळा शनिवारी सायंकाळी उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

याप्रसंगी सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप विकासबुवा दिग्रसकर (कीर्तनकार तथा शिक्षक, गोळवलकर विद्यालय, पुणे) यांनी आपल्या ओजस्वी वाणीने उपस्थित श्रोत्यांना भक्ती, नामस्मरण आणि संत विचारांचा संदेश



दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे तथा कीर्तनकार हभप विकासबुवा दिग्रसकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी प्रास्ताविक केले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने प्रशालेत आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कीर्तन सोहळ्यात हभप विकासबुवा दिग्रसकर यांनी संत रामदास, संत कबीर, संत दामाजी पंत, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या विचारांचा संदर्भ देत नामस्मरण, सदाचार, संस्कार आणि अध्यात्म यांचे महत्त्व प्रभावीपणे विशद केले. सर्वांनी भक्ती मार्ग स्वीकारला पाहिजे. कार्यक्रमास पालक, नागरिक, माजी विद्यार्थी, शिक्षक व भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. आभार पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर यांनी मानले.



## गुरुजन हे समाजात नेहमीच पूज्यनीय असतात : दत्तात्रय सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ जुलै-**

शिक्षक हा अखेर पर्यंत अध्यापनाचे काम प्रामाणिकपणे करतो. अनेक विद्यार्थी घडवतो. गुरुजन हे समाजात नेहमीच पूज्यनीय असतात असे प्रतिपादन माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी केले. सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक पतसंस्थेच्या वतीने वागदरी येथील एस.एस. शेळके प्रशालेतील पर्यवेक्षिका शैलशिल्पा जाधव याची आदर्श शिक्षक म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा सत्कार सिंहगड महाविद्यालयाच्या सभागृहात शाल, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते गौरविण्यात आले. शैलशिल्पा जाधव यांची ३३ वर्षे सेवा झाली असून सध्या त्या पर्यवेक्षिका म्हणून कार्यरत आहेत. जाधव यांच्या निवडी बद्दल संस्थेचे चेअरमन बसवराज शेळके, मल्लिनाथ शेळके सावकार, गुलाबराव पाटील, मल्लप्पा निरोळे, रवि वरनाळे, डॉ. वरनाळे, ग्रंथालय चळवळीतील नेते कुंडलिक मोरे, हरीदास रणदिवे, गुलाबराव पाटील, विनोद गायकवाड, वृषाली हजारे, दत्तात्रय बाबर यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी मुख्याध्यापिका राजेश्री शेळके उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक जनजागृतीचा महाउपक्रम

### सभापती चेतनसिंह केदार सावंत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यातील सर्व जि.प.प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये दि.२२ ते २४ जुलै या कालावधीत शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक जनजागृतीपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जि.प.शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.

या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जि.प.शिक्षण विभागाने सर्व गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक आणि प्राचार्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत असेही त्यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन इ.१ ली ते ५ वी, ६ वी ते ८ वी आणि ९ वी ते १२ वी अशा तीन गटांमध्ये करण्यात येणार आहे. स्पर्धांसाठी पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन, स्वच्छ भारत, विकसित भारत २०४७, आषाढी वारी, सामाजिक समता आणि शाश्वत विकास हे प्रेरणादायी विषय निश्चित करण्यात आले आहेत. दि.२२ जुलै रोजी शाळास्तरीय तर दि.२३ जुलै रोजी तालुकास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळा व विद्यार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात दि.२४ जुलै रोजी दुपारी २ वाजेपर्यंत शिक्षण विभागाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरणपूरक दृष्टिकोन आणि राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करण्यास निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन जि.प.शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# व्याप्त काश्मिरात हस्तक्षेप करणार

## संयुक्त राष्ट्राने घेतली आंदोलनाची दखल | पाकिस्तान सरकारला फटकारले | नेत्यांची अटक, इंटरनेट बंदीवर आक्षेप

**संयुक्त राष्ट्र, १८ जुलै**

जुलमी पाकिस्तानी सरकार आणि लष्कराच्या अत्याचाराविरोधात गेल्या महिनाभरापासून व्याप्त काश्मिरात अवामी ॲक्शन कमिटीच्या (जेएएसी) नेतृत्वात सुरू असलेल्या आंदोलकांवर बेछूट गोळीबार आणि बळाचा वापर केल्याच्या अमानवीय कृत्याची संयुक्त राष्ट्र संघाने दखल घेतली. व्याप्त काश्मिरातील हिंसाचाराची चौकशी करणार असल्याचे संयुक्त राष्ट्र संघाने म्हटले आहे.

याशिवाय आंदोलन चिरडणाऱ्या पाकिस्तानी सरकारला फटकारत तत्काळ अटक केलेल्या आंदोलकांना मुक्त करण्याचे आणि इंटरनेटवरील बंदी उठवण्याच्या सूचना केल्या. व्याप्त काश्मीरमधील हिंसाचारावर संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्त वोल्कर तुर्क यांनी शनिवारी प्रसिद्धीपत्रक जारी केले. त्यात म्हटले की, निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर व्याप्त काश्मीरात सुरू असलेल्या नागरिकांवरील अत्याचाराच्या घटना गंभीर असून,




संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्त वोल्कर तुर्क

आम्ही याचा तीव्र निषेध करतो. आंदोलकांच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी, अटक केलेल्या जेएएसी नेत्यांना कायदेशीर हक्क प्रदान करणे, इंटरनेट सेवा पूर्ववत करणे आणि स्थानिक तक्रारींचे निवारण करण्यासाठी सर्वसमावेशक राजकीय संवाद सुरू करण्याच्या सूचना पाकिस्तानी सरकारला केल्या आहेत. आंदोलकांवर करण्यात आलेल्या गोळीबाराची मानवाधिकार आयोग चौकशी करेल आणि जबाबदार असलेल्यांवर कारवाईची शिफारस केली जाईल. लोकशाही असलेल्या भागात आंदोलन दडपणे मानवाधिकारांचे उल्लंघन आहे. नागरिकांच्या मागण्यांची दखल न घेणे अमानवीय प्रकार आहे. नागरी समाज संघटनेला गुन्हेगार ठरवणे आणि सार्वजनिक मेळाव्यांवर कठोर निर्बंध लादणे, हे नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे उल्लंघन आहे.

**नागरी हक्कांबाबत चिंता**

टर्क यांनी म्हटले की, अटक केलेल्या जेएएसी नेत्यांना कायदेशीर मदत आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्याची संधी दिली पाहिजे. शिवाय त्यांच्या निष्पक्ष सुनावणी आणि योग्य प्रक्रियेच्या हक्कांची पूर्णपणे हमी देणे गरजेचे आहे. या प्रदेशात इंटरनेट सेवांवर लादलेल्या निर्बंधांबद्दलही चिंता व्यक्त करताना त्यांनी म्हटले की, या प्रदेशात इंटरनेट बंद केल्याने लोकांच्या माहिती मिळवण्याच्या, सामायिक करण्याच्या आणि व्यक्त करण्याचे हक्क हिरावले गेले. चिरस्थायी शांतता आणि स्थिरतेचा मार्ग केवळ संवाद आणि लोकशाही प्रक्रियेतूनच मिळू शकतो. ◂ (वृत्तसंस्था)

### मृत्यूंची निष्पक्ष चौकशी करावी

आंदोलकांवर बेछूट गोळीबार करणे नागरिकांचा आवाज चिरडण्याचा प्रकार आहे. सर्व मृत्यूंची त्वरित, सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोग या प्रकरणाची चौकशी करून जबाबदार असलेल्यांवर कारवाईची शिफारस करेल. आंदोलक आणि सुरक्षा दल या दोघांच्याही मृत्यूच्या परिस्थितीची पारदर्शक चौकशी होणे गरजेचे आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांवर दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत केलेल्या कारवाईवरही वोल्कर तुर्क यांनी आक्षेप घेतला.

### भारताकडून निषेध

व्याप्त काश्मीरमधील आंदोलनांसंदर्भात, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले की, काश्मीरमध्ये सुरू असलेली आंदोलने ही पाकिस्तानकडून सुरू असलेले शोषण, मूलभूत हक्कांचे उल्लंघन आणि प्रशासकीय हस्तक्षेपाचा थेट परिणाम आहे. स्थानिक लोकांच्या रास्त तक्रारींचे निराकरण करण्याऐवजी, पाकिस्तानी सरकारने अत्यंत क्रूर कारवाई करून प्रतिसाद दिला. आम्ही आंतरराष्ट्रीय समुदायाकडून अपेक्षा करतो की, या गंभीर उल्लंघनांसाठी आणि गैरकृत्यांसाठी पाकिस्तानला जबाबदार धरावे.

# युक्रेनच्या हल्ल्याने मॉस्को हादरले

## तेल डेपो, ऊर्जा केंद्रांवर ड्रोनचा मारा, १४ नागरिक ठार, ३५ जखमी



**कीव्ह, १८ जुलै**

युक्रेनने शनिवारी पहाटे रशियाची राजधानी मॉस्को शहराला लक्ष्य करीत अडीचशेपेक्षा अधिक लांब पल्ल्याच्या ड्रोनने मारा केला. यात तीन तेल डेपो, सहा वीज प्रकल्प आणि अनेक गोदामे उद्ध्वस्त झाली. युक्रेनच्या हल्ल्यात १४ नागरिकांचा मृत्यू आणि ३५ पेक्षा अधिक जखमी असल्याची माहिती रशियाच्या संरक्षण विभागाने दिली. नागरी भागांत केलेल्या हल्ल्याचा त्यांनी निषेध केला आणि जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल असा इशाराही दिला.

मॉस्कोजवळील एका लॉजिस्टिक्स गोदामावरील हल्ल्यात सात कर्मचारी ठार झाले आणि इतर अनेक जण जखमी झाले. रशियन अधिकाऱ्याने सांगितले की, मॉस्कोच्या आग्नेयेला असलेल्या तांबोव प्रदेशातील कोटोव्स्क शहरातील तेल डेपो आणि वीज प्रकल्पाला आग लागली. याच भागात निवासी इमारतींवर ड्रोन धडकल्याने इमारतींचे मोठे नुकसान झाले. सध्या बचाव कार्य सुरू असून, २५ जखमींना रुग्णालयात हलवण्यात आले.

वीज प्रकल्पातील काम बंद करण्यात आले, यामुळे अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. तांबोवचे गव्हर्नर येवगेनी परविशोव्ह यांनी सांगितले की, रशियाची सर्वांत मोठी ऑनलाइन रिटेल कंपनी 'वाइल्डबेरीज'च्या मालकीच्या गोदामावर हल्ला झाला. सर्व मृत कामगार रात्र पाळीत काम करत होते.

रशियन हवाई संरक्षण यंत्रणेने २८ युक्रेनियन ड्रोन त्यांच्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यापूर्वीच पाडले. मॉस्को प्रदेशाचे गव्हर्नर आंद्रेई वोरोब्योव्ह यांनी हल्ल्त्या वृत्ताला दुजोरा देताना तेल डेपो आणि वीज प्रकल्पाचे नुकसान झाल्याचे सांगितले.

**हवाईतळ लक्ष्य**

झेलेन्स्की यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, युक्रेन सैन्याने रशियाच्या ८०० किलोमीटर आत घुसून तेथील हवाई तळावर हल्ला केला. यात टीयू-९५ बॉम्बर विमान उद्ध्वस्त करण्यात आले. अझोवच्या समुद्रात १०० हून अधिक तेल टँकर आणि जहाजांवर हल्ले करण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

### रशियाचे जोरदार प्रत्युत्तर

युक्रेनच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत रशियाच्या वायुदलाने काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या मायकोलाइव्ह बंदरावर आणि ओडेसा शहरावर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात बंदरावरील पायाभूत सुविधा उद्ध्वस्त झाल्या. या हल्ल्यात १८ नागरिकांचा मृत्यू आणि ५५ जखमी असल्याची माहिती युक्रेनच्या संरक्षण विभागाने दिली आहे. मालवाहू जहाजांचेही नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी रशियाच्या हल्ल्याचा निषेध केला. त्यांनी सांगितले की, आमच्या सैन्याने रशियातील अनेक तेल शुद्धीकरण प्रकल्प लक्ष्य केले.

# कैलास मानसरोवर यात्रेला भूस्खलनाचा अडथळा

**पिथौरागढ, १८ जुलै**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना पिथौरागढमध्ये कैलास मानसरोवर यात्रा मार्गावर भूस्खलन झाल्याने भाविकांचा चौथा गट धारचुला येथेच अडकला आहे. पूरस्थिती आणि भूस्खलनामुळे राज्यातील १८ मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले.

रुद्रप्रयागमध्ये केदारनाथ पायी मार्गावरही अनेक ठिकाणी भूस्खलन झाले, मात्र प्रशासनाने रस्ता मोकळा केल्याने पायी यात्रा पुन्हा सुरू झाली.

पिथौरागढ जिल्ह्यात गर्भाधारजवळ भूस्खलन झाल्याने कैलास मानसरोवर यात्रा मार्गावर मोठ्या प्रमाणात ढिगारे आणि खडक आले. यामुळे वाहतूक पूर्णपणे थांबली. त्यामुळे भाविकांचा चौथा गट धारचुला येथे थांबवण्यात आला. रस्ता उघडल्यानंतरच भाविकांना गुंजीसाठी रवाना केले जाईल, अशी माहिती राज्य आपत्ती प्राधिकरणाने प्रसिद्धीपत्रकातून दिली आहे. कैलास मानसरोवर मार्गासह राज्यातील १८ मार्ग भूस्खलनामुळे बंद आहेत.

**ढिगारा हटवण्याचे युद्धपातळीवर काम**

जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन विभाग आणि 'बीआरओ'चे पथक कैलास मानसरोवर मार्गासह इतर रस्त्यांवरील ढिगारे हटवण्यासाठी युद्धपातळीवर काम करीत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# गोदावरी नदीत पाच मासेमारांचा मृत्यू

**पोलावरम, १८ जुलै**

आंध्रप्रदेशातील पोलावरम जिल्ह्यात शनिवारी गोदावरी नदीत मासेमारी करताना पाच जणांचा बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. ही घटना येतापाका मंडळातील गुम्मा कोठागुडेम गावाजवळ सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली.

१० जणांचा एक गट मासेमारी करण्यासाठी नदीत उतरला होता. त्यापैकी पाच जण खोल पाण्यात गेले आणि बुडून मरण पावले. ते एकमेकांचे हात धरून आणि कपडे व जाळ्यांचा वापर करून मासेमारी करत होते, असे पोलिसांनी सांगितले. नदीतील पाण्याची पातळी जास्त नसतानाही खोल पाण्यात उतरल्यामुळे हा अपघात घडला. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'द ओडिसी'मध्ये नोलन यांची सिनेमॅटिक जादू



**मुंबई :** होमर नावाचा व्यक्ती प्रत्यक्षात कधी अस्तित्वात होता की नाही, यावर आजही इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. होमरनेच 'ओडिसी' हे महाकाव्य लिहिले की नाही, याचाही ठोस पुरावा उपलब्ध नाही. मात्र, जगप्रसिद्ध दिग्दर्शक ख्रिस्तोफर नोलन यांनी याच अमर महाकाव्यावर आधारित 'द ओडिसी' हा चित्रपट प्रेक्षकांसमोर आणला असून, तो अखेर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. हा चित्रपट पाहिल्यानंतर मार्टिन स्कॉर्सेसी यांच्या लोकप्रिय मीममधील 'धिस इज सिनेमा!' ही भावना मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. प्राचीन ग्रीसमधील सर्वांत मोठ्या पौराणिक कथांपैकी एक असलेल्या 'ओडिसी'ची तुलना नेहमीच भारतीय महाकाव्य 'महाभारता'शी केली जाते. ख्रिस्तोफर नोलन यांच्या 'द ओडिसी'मध्ये ट्रोजन वॉरनंतर ग्रीसमधील महान योद्धा ओडिसियसच्या (मॅट डेमन) घरवापसीचा प्रवास केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे.

### तुला अक्कल आहे का ?

**मुंबई :** श्रेयस तळपदे जवळचा मित्र असून, त्याच्या विश्वासामुळेच 'सनई चौघडे' हा चित्रपट साकारला, असे एका मुलाखतीत सुबोध भावेने सांगितले. या चित्रपटाच्या मुहूर्तावेळी घडलेला प्रसंग फार कमी लोकांना



माहिती असल्याचेही त्याने सांगितले. सुबोध म्हणाला, सुभाष घई आणि तत्कालीन सांस्कृतिक मंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते 'सनई चौघडे'चा मुहूर्त झाला होता. त्या मुहूर्ताला मी गेलो होतो. मात्र, त्यावेळी मी अत्यंत ढगळा शर्ट घालून गेलो होतो. मुहूर्ताचा कार्यक्रम झाल्यानंतर त्याच दिवशी रात्री सुबोध भावेचे 'सखी' या चित्रपटाचे शूटिंग फिल्मसिटीत सुरू होते. त्याचवेळी अचानक राजीव पाटील आणि पुष्पांग गावडे हे दोघे कोणतीही कल्पना नसताना तिथे आले. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून काहीतरी गडबड असल्याचे सुबोधला जाणवले. सुबोधने पुढे सांगितले, ब्रेकमध्ये मी त्यांना बाजूला घेतले. त्यांनी मला सांगितले की, पॅकअप झाल्यानंतर तुला श्रेयसने घरी बोलावले आहे. त्यानंतर मी रात्री साडेअकरा-बारा वाजता श्रेयसच्या घरी गेलो. श्रेयस तळपदेने त्यावेळी सुबोधला विचारले, तुला काय अक्कल आहे का? कसा येतोस तू मुहूर्ताला? यावर सुबोधने काय झाले, असे विचारले असता श्रेयसने त्याच्या ढगळ शर्टवर नाराजी व्यक्त केली.

### गोविंदा सात वर्षांनंतर करणार 'कम बॅक'

**मुंबई :** बॉलिवूडचा 'हिरो नंबर वन' म्हणून ओळखला जाणारा



अभिनेता गोविंदा तब्बल सात वर्षांच्या मोठ्या ब्रेकनंतर रूपेरी पडद्यावर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्याच्या आगामी 'रूपा' या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. नुकतीच गोविंदाने या चित्रपटाची अधिकृत माहिती दिली. एकीकडे संपूर्ण सिनेसृष्टी गोविंदाच्या या 'नव्या इनिंग'चे स्वागत करत असताना, दुसरीकडे त्याला घरातूनच एका अनपेक्षित प्रतिक्रियेला सामोरे जावे लागले आहे. गोविंदाच्या कमबॅकवर त्याची पत्नी सुनीता आहुजा यांनी व्यक्त केलेली नाराजी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. नवऱ्याच्या एवढ्या मोठ्या करिअरच्या टप्प्यावर सुनीता यांनी दिलेली थेट प्रतिक्रिया पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. मात्र, या नाराजीमागे कोणताही कौटुंबिक वाद नसून मुलगा यशवर्धन आहुजा याच्या बॉलिवूड पदार्पणाशी संबंधित कारण असल्याचे समोर आले आहे.

# भारत-नेपाळदरम्यान मालगाडी सेवा

## कोलकाताहून बिराटनगरला प्रथमच पोहोचली मालगाडी



**काठमांडू, १८ जुलै**

भारत आणि नेपाळ दरम्यान वाहतूक आणि रेल्वे संपर्क वाढवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हणून दोन्ही देशांमध्ये थेट मालगाडी सेवा सुरू करण्यात आली आहे. कोलकाता ते बिराटनगरदरम्यान धावणारी पहिली मालगाडी सेवा शुक्रवारी सुरू झाली. ही माहिती नेपाळमधील भारताचे राजदूत नवीन श्रीवास्तव यांनी दिली. ही रेल्वे सेवा नेपाळच्या वाहतूक आणि व्यापार लॉजिस्टिक्समधील एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते.


नेपाळ-भारत वाहतूक करारानुसार तिसऱ्या देशांकडून आयात केलेला माल भारतीय हद्दीतून नेपाळच्या सीमेपर्यंत नेला जातो. हा करार नेपाळला तिसऱ्या देशांकडून आयात आणि निर्यातीसाठी भारतीय रस्ते, रेल्वे आणि अंतर्गत जलमार्गांचा वापर करण्याची परवानगी देतो.

**पूर्वी केवळ बिरगंजपर्यंतच पोहोचत असे माल**

आतापर्यंत, 'ट्रान्झिट ट्रिटी'नुसार रेल्वे मालवाहतुकीला फक्त बिरगंज आयसीपीपर्यंतच जाण्याची परवानगी होती. तथापि, गतवर्षी नोव्हेंबरमध्ये भारताच्या केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाने इलेक्ट्रॉनिक कार्गो ट्रॅकिंग सिस्टिमच्या नियमांमध्ये सुधारणा केली. त्यामुळे कोलकाता, हल्दिया आणि विशाखापट्टणम् बंदरांमधून होणाऱ्या रेल्वे मालवाहतुकीची व्याप्ती वाढली. ◂ (वृत्तसंस्था)

### लॉजिस्टिक्सचा खर्च होणार कमी, वेळही वाचणार

नेपाळी अधिकाऱ्यांच्या मते, या सुधारणेमुळे रेल्वे मालवाहतुकीची व्याप्ती वाढली आहे. त्यामुळे नेपाळसाठी असलेला माल रेल्वेमार्गे बिराटनगर कस्टम्सपर्यंत नेण्याची परवानगी मिळाली आहे. या नवीन व्यवस्थेमुळे लॉजिस्टिक्सचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. रस्त्याने मालवाहतुकीपेक्षा रेल्वेने माल वाहून नेणे स्वस्त आहे. व्यापार विश्लेषकांच्या मते, विशाखापट्टणम् ते बिराटनगर आयसीपीपर्यंत थेट मालवाहतुकीमुळे लॉजिस्टिक्सचा खर्च अंदाजे १५ ते २० टक्क्यांनी कमी होण्याची अपेक्षा आहे. सध्या, विशाखापट्टणम् ते बिरगंजपर्यंतचा माल पुन्हा ट्रकमध्ये भरून बिराटनगरला न्यावा लागतो. यामुळे खर्चासोबतच व्यापाऱ्यांचा वेळही वाढतो.



मध्यप्रदेशातील भोपाळ येथे शनिवारी नाटकाचे सादरीकरण करताना कलावंत

# तिकीट नसले तरीही, भरपाई द्यावीच लागेल

## सर्वोच्च न्यायालयाचा रेल्वेला आदेश, उच्च न्यायालयाचा निकाल रद्द

**नवी दिल्ली, १८ जुलै**

रेल्वे अपघातात मृत पावलेल्या प्रवाशाकडे तिकीट नसणे हे त्याच्या कुटुंबाला भरपाई नाकारण्याचे कारण असू शकत नाही. एखाद्या प्रवाशाकडे

तिकीट नसले आणि रेल्वे अपघातात त्याचा मृत्यू झाल्यास भरपाई द्यावीच लागेल, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. यासोबतच याप्रकरणी रेल्वे दावा न्यायाधिकरण आणि मध्यप्रदेश उच्च न्यायालयाने दिलेला निकाल रद्द करत पीडित महिलेला आठ लाख रुपयांची भरपाई देण्याचा आदेश दिला.

न्या. संजय करोल आणि न्या. एन. कोटेश्वर सिंह यांच्या न्यायासनाने याप्रकरणावर सुनावणी घेतली. रेल्वेगाड्यांमधील प्रचंड गर्दी हे अपघातांचे एक प्रमुख कारण आहे. रेल्वेकडे सुरक्षा आणि गर्दी व्यवस्थापनाचे नियम आहेत, परंतु त्यांची योग्य अंमलबजावणी करणे हे एक आव्हान आहे. रेल्वेमधील कर्मचाऱ्यांची संख्या वाढवल्यास सुरक्षा सुधारेल आणि तरुणांना रोजगार मिळेल असेही न्यायासनाने नमूद केले. २०१५ मध्ये धावत्या ट्रेनमधून पडून मृत पावलेल्या व्यक्तीची पत्नी लता यांना आठ लाख रुपयांची भरपाई देण्याचा आदेश दिला. यापूर्वी, न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालयाने महिलेचा दावा फेटाळला होता. अपघातानंतर तिकीट नव्हते आणि त्यामुळे त्याला वैध प्रवासी मानले जात नाही असे आदेशात म्हटले होते. ◂ (वृत्तसंस्था)

# तुम्ही निष्ठुर, डॉक्टर पदवी काढून टाका

## उपचार नाकारणाऱ्याला न्यायालयाने फटकारले



**नवी दिल्ली, १८ जुलै**

अल्पवयीन बलात्कार पीडिता तुमच्यासमोर आणली गेली आणि तुम्ही इतके निर्दयी वागलात की, तिला वैद्यकीय मदत दिली नाही. जर तुमच्यात थोडीही संवेदनशीलता असती, तर तुम्ही तिला स्वतःहून रुग्णालयात नेले असते. तुम्ही निष्ठुर डॉक्टर आहात, तुमच्या नावासमोरील डॉक्टर पदवी काढून टाका, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाने उपचार नाकारणाऱ्या डॉक्टरला फटकारले.

मार्च महिन्यात गाझियाबादमध्ये बलात्कार झालेल्या एका मुलीवर वैद्यकीय उपचार नाकारणाऱ्या डॉक्टरच्या कृतीवर सर्वोच्च न्यायालयाने चांगलेच ताशेरे ओढले. बलात्कार आणि हत्येची बळी ठरलेल्या चार वर्षांच्या मुलीच्या वडिलांनी तपास आणि वैद्यकीय प्रतिसादातील गंभीर त्रुटींकडे लक्ष वेधणारी याचिका दाखल केली होती. त्यावर सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने सुनावणी घेतली.

जेव्हा आम्ही दंड ठोठावू, तेव्हा त्याचा मोठा परिणाम दिसून येईल. ती रक्कम पीडितेची भरपाई आणि कुटुंबाला मिळणारी वाजवी नुकसानभरपाई असेल. तुम्ही अत्यंत निष्ठुरपणे वागला आहात, असे सरन्यायाधीशांनी नमूद केले. १६ मार्च रोजी घडलेल्या या घटनेत, मुलीच्या वडिलांच्या अनुपस्थितीत शेजारी राहणारा एक व्यक्ती चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून पीडितेला घेऊन गेला. बराच वेळ उलटल्यानंतर शोध घेतला असता मुलगी रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत आढळली. दोन खासगी रुग्णालयांनी तिला दाखल करून घेण्यास नकार दिल्यानंतर अखेर गाझियाबाद जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. डॉक्टरांनी संवेदना दाखवली असती तर, पीडिता बचावली असती, मात्र तुम्ही निष्ठुरतेचा कळस गाठला, असा संताप न्यायसयाने व्यक्त केला. यापूर्वी एप्रिल महिन्यातही सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दोन खासगी रुग्णालये आणि स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत खडे बोल सुनावले होते. ◂ (वृत्तसंस्था)

# शाळेच्या वसतिगृहात १५० विद्यार्थिनींना विषबाधा

**सुरेंद्रनगर, १८ जुलै**

गुजरातच्या सुरेंद्रनगर जिल्ह्यात चुडा तालुक्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात भोजनातून विषबाधा झाली.शिळे अन्न खाल्ल्यामुळे सुमारे १५० मुलींना जुलाबाचा त्रास होऊ लागला. त्यानंतर त्यांना उपचारासाठी चुडा, लिंबडी आणि सुरेंद्रनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

बाधित मुलींच्या पालकांनी सांगितले की, त्यांच्या दोन मुली चुडा येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या वसतिगृहात राहतात. त्यांना रात्रीच्या जेवणात शिळे अन्न देण्यात आले होते. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांना पोटदुखी, जुलाब आणि उलट्यांचा त्रास होऊ लागला. तेथील चुडा रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांना सुरेंद्रनगर येथील गांधी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती खालावलेली असून, त्यांना सतत उलट्या होत आहेत. त्यांना वारंवार शौचालयास जावे लागते. या घटनेबाबत आरोग्य अधिकारी डॉ. बी. जी. गोहिल यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची प्रकृती आता ठीक आहे. त्यांनी रात्री खीर, भाजी आणि भाकरी खाल्ली होती. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# युद्ध-आपत्तीमध्ये मानवरहित बचाव यंत्रणा

**तंत्रवेध**

**डॉ. दीपक शिकारपूर**

आजपर्यंत युद्ध, नैसर्गिक आपत्ती किंवा समुद्रातील दुर्घटना यामध्ये जीव वाचवण्यासाठी नेहमीच माणसालाच धोक्यात जावे लागत असे. एखादे विमान कोसळले, जहाज बुडाले किंवा भूकंपामुळे लोक अडकले तर बचाव पथके स्वतःचा जीव धोक्यात घालून मदत करत असत. मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित यंत्रणा आणि रोबोटिक्स यांच्या संगमामुळे हे चित्र झपाट्याने बदलत आहे. उद्याच्या जगात माणूस निर्णय घेईल, पण सर्वात धोकादायक ठिकाणी सर्वप्रथम पोहोचतील ती मानवरहित यंत्रे! याचे एक ऐतिहासिक उदाहरण नुकतेच जगासमोर आले. होर्मुझ सामुद्रधुनीजवळ एक लष्करी हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाले. दोन सैनिक समुद्रात अडकले होते. अशा वेळी बचावासाठी दुसरे हेलिकॉप्टर किंवा जहाज पाठवण्याची अपेक्षा होती. परंतु घटनास्थळी पोहोचले ते सुमारे चोवीस फूट लांबीचे स्वयंचलित नौकायान. या नौकेने कोणत्याही चालकाविना समुद्रात अडकलेल्या सैनिकांचा शोध घेतला आणि सुरक्षितपणे बाहेर काढले. लष्करी इतिहासातील ही पहिली अशी घटना होती, जिथे पूर्णपणे स्वयंचलित नौकेने प्रत्यक्ष बचाव मोहीम यशस्वी केली. या तंत्रज्ञानामागे भारतीय वंशाचे अभियंता विभव आळतेकर यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. भारतीय बुद्धिमत्ता आज केवळ माहिती तंत्रज्ञानापुरती मर्यादित नसून ती जागतिक सुरक्षाव्यवस्थेच्या नव्या अध्यायालाही दिशा देत आहे, याचा हा अभिमानास्पद पुरावा आहे. या घटनेचे महत्त्व केवळ दोन सैनिकांचे प्राण वाचवण्यात नाही. खरा बदल म्हणजे बचाव आणि युद्ध व्यवस्थापनाच्या संपूर्ण तत्त्वज्ञानात होत असलेली क्रांती. भविष्यात संकटाच्या ठिकाणी सर्वप्रथम माणूस नव्हे तर यंत्र पाठवले जाईल. त्यामुळे मानवी जीवितहानी कमी होईल, निर्णय अधिक वेगाने घेतले जातील आणि मोहिमांची यशस्वीता वाढेल.

आज युद्धाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. पूर्वी रणांगणावर सैनिक, रणगाडे आणि लढाऊ विमाने दिसत असत. आता त्यांची जागा स्वयंचलित ड्रोन, बुद्धिमान रोबो आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली घेत आहेत. भविष्यात समुद्रातील खाणी शोधणे, शत्रूच्या क्षेत्रात प्रवेश करणे, जखमी सैनिकांना बाहेर काढणे किंवा विषारी वातावरणात मदतकार्य करणे ही सर्व कामे मानवरहित यंत्रांद्वारे केली जातील. सायबर युद्ध आणि डिजिटल गुप्तहेरगिरी हेही भविष्यातील संघर्षाचे महत्त्वाचे आयाम ठरणार आहेत. उद्याची युद्धे केवळ रणांगणावर लढली जाणार नाहीत, तर संगणक जाळे, उपग्रह व्यवस्था, वीज वितरण प्रणाली, बँकिंग नेटवर्क आणि दळणवळण यंत्रणांवरही हल्ले होतील. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सायबर प्रणाली शत्रूच्या हालचालींचे विश्लेषण करतील, संशयास्पद घुसखोरी ओळखतील आणि काही सेकंदांमध्ये प्रतिकारात्मक उपाययोजना करतील. स्वयंचलित ड्रोन, उपग्रह आणि सेन्सर नेटवर्क सीमाभागांवर सतत लक्ष ठेवून गुप्त माहिती गोळा करतील. भविष्यातील गुप्तहेर कदाचित एखादा मनुष्य नसून बुद्धिमान रोबो, सूक्ष्म ड्रोन किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेवर चालणारी डिजिटल प्रणाली असेल. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेसाठी सैनिकांइतकेच सायबर तज्ज्ञ, डेटा वैज्ञानिक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अभियंते महत्त्वाचे ठरणार आहेत. माहितीचे संरक्षण करणारा, सायबर हल्ले रोखणारा आणि डिजिटल क्षेत्रात वर्चस्व निर्माण करणाराच उद्याच्या जागतिक स्पर्धेत आघाडीवर राहील.

नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनातही या तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. भूकंपानंतर ढिगाऱ्याखाली अडकलेले लोक शोधण्यासाठी लहान रोबोटिक यंत्रे वापरली जातील. पूरग्रस्त भागात स्वयंचलित नौका अन्न, औषधे आणि मदत सामग्री पोहोचवतील. जंगलातील आगीमध्ये अग्निशमन दलाआधी ड्रोन परिस्थितीचे विश्लेषण करतील. पूर, चक्रीवादळ किंवा भूस्खलन यांसारख्या घटनांमध्ये मानवी मदतकार्य अधिक सुरक्षित आणि परिणामकारक होईल. कृत्रिम बुद्धिमत्ता या संपूर्ण व्यवस्थेचा मेंदू ठरणार आहे. हजारो सेन्सर्सकडून मिळणारी माहिती, उपग्रहांद्वारे मिळणारी छायाचित्रे, हवामानाचा अंदाज आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांचे विश्लेषण करून यंत्रे काही सेकंदांमध्ये निर्णय घेऊ शकतील. माणसाला जिथे काही मिनिटे लागतील, तिथे कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये पर्याय सुचवेल. यामध्ये इंटरनेट ऑफ थिंग्ज, प्रगत संवेदक, उपग्रह तंत्रज्ञान, संगणकीय दृष्टी, यंत्र शिक्षण आणि अतिवेगवान संप्रेषण प्रणाली यांचा मोठा वाटा असेल. प्रत्येक यंत्र एकमेकांशी संवाद साधेल आणि एकत्रितपणे कार्य करेल. त्यामुळे संपूर्ण बचाव मोहीम अधिक समन्वयित आणि प्रभावी बनेल. भारतासाठी ही मोठी संधी आहे. आपल्या देशात जगातील सर्वोत्तम अभियंते, संशोधक आणि तंत्रज्ञान तज्ज्ञ आहेत. संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी स्वदेशी मानवरहित यंत्रणा विकसित करण्याची क्षमता भारताकडे आहे. समुद्रकिनारे, पर्वतीय प्रदेश, पूरग्रस्त भाग आणि शहरी आपत्ती यासाठी विशेष भारतीय उपाय विकसित करता येतील. यामुळे 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला नवी दिशा मिळेल.

शिक्षणक्षेत्रालाही याचा विचार करावा लागेल. विद्यार्थ्यांना केवळ संगणक वापरणे पुरेसे ठरणार नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा आणि स्वयंचलित प्रणालींचे ज्ञान आवश्यक असेल. भविष्यातील रोजगार, उद्योग आणि राष्ट्रीय सुरक्षा या सर्व क्षेत्रांमध्ये या कौशल्यांची मागणी वाढणार आहे. तथापि, या तंत्रज्ञानाबरोबर नैतिक आणि कायदेशीर प्रश्नही उभे राहतील. यंत्रांनी घेतलेल्या निर्णयांची जबाबदारी कोणाची, चुकीचा निर्णय झाल्यास उत्तरदायित्व कोण स्वीकारणार, मानवी नियंत्रण किती असावे या प्रश्नांची उत्तरे शोधणे तितकेच आवश्यक आहे. तंत्रज्ञानाने मानवतेची सेवा करावी, तिची जागा घेऊ नये, हा मूलभूत सिद्धांत येथे कायम ठेवावा लागेल. होर्मुझ सामुद्रधुनीतील ती बचाव मोहीम भविष्यातील जगाची एक झलक आहे. उद्याच्या युद्धांमध्ये, समुद्री दुर्घटनांमध्ये, भूकंपांमध्ये आणि पुरांमध्ये सर्वप्रथम धावून येणारे कदाचित मानव नसतील<bha>;</bha> ती असतील बुद्धिमान यंत्रे. मानव त्यांच्या मागे उभा असेल, मार्गदर्शन करत असेल, पण धोका पत्करणारे आणि संकटात उतरून काम करणारे सैनिक, नौका, ड्रोन आणि रोबो हे मानवरहित असतील. मानवजातीच्या इतिहासात हा एक नवा टप्पा आहे. जिथे तंत्रज्ञान केवळ सुविधा देत नाही, तर जीव वाचवते आणि त्या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी भारतीय बुद्धिमत्ता, नवकल्पना आणि दूरदृष्टी उभी आहे. उद्याच्या जगात युद्ध जिंकण्यापेक्षा जीव वाचवणे अधिक महत्त्वाचे ठरेल आणि त्या कार्यात मानवरहित यंत्रणाच मानवतेची सर्वात मोठी साथीदार ठरणार आहे.



आजच्या काळात गुप्तहेरगिरी केवळ एखाद्या देशात गुप्तहेर पाठवण्याइतकी मर्यादित राहिलेली नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स, उपग्रह तंत्रज्ञान आणि इंटरनेटमुळे गुप्त माहिती गोळा करण्याच्या पद्धती पूर्णपणे बदलल्या आहेत. काही सेंटीमीटर आकाराचे ड्रोन, अत्याधुनिक कॅमेरे, ध्वनी संवेदक, उष्णता ओळखणारी उपकरणे आणि उपग्रहांमधून मिळणारी उच्च-गुणवत्तेची छायाचित्रे यांचा वापर करून हजारो किलोमीटर दूर असलेल्या भागांवर सतत नजर ठेवता येते. भविष्यात पक्ष्यांच्या आकाराचे ड्रोन, कीटकांसारखी सूक्ष्म यंत्रे आणि समुद्रातील स्वयंचलित निरीक्षण यंत्रणा गुप्त माहिती संकलनात महत्त्वाची भूमिका बजावतील. सायबर गुप्तहेरगिरी हे आणखी एक प्रभावी शस्त्र बनत आहे. शत्रुराष्ट्रांच्या संगणक प्रणालींमध्ये प्रवेश करून संवेदनशील माहिती मिळवणे, औद्योगिक रहस्ये चोरणे, संरक्षण क्षेत्रातील माहिती हस्तगत करणे किंवा महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर नजर ठेवणे हे सर्व संगणकांच्या माध्यमातून केले जात आहे. अनेकदा एखादा सायबर हल्ला किंवा माहितीची चोरी वर्षानुवर्षे लक्षातही येत नाही. त्यामुळे डेटा हेच नवीन युगातील सोने बनले आहे. सामाजिक माध्यमेदेखील आधुनिक युद्ध आणि गुप्तहेरगिरीचे प्रभावी साधन ठरत आहेत. फेसबुक, एक्स, इन्स्टाग्राम, युट्युब आणि इतर व्यासपीठांवरील माहितीचे विश्लेषण करून लोकांची मते, भावना, सामाजिक प्रवाह आणि राजकीय कल समजून घेता येतात. कृत्रिम बुद्धिमत्ता लाखो संदेश, छायाचित्रे आणि व्हिडिओंचे विश्लेषण करून जनमतावर परिणाम करणाऱ्या मोहिमा ओळखू शकते किंवा स्वतः अशा मोहिमा राबवू शकते. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

**यंगिस्तान**

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# आता शिक्षकांनी पालक व्हावे

जयपूरमधील ९ वर्षांच्या अमायराच्या आत्महत्येची हृदयद्रावक घटना आपल्या शिक्षण व्यवस्थेवर आणि समाजावर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण करते. एका चिमुकलीने शाळेच्या चौथ्या मजल्यावरून उडी घेऊन जीवन संपवले. कारण तिला शाळेत होणाऱ्या छळाला सामोरे जावे लागले आणि तिच्या तक्रारींकडे शिक्षकांनी दुर्लक्ष केले. ही घटना दुर्दैवी तर आहेच; त्याचबरोबर आपल्या मुलांना सुरक्षित आणि भावनिक आधार देण्यास आपण कुठे कमी पडत आहोत, याचा आरसा आहे. या घटनेने पुन्हा एकदा हा विचार करायला लावला आहे की, शिक्षकांनी केवळ ज्ञानदाते न राहता, विद्यार्थ्यांसाठी पालकांसारखे आधारस्तंभ बनणे किती महत्त्वाचे आहे.



आपल्या भारतीय संस्कृतीत शिक्षणाला नेहमीच अत्यंत पवित्र मानले गेले आहे. गुरुकुल परंपरेत गुरू हे केवळ शिक्षक नव्हते, तर विद्यार्थ्यांचे पालक, मार्गदर्शक आणि मित्रही होते. विद्यार्थी गुरुकुलात राहून शिक्षण घेत असत आणि गुरू त्यांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर जीवन जगण्याची कला प्रदान करत, नैतिक मूल्यांनी त्यांचे जीवन भरून टाकत आणि त्या जोडीला सामाजिक जबाबदाऱ्याही शिकवत असत. गुरू-शिष्याचे नाते हे केवळ औपचारिक नव्हते तर ते प्रेम, विश्वास आणि आदरावर आधारित होते. गुरू आपल्या शिष्याला स्वतःच्या मुलाप्रमाणे वागवत असत आणि शिष्याच्या प्रत्येक अडचणीत त्याच्या पाठीशी उभे राहत असत.

आजच्या शिक्षण व्यवस्थेत मात्र हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. शाळांची संख्या वाढली आहे, आधुनिक सुविधांनी युक्त इमारती उभ्या राहिल्या आहेत, पण मुलांच्या मनात सुरक्षिततेची भावना कमी झाली आहे. शिक्षकांवर अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा आणि परीक्षांचे निकाल सुधारण्याचा दबाव इतका वाढला आहे की, त्यांना विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. परिणामी, शाळा हे केवळ माहिती मिळविण्याचे ठिकाण बनले आहे, भावनिक आधाराचे नाही.

अमायराच्या घटनेत असे समोर आले की, तिने अनेकदा तिच्यावर होणाऱ्या छळाबद्दल शिक्षकांना सांगितले होते, पण तिच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले. ही काय फक्त अमायराची गोष्ट नाही. अनेक शाळांमध्ये मुलांना होणाऱ्या त्रासाकडे, विशेषतः मानसिक छळाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. यामागे अनेक कारणे असू शकतात. एका शिक्षकाला अनेक विद्यार्थ्यांची जबाबदारी सांभाळावी लागते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे कठीण होते. काही शिक्षकांमध्ये मुलांच्या भावनिक गरजा समजून घेण्याची संवेदनशीलता नसते किंवा त्यांना तसे प्रशिक्षण मिळालेले नसते. त्यांना वाटते की, मुलांच्या लहानसहान तक्रारींकडे दुर्लक्ष करणे योग्य आहे. मला एक गोष्ट कळत नाही की, एखादी स्त्री मुलीच्या गंभीर तक्रारीकडे दुर्लक्ष कशी करू शकते? ती आई नाही का? नसली तरी बाई नाही का? मातृसुलभ हृदय तिच्याकडे नाही का?

शिक्षक आणि पालक यांच्यात योग्य संवाद नसल्यामुळे मुलांच्या समस्या वेळीच लक्षात येत नाहीत. त्यामुळे हा संवाद वाढणं आवश्यक आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे काही वेळा शालेय प्रशासन अशा गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष करते, ज्यामुळे शिक्षकांनाही यावर कारवाई करण्याची प्रेरणा मिळत नाही. मागे एका हॉस्टेलमध्ये काही सिनियर मुलं लहान मुलांना गुंडांसारखे मारत असल्याचा व्हिडीओ समोर आला होता. आता तर शिक्षक होमवर्क म्हणून कलमा देऊ लागले आहेत. शाळेच्या प्रशासनाने याकडे लक्ष दिलं पाहिजे आणि शैक्षणिक पात्रतेसह कॅरेक्टर सर्टिफिकेटही शिक्षकांकडून घेतलं पाहिजे.

लक्षात घ्या, पूर्वीही मुलांमध्ये चिडवाचिडवी, भांडणे होत असत, पण त्याचे स्वरूप इतके गंभीर नव्हते. आता मात्र सायबर बुलिंग, मानसिक छळ आणि शारीरिक हिंसाचाराच्या घटना वाढल्या आहेत. लहान मुले मोठ्या माणसांसारखी वागू लागली आहेत, त्यांच्यात संयमाचा अभाव दिसतो आहे आणि त्यांना आपल्या कृतींचे परिणाम समजत नाहीत. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांच्या अतिवापरामुळे मुलांच्या मानसिकतेत मोठे बदल झाले आहेत. त्यांना पटकन राग येतो, ते निराश होतात आणि अनेकदा चुकीचे निर्णय घेतात. या गंभीर परिस्थितीत शिक्षकांनी केवळ अभ्यासक्रम शिकवणारे यंत्र बनून न राहता, विद्यार्थ्यांसाठी पालकांसारखे बनणे ही काळाची गरज आहे. याचा अर्थ असा नाही की, शिक्षकांनी पालकांची जागा घ्यावी, तर याचा अर्थ असा आहे की, त्यांनी विद्यार्थ्यांच्या भावनिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घ्यावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी मोकळा संवाद साधला पाहिजे. मुलांना त्यांच्या समस्या, भीती आणि चिंता शिक्षकांसोबत शेअर करता येतील, असा विश्वास त्यांना दिला पाहिजे. शिक्षकांनी मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले पाहिजे आणि त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षकांनी मुलांच्या भावनांबद्दल संवेदनशील असले पाहिजे. एखाद्या मुलाला त्रास होत असेल, तर त्याला सहानुभूती दाखवून मदत केली पाहिजे. प्रत्येक मुलाची पृष्ठभूमी, मनःस्थिती आणि परिस्थिती वेगळी असते, हे शिक्षकांनी लक्षात ठेवले पाहिजे.

शाळेत होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या बुलिंग किंवा छळाविरुद्ध शिक्षकांनी कठोर भूमिका घेतली पाहिजे. अशा घटनांकडे दुर्लक्ष न करता, त्यावर त्वरित कारवाई केली पाहिजे. मुलांना सुरक्षित वातावरणाची हमी दिली पाहिजे. शिक्षकांनी पालकांशी नियमित संपर्क साधला पाहिजे. मुलांच्या प्रगतीबद्दल, त्यांच्या वर्तणुकीतील बदलांबद्दल आणि त्यांच्या समस्यांबद्दल पालकांशी चर्चा केली पाहिजे. शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वयामुळे मुलांच्या समस्या वेळीच सोडवता येतात. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, शिक्षकांनी मुलांना नैतिक मूल्ये, सामाजिक जबाबदाऱ्या आणि जीवन कौशल्ये शिकवली पाहिजेत. त्यांना इतरांचा आदर करायला, सहानुभूती दाखवायला आणि समस्या सोडवायला शिकवले पाहिजे. शिक्षकांना मुलांच्या मानसिक आरोग्याबद्दल आणि बुलिंगसारख्या समस्यांना कसे हाताळावे, याबद्दल योग्य प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यांना समुपदेशनाचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे.

अमायरासारख्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आपण सर्वांनी, विशेषतः शिक्षकांनी आणि शालेय प्रशासनाने, गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. शाळा हे मुलांसाठी दुसरे घर असले पाहिजे, जिथे त्यांना सुरक्षित, प्रेमळ आणि आधार देणारे वातावरण मिळेल. शिक्षकांनी केवळ ज्ञानदाते न राहता, विद्यार्थ्यांसाठी पालकत्वाचा आधार द्यावा. त्यांच्या मनात विश्वासाची ज्योत पेटवावी; जेणेकरून कोणतीही अमायरा पुन्हा कधीही एकटेपणाने आपले जीवन संपवण्याचा विचार करणार नाही. ■

writerjayeshmestry@gmail.com

## रविवारची पत्रे

### सत्संगाचे महत्त्व – जीवनाला मिळालेली नवी दिशा

माणसाचा जन्म झाला की त्याच्यासोबत एक प्रवास सुरू होतो. हा प्रवास सुख-दुःख, यश-अपयश, चांगले-वाईट यामधून वाटचाल करीत असतो. या प्रवासात कोणती वाट निवडायची, कोणता निर्णय घ्यायचा, हे ठरवणारी सर्वांत मोठी शक्ती म्हणजे 'संगत'. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे — "संगेन जायते भावः" म्हणजे संगतीने माणसाचे भाव, विचार आणि जीवन घडते.

चांगल्या लोकांची संगत म्हणजेच 'सत्संग'. सत् म्हणजे सत्य, चांगुलपणा, ज्ञान आणि संग म्हणजे सहवास. थोडक्यात सत्याचा, धर्माचा, ज्ञानाचा आणि सद्गुणांचा सहवास म्हणजे सत्संग. आजच्या झगमगाटाच्या जगात सत्संग हाच एक दिवा आहे, जो आपल्या जीवनाला नवी दिशा देतो.

**सत्संगाची संकल्पना आणि स्वरूप :** सत्संग म्हणजे फक्त मंदिरात जाऊन प्रवचन ऐकणे, एवढेच मर्यादित नाही. सत्संगाची अनेक रूपे आहेत :

**१. संत-सज्जनांचा सहवास :** ज्ञानेश्वर, तुकाराम, विवेकानंद, गांधीजी यांसारख्या महापुरुषांचे विचार वाचणे आणि आचरणात आणणे.

**२. गुरूंचे मार्गदर्शन :** जो आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे नेतो तो गुरू. त्यांच्याशी असलेला संवाद म्हणजे सत्संग.

**३. सद्ग्रंथ वाचन :** भगवद्गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी यांसारखी पुस्तके वाचणे हा देखील एकप्रकारचा सत्संगच आहे.

**४. चांगल्या मित्रांशी मैत्री :** जे आपल्याला प्रगतीकडे, चांगल्या कामाकडे प्रोत्साहित करतात अशी मंडळी.

सत्संग म्हणजे बाहेरून ज्ञान घेणे नाही, तर आतल्या मनाला घासून-पुसून स्वच्छ करणे आहे.

**सत्संगाचे महत्त्व–**

**अ) चारित्र्यनिर्मिती होते :** मातीला जसा कुंभार आकार देतो, तसे सत्संग माणसाला घडवतो. एकटा माणूस भरकटू शकतो, पण चांगल्या लोकांच्या सोबतीने त्याला योग्य-अयोग्य कळते. फुलासंगे मातीस वास लागे. संतांच्या चरित्रातून आपल्याला त्याग, सेवा, प्रामाणिकपणा शिकायला मिळतो. म्हणूनच म्हणतात, 'लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला की ते सोने होते.

**ब) जीवनाला ध्येय आणि दिशा मिळते :** आजचा तरुण संभ्रमात आहे. काय करावे, करीअर कसे निवडावे, हे कळत नाही. अशावेळी सत्संगातील विचार मनाला स्थैर्य देतात. 'तुझ्यातील क्षमता ओळख' ही जाणीव सत्संगातूनच येते. स्वामी विवेकानंदांना रामकृष्ण परमहंसांच्या सत्संगाने जीवनाची नवी दिशा मिळाली आणि त्यांनी जगाला भारताचा संदेश दिला.

**क) मानसिक शांती आणि बळ मिळते :** अपयश, ताण-तणाव, नैराश्य हे आजकालच्या जीवनाचे भाग आहेत. अशावेळी सत्संगातील एक वाक्य देखील डोंगराएवढे बळ देते. 'हे दिवसही जातील', 'कर्म करत रहा, फळाची अपेक्षा करू नका' ही गीतेची शिकवण सत्संगातूनच मनात रुजते. त्यामुळे मन शांत होते आणि आत्मविश्वास वाढतो.

**ड) वाईट सवयी सुटतात :** वाईट संगत माणसाला व्यसन, आळस, चोरीकडे नेते. पण सत्संगात गेल्यावर माणसाला या गोष्टींची लाज वाटू लागते. त्याला समजते की आयुष्य हे फक्त मौज-मस्तीसाठी नाही तर काहीतरी चांगले करण्यासाठी आहे. म्हणूनच तुरुंगातही सत्संगाचे वर्ग घेतले जातात, जेणेकरून गुन्हेगार सुधारू शकतील.

**भारतीय संस्कृती सत्संगावरच उभी आहे.**

**१. रामायण :** वनवासात रामाला ऋषी-मुनींचा सत्संग लाभला. त्यांच्याकडून त्यांनी धर्म, नीती शिकली.

**२. महाभारत :** अर्जुन गोंधळला होता तेव्हा श्रीकृष्णाच्या सत्संगाने त्याला 'गीता' मिळाली. तीच गीता आजही कोट्यवधी लोकांना दिशा देते.

**३. संत परंपरा :** महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय हा सत्संगाचेच उदाहरण आहे. लाखो लोक पंढरीच्या वारीत जातात, तुळस डोक्यावर घेऊन स्त्रिया आणि भक्त टाळ, चिपळ्यांच्या गजरात पायी जातात. एकत्र भजन करतात, कीर्तन ऐकतात. तिथे मिळणाऱ्या एका तासाच्या कीर्तनाने वर्षभराचे बळ मिळते.

**छत्रपती शिवाजी महाराज :** त्यांना जिजाऊंचा आणि संतांचा सत्संग लाभला होता. त्यामुळेच त्यांनी 'हिंदवी स्वराज्य'चे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण केले.

**सत्संग कसा करावा–**

१. आठवड्यातून किमान १ तास सत्संगासाठी काढा. कीर्तनाला जा, चांगल्या लोकांना भेटा.

२. सद्ग्रंथ वाचायला हवेत : रोज १० मिनिटे गीता, ज्ञानेश्वरी वाचा.

३. चांगले ऐका, पाहा : मोबाईलवर वेळ वाया घालवण्याऐवजी चांगले व्हिडीओ बघा. संगतीने माणूस घडतो आणि सत्संगतीने माणूस सावरतो. जर जीवनाला खरी दिशा हवी असेल, तर सत्संगाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवा.

**मंगला डहाके**/भंडारा

■■

### हा सुखसोहळा स्वर्गी नाही!



आषाढ मास सर्वांसाठी आनंद पर्वणी घेऊन येतो. ग्रीष्मात झालेला वसुंधरेचा दाह शमविण्यासाठी मृगधारा बरसतात. पुढे चाहूल लागते शेतीच्या कामाची. निसर्ग वरदहस्ताने काळ्यामातीवर मेहरबान होतो आणि भूमीवर सर्वत्र हिरवीगार चादर विखुरली जाते. गाव, शिवार, वाड्या - मळ्यातील बीजांकुर उमलू लागतात. त्याची परिणती म्हणून शेतकरी राजा आनंदात न्हाऊन जातो. श्रमपूर्तीच्या समाधानाची शिदोरी घेऊन शाश्वत सुखाची वाट धरतो ती वाट म्हणजे पंढरीच्या वारीची.

पंढरीची वारी हे आपल्या संस्कृतीचे महावैभव, आनंद, सुख, समाधानाचा महासोहळा. वारीत वर्ण, वंश, जात, धर्म, स्त्री, पुरुष असा कुठलाही भेद पाळला जात नाही. इथे सर्वांचं एकच अवीट नातं असतं ते देव म्हणजे भक्तांचे. पंढरीच्या या वारीसाठी कुणालाही निमंत्रण पाठविले जात नाही. प्रपंचातला वेळातला वेळ काढून वर्षातून एकदा तरी पंढरीची वारी करावी आणि ती अनुभवून इतरांना सांगावी असाच अनमोल वारीचा सोहळा आहे. माघ, चैत्र, आषाढी आणि कार्तिकी अशा चार वाऱ्या पंढरपूरचे वारकरी करतात, परंतु या सर्व वारींमध्ये आषाढी वारीला विशेष महत्त्व आहे. टाळ मृदंगाच्या गजरात, वेणू आणि चिपळ्यांच्या मंजुळ स्वरात, माय माउलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन, फुगड्यांचा फेर, कपाळी बुक्क्यांचा टिळा, गळ्यात तुळशी माळा, अनवाणी पायाने चालणारे आबालवृद्ध. कंठात विठ्ठल... विठ्ठल... मंत्र, अंतःकरणात विठ्ठलाचे अपार प्रेम साठवून वारकऱ्यांची पावले झपाट्याने मजल दरमजल करीत पंढरपूर गाठतात.

पंढरपूर असे तीर्थक्षेत्र आहे की देव दर्शनाचा लाभ हा थेट चरणावर मस्तक ठेवून घेतला जातो. अशाच समचरणांच्या दर्शनाच्या अभिलाषेपायी वारकरी व्याकुळ असतात. चंद्रभागेत स्नान करून जगतजननी रुक्मिणीमाता, भक्त पुंडलिक, चोखामेळा, नामदेव पायरी, कान्होपात्रेचे दर्शन घेऊन ते धन्य होतात. ऐसा लाखो वैष्णव भक्तांचा सोहळा चंद्रभागेच्या वाळवंटी भरतो. असा रम्य सोहळा बघण्यासाठी देश-विदेशातील कानाकोपऱ्यांतून भक्त येतात. या सोहळ्यांचे साक्षीदार बनतात आणि त्यांचे जीवन धन्य होऊन जाते. अशा सोहळ्यांचे वर्णन अनेक संतांनी करून ठेवले आहे.

**हा सुख सोहळा स्वर्गी नाही**
**सुखालागी करीशी तळमळ ।**
**तरी तूं जाय एकवेळ पंढरीसी॥**
**पंढरीचे सुख नाही कोण्या धामा**
**पंढरीसी जाय तू एक वेळ ।**
**मग तू अवघाची सुखरूप होशी ।।**

अशी अनेक वचने संतांच्या शब्दातली आहेत.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

■■

### तुकाराम मुंढे आणि दूध

बातमी होती की तुकाराम मुंढे अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यानंतर दुधाचे संकलन कमी झाले. म्हणजे स्पष्ट होते की मोठ्या प्रमाणात भेसळ होत होती. आता काही लोक सांगतील की उन्हाळ्यात दूध कमी होते. पण ही आजची माहिती आहे. साधारण जुलै ते ऑक्टोबर या काळात सर्वांत जास्त दूध उत्पादन होत असते. कारण जनावरांना हिरवा चारा मिळतो. त्यामुळे दूध वाढते. अन सध्या दुधाचा तुटवडा जाणवतो आहे. सणासुदीच्या काळात दुधाचा खप जास्त असतो तेव्हा हा आकडा अजून मोठा ठरू शकतो.

आता विचार करा ५ लाख लिटर दूध (म्हशी, गाय) चा ६० रुपये विक्रीदर धरला तर रोजचे ३ कोटी रुपये आणि वर्षाचे साधारण ११०० कोटी रुपये हे लोकांच्या खिशातून या दूध उत्पादकांनी लुटला. हा धंदा किती वर्षे सुरू आहे ह्याचा विचार करता येत नाही. भारतातील हा आकडा किती मोठा असेल? हे दूध लहान मुले, वयोवृद्ध पितात. त्यामुळे प्रकृतीवर परिणाम होऊन आजार होतात ते वेगळे. त्यावर होणारा खर्च वेगळा. तुकाराम मुंढे आयुक्त झाले नसते तर हा गोरखधंदा कधी उघडकीस आलाच नसता.

यावर उपाय करता येईल. प्रत्येक प्रक्रिया करणारा शेकडो पुरवठादारांकडून दूध घेतो. त्याची नोंद असते. कारण त्यांना पैसे द्यावे लागतात. प्रत्येकाकडे किती दूध कमी आले आणि ते कोणी टाकले हे समजू शकेल. त्यातून कोण भेसळ करतो ते समजू शकते. ज्याचे दुधाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले तो गुन्हेगार असू शकतो. दुसरे त्यांचा पुरवठा आणि विक्री तपासावी. तसेच किती दूध इतर पदार्थ करण्यासाठी वापरले ते पण विचारात घ्यावे. कोण भेसळ करतो ते समजेल. त्यांना कठोर शिक्षा व्हावी.

**प्रदीप महाबळे**/पुणे

■■

### 'नीट' पेपरफुटीचा मुखवटा आणि लडाख आंदोलन

आजचे युग हे माहितीचे युग असले, तरी या माहितीचा वापर करून देशात संभ्रम आणि असंतोष कसा पसरवला जाऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे सध्या सुरू असलेली काही आंदोलने आणि त्यामागील प्रचार होय. लडाखमधील सोनम वांगचुक यांच्या जंतरमंतर येथील उपोषण समाजमाध्यमांवर जाणीवपूर्वक 'नीट' पेपरफुटीच्या प्रकरणाशी जोडण्याचा प्रयत्न होत आहे. हा केवळ योगायोग किंवा संभ्रम नसून, यामागे एक अत्यंत पद्धतशीर आणि धोकादायक राजकीय अजेंडा कार्यरत असल्याचे आता स्पष्ट होत आहे.

'नीट' परीक्षा आणि पेपरफुटी हा देशातील कोट्यवधी तरुण विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि त्यांच्या भावनांशी खेळणारा विषय आहे. या विषयामुळे विद्यार्थ्यांमध्ये आधीच नैराश्य आणि संतापाचे वातावरण आहे. आंदोलक आणि त्यांच्या पाठीशी असणाऱ्या शक्तींनी नेमका याच संवेदनशील मुद्याचा 'आडोसा' घेतला आहे. लडाखच्या भौगोलिक आणि स्थानिक मागण्यांचा मूळ विषय बाजूला ठेवून, देशातील तरुणांना रस्त्यावर उतरवणे, त्यांच्या मनात व्यवस्थेबद्दल तीव्र असंतोष निर्माण करणे आणि याद्वारे संपूर्ण देशात अराजकता व अशांतता माजवणे, हाच यामागील मुख्य हेतू आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर पुळका असल्याचा आव आणून स्वतःचा छुपा अजेंडा रेटण्याचा हा प्रयत्न अत्यंत निंदनीय आहे.

लडाख येथील हे आंदोलन सुरुवातीला लडाखला संविधानाच्या 'सहाव्या अनुसूची' अंतर्गत विशेष दर्जा मिळावा आणि तिथल्या स्थानिक संस्कृतीचे रक्षण व्हावे या गोंडस नावाखाली सुरू झाले. परंतु, हळूहळू या आंदोलनाने अत्यंत आक्रमक रूप धारण केले. केंद्र सरकारवर दबाव आणण्यासाठी थेट राजधानी दिल्ली रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला. सीमाभागातील संवेदनशीलतेचा गैरफायदा घेत सरकारला वेठीस धरण्याच्या या भूमिकेमुळेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आणि वांगचुक यांना प्रशासनाकडून अटक करण्यात आली. लोकशाही मार्गाने हक्क मागणे वेगळे, पण देशात अस्थिरता निर्माण करण्यासाठी आंदोलनाचा शस्त्र म्हणून वापर करणे पूर्णपणे वेगळे आहे.

या संपूर्ण आंदोलनात सर्वांत चिंताजनक बाब म्हणजे सोनम वांगचुक यांनी चीनबाबत केलेली बेछूट वक्तव्ये. 'चीनने आक्रमण केल्यास आम्ही त्यांना मार्ग दाखवू,' अशा प्रकारची विधाने थेट देशाच्या सुरक्षेला आणि सार्वभौमत्वाला आव्हान देणारी आहेत. लडाखसारख्या सामरिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील सीमाभागात राहून शत्रू राष्ट्राचा धाक दाखवणे आणि देशांतर्गत तरुणांना चिथावणी देणे, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडत आहेत. यावरून हे आंदोलन केवळ स्थानिक विकासासाठी नसून, देशाला आतून कमकुवत करण्याच्या मोठ्या डावाचा भाग तर नाही ना, अशी गंभीर शंका उपस्थित होते. या आंदोलनाच्या पडद्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी विरोधातील एक मोठी फळी कार्यरत असल्याचे दिसते. देशातील तरुणांमध्ये सतत असंतोष जिवंत ठेवणे आणि सरकारविरुद्ध वातावरण तयार करणे, हा या शक्तींचा जुनाच अजेंडा आहे. कोणत्याही भावनिक आवाहनाला बळी पडण्यापूर्वी, त्यामागील सुप्त राजकीय हेतू, परकीय शक्तींचे छुपे मनसुबे आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेला असणारा धोका ओळखणे हीच आजच्या काळातील प्रत्येक सुजाण आणि सजग नागरिकाची पहिली जबाबदारी आहे.

**अविनाश देशपांडे**/पुणे

■■

### जगातील सर्वांत दुर्मिळ संपत्ती

आपल्या आयुष्यातील प्रश्नांची उत्तरे न देता मनाला शांतता देणारी माणसे हीच खरी दुर्मिळ संपत्ती आहे, तिचे जतन करायला शिका. आपण जसे आहोत तसे स्वीकारणारी ती माणसे असतात. सध्या बोलणारे, निष्कर्ष काढणारे, न्याय करणाऱ्यांचाच भरणा वाजवीपेक्षा जास्त होतो आहे. ऐकून घेत नाहीत, ना समजून घेत, ना आपल्याला स्वीकारत. त्यांना जवळ करून उपयोग काय? तेव्हा मात्र भिजलेल्या प्रवाशाला कुठलेही भाष्य न करता त्याला आश्रय देणारे झाड, काहीही अपेक्षा न ठेवता लाटांच्या आवाजाने मनातील गोंधळ शांत करणारा रत्नाकर आणि थकलेले मूल आईच्या कुशीतच शांत का होते, याचा कधीतरी हा नरदेह विचार करणार की नाही? आपल्याला कुणीतरी ऐकावे, समजून घ्यावे असे जर वाटत असेल तर विसावा देणारे मनाचे न्यायालय २४ तास जागृत ठेवावे लागते. विश्वासाचं, निःस्वार्थ मायेचं नातं जपलं की आपला उद्धार करायला परमेश्वरालाही सोपे जाते. कर्तृत्व, शिफारस व अर्ज नसताना सुद्धा हृदय चालविणारा, विना अडथळा संदेशवहन करणारी

प्रणाली चालविणारा, टेस्टर, कॅमेरे, सेन्सर प्रणाली, स्वरप्रणाली, अद्भुत शरीर रचना आणि ज्याची आठवण सतत रहावी अशा आत्म्याचे फिटिंग करणारा अशा आर्किटेकचे रामकृष्ण हरी, श्रीराम जय राम जय जय राम असा नामघोष करून कृतज्ञता व्यक्त करावी, कारण तीच जगातील वेगवेगळ्या रूपातून प्रकट झालेली दुर्मिळ संपत्ती आहे. ■

**अमोल करकरे**/९९६७६२७६१७

■■

## महत्वाचे...

### देवकते बहीण-भाऊ यांची महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या कॅम्पसाठी निवड



**सांगोला, दि.१८ जुलै -**
तालुक्यातील कमलापूर येथील विभावरी देवकते हिची १९ वर्षाखालील मुलींच्या तर ययाती देवकते याची १६ वर्षांखालील मुलांच्या महाराष्ट्र क्रिकेट संघाच्या कॅम्पसाठी निवड झाली. देवकते कुटुंबातील या सख्ख्या बहीण-भावाने क्रिकेट क्षेत्रात मिळिवलेल्या या यशाबद्दल आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, नगराध्यक्ष आनंद माने, सोलापूर येथील मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीचे प्रशिक्षक रोहित जाधव, सत्यजित जाधव, अक्षय हावळे व सांगोला येथील राजमाता क्रिकेट ॲकॅडमीचे प्रशिक्षक प्रशांत काशीद, अक्षय जाधव, रणजीत गवळी, गणेश माळी, गणेश वाघ, कमलापूर येथील बाबुराव बंडगर, मधुकर तंडे, रावसाहेब अनुसे, डॉ.सतीश तंडे यांनी अभिनंदन केले.



### जि.प. अंत्रोळी शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन


**सोलापूर, दि. १८ जुलै-**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रोळी येथे लोकशाहीर साहित्यरत्न साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्याची माहिती, त्यांची प्रकाशित पुस्तके कादंबरी, कथा पोवाडे यांचे सविस्तर वर्णनात्मक माहिती शिक्षक श्रीरंग बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी मुख्याध्यापक युवराज राठोड, नागनाथ म्हमाने, कीर्ती जाधव, मीनाक्षी राठोड, पुष्पा बनसोडे आदी शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीरंग बनसोडे यांनी केले. कीर्ती जाधव यांनी आभार मानले.

### अल्पवयीन मुलीशी विवाह करुन दोन मुलाला जन्म दिला; पतीविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि. १८ जुलै-**
एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीशी विवाह करुन दोन बाळांना जन्म दिल्या प्रकरणी पती संतोष कट्टीमणी याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी ही १७ वर्षाची अल्पवयीन असताना दि.१५ जुलै २०२३ रोजी संतोष कट्टीमणी याचेबरोबर विवाह झाला होता. सदरची अल्पवयीन मुलगी सासरी घरी नांदावयास गेल्यावर आरोपी तथा पतीने तिच्याशी घरी शारिरीक संबंध ठेवल्यामुळे ती गर्भवती राहिली तद्नंतर तिला तीन महिने झाल्यानंतर मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले. गरोदरचे दिवस पुर्ण झाल्यानंतर ती एका खाजगी रुग्णालयात बाळंतीन होवून एक मुलगा झाला. तो सध्या दोन वर्षाचा आहे. त्यानंतर पिडीताही सासरी असताना पुन्हा पतीने शारिरीक संबंध ठेवल्यामुळे ती गरोदर राहिली. ऊस तोडणीसाठी कर्नाटक राज्यातील अथणी येथे गेल्यावर शासकीय दवाखान्यात उपचार घेतले. कारखान्याचा पट्टा पडल्यानंतर पती-पत्नी सासरी आले. दि.१३ जुलै २०२६ रोजी रात्री दहा वाजता पिडीतेच्या पोटात दुखू लागल्याने आईने ॲम्ब्यूलन्स बोलावून कोडोली येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेल्यावर ती १४ जुलै रोजी प्रसूती होवून तिने दुर्सया मुलाला जन्म दिला असल्याचे दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर हे करीत आहेत.

### शिरनांदगी येथे ११ वर्षीय मुलीची अज्ञात कारणावरुन गळफास

**मंगळवेढा, दि. १८ जुलै-**



शिरनांदगी येथील एका ११ वर्षीय मुलीने अज्ञात कारणावरुन शेतात असलेल्या लिंबाच्या झाडास साडीच्या सहाय्याने गळपास घेवून आत्म हत्या केल्याचा प्रकार घडला आहे. दरम्यान या घटनेची नोंद पोलीसात झाली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, दि.१६ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता यातील खबर देणारे यशवंत खताळ यांची पुतणी मयत आर्या वसंत खताळ (वय ११) हिने घराच्या बाजूस शेतात असलेल्या लिंबाच्या झाडास अज्ञात कारणावरुन साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. तिला उपचारासाठी मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात नेले, तेथील डॉक्टरांनी तपासून ती मयत झाली असल्याचे घोषीत केले. याचा अधिक तपास सहाय्यक फौजदार माळी हे करीत आहेत.

### बेपत्ता २४ वर्षीय विवाहितेस तीन राज्य पार करुन पोलीसांनी घेतले ताब्यात

**मंगळवेढा, दि. १८ जुलै-**
मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातील बेपत्ता २४ वर्षीय विवाहितेस तीन राज्य पार करुन शोधण्यात मंगळवेढा पोलीसांना यश आले असून सदर महिलेला तिच्या कुटूंबियाच्या ताब्यात देण्यात आल्याचे पोलीसांनी सांगीतले.या घटनेची हकीकत अशी, ८ जानेवारी २०२६ रोजी यातील बेपत्ता २४ वर्षीय विवाहिता आपल्या दोन वर्षाच्या मुलासह बेपत्ता झाली होती. तिच्या पतीने याबाबत मंगळवेढा पोलीसात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविल्यानंतर याचा तपास महिला पोलीस हवालदार वंदना अहिरे यांच्याकडे देण्यात आला होता. डी.वाय.एस.डी.डॉ.बसवराज शिवपुजे,पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार अहिरे व पोलीस हवालदार श्रीराम ताटे यांनी तामिळनाडू,राजस्थान,महाराष्ट्र आदी तीन राज्ये २ हजार २०० कि.मी अंतर पार करीत कोईमत्तूर येथील मिलबूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पोहचले. सदर तपासाधिकारी यांनी सायबर माहिती तंत्रज्ञानाचा वापर केल्याने तीन राज्य पार करुन गेलेली महिला मुलासह सापडली. कुलामत्तूर येथून माय लेकराला ताब्यात घेवून मंगळवेढा पोलीस ठाण्यात हजर करुन आई वडिलांच्या सुखरुप ताब्यात देण्यात आले.

# शिक्षक, शाळांच्या प्रशासकीय अडचणी तातडीने सोडविण्यात येतील : डॉ. जवळगेकर

**महापालिकेकडे १२८ शाळा हस्तांतरणानंतर पहिलीच मुख्याध्यापकांची सहविचार सभा उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**
शिक्षक व शाळांच्या प्रशासकीय अडचणी तातडीने सोडविण्याचे आश्वासन तसेच भविष्यातही महापालिकेमार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन मुख्य लेखाधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी दिले.



शहर हद्दवाढ भागातील १२८ खासगी शाळांच्या प्रशासकीय बाबींचे अधिकार सोलापूर म हानगरपालिकेकडे हस्तांतरित झाल्यानंतर सर्व मुख्याध्यापकांची पहिली सर्वसमावेशक सहविचार सभा शुक्रवारी कॅम्प शाळा लष्कर येथे पार पडली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीत शालेय शिक्षणाशी संबंधित विविध विषयांवर डॉ. जवळगेकर, महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी मल्हारी माने यांनी सविस्तर म ार्गदर्शन करण्यात आले.बैठकीच्या प्रारंभी प्रशासनाधिकारी माने यांनी प्रास्ताविकात शिक्षण मंडळ स्तरावर शिक्षकांचा कोणताही प्रश्न प्रलंबित ठेवला जाणार नसल्याचे स्पष्ट केले.बैठकीत यू-डायस प्रमोशन, शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण, आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया, शाळेची फी, विद्यार्थी वाहतूक, दप्तराचे ओझे, केंद्र व राज्य शासनाच्या विद्यार्थीहिताच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, शालेय पोषण आहार, व्हीएसके पोर्टल, संचमान्यता, आरटीई मान्यता नूतनीकरण, विद्यार्थी सुरक्षितता, 'निपुण महाराष्ट्र' अभियान, जयंत नारळीकर अध्ययन-अध्यापन उपक्रम तसेच पीजीआय कार्यपद्धती आदी विषयांवर संबंधित अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

बैठकीस शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक मल्लिकार्जुन हिरेमठ, लेखापाल महेश वालावलकर, विषय साधन व्यक्ती सुवर्णा गुरव, श्रीमती कदम तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# विकास सहकारी बँकेस ६ कोटीचा ढोबळ नफा

## एनपीए शून्य टक्के, लाभांश बारा टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**
येथील विकास सहकारी बँक लिमिटेड या संस्थेची ४६वी वार्षिक सर्वसाधारण सभा महेश भवन,सम्राट चौक येथे संपन्न झाली. या सभेत बँकेचे अध्यक्ष राजगोपाल चंडक यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभासदांसमोर सादर केला. चालू वर्षी बँकेस रुपये ५ कोटी ९९ लाख इतका ढोबळ नफा झाला आहे. तसेच महत्वाचे म्हणजे बँकेचे नेट एनपीए चे प्रमाण मागील सहा वर्षापासून सतत ''शून्य टक्के'' आहे. बँकेने ५७७.२६ कोटीचा व्यवसाय उद्दिष्ट पार केले असून २५.३०% आहे. तसेच अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रास द्यायच्या कर्जाचे उद्दिष्टपण पूर्ण केले आहे. तसेच संचालक श्री राजगोपाल मिणियार यांनी ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकांचे विश्लेषण सादर केले. यावेळी सभासदांना १२ % लाभांशाची घोषणा करण्यात आली.




या सभेस संचालक हरीनिवास जाजू, राजकुमार राठी, कमलकिशोर राठी, ओमप्रकाश तिवाडी, नवनीत तोष्णीवाल, मनीष बलदवा, नंदकिशोर मुंदडा, चंद्रशेखर स्वामी, सुरेश बिटला, अनुराधा चांडक, ज्योती आसावा तसेच बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सुनील माहेश्वरी, प्रवीण बजाज व इतर सभासद उपस्थित होते. राजेंद्र कुमार आसावा यांनी आभार मानले.

# वाईमध्ये आज शिक्षकेतर कर्मचारी महासंघाची राज्य कार्यकारिणी

## प्रलंबित प्रश्नांवर होणार मंथन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**
महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या आदेशानुसार, तसेच महासंघाचे अध्यक्ष जी. वाय. पाटील, सरचिटणीस एम. के. राऊळ आणि कार्याध्यक्ष डी.एम. बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार, १९ जुलै रोजी सकाळी १०:३० वाजता वाई (जि. सातारा) येथील किसान वीर महाविद्यालयात राज्य कार्यकारिणी सभा आयोजिली आहे.

सातारा जिल्हा महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटना व शिवाजी विद्यापीठ महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने सभेची जय्यत तयारी केली आहे. राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे संघटन अधिक मजबूत करणे आणि त्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना गती देणे, हा या सभेचा मुख्य उद्देश आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीम ध्ये महासंघाच्या संघटनात्मक बळकटीकरणासंबंधीचे धोरणात्मक विषय, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या व प्रलंबित प्रश्न यांवर सविस्तर चर्चा केली जाणार आहे. तसेच संघटनेच्या आगामी वाटचालीची रूपरेषा आणि नियोजित कार्यक्रमांची घोषणाही या सभेत केली जाईल.

या राज्यस्तरीय बैठकीला महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे सर्व राज्य कार्यकारिणी पदाधिकारी, विभागीय पदाधिकारी आणि सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहणार आहेत. आगामी काळातील आंदोलने आणि धोरणांच्या दृष्टीने ही सभा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. महासंघाच्या राज्यातील सर्व पदाधिकारी व सदस्यांनी या सभेला वेळेवर व बहुसंख्येने उपस्थित राहून सभा यशस्वी करावी, असे आवाहन सातारा जिल्हा महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटना आणि शिवाजी विद्यापीठ महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.




# ७०० वारकऱ्यांना आस्था संस्थेकडून जीवनावश्यक साहित्य किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**
शेगावहून पंढरपूरकडे निघालेल्या श्री संत गजानन म हाराजांच्या पालखीचे शुक्रवारी सोलापुरात आगमन झाल्यानंतर आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने पालखीतील सुमारे ७०० वारकऱ्यांना दैनंदिन वापरातील जीवनावश्यक साहित्याचे किट वाटप करण्यात आले.

प्रभाकर महाराज मंदिर, सम्राट चौक, बाळीवेस, चाटी गल्ली मार्गे पूर्व मंगळ पेठेतील भुसार गल्ली, जैन मंदिर परिसरात पालखी दाखल झाल्यानंतर श्री गजानन महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर वारकऱ्यांना साबण, तेल, टूथपेस्ट, टूथब्रश, पावडर, झेंडू बाम, अंगसाबण, सुमो स्प्रे, नॅपकिन, टॉवेल आदी जीवनावश्यक साहित्य असलेल्या किटचे वितरण करण्यात आले.या उपक्रमात आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, संचालक वेदांत तालिकोटी व राम क्षीरसागर यांच्या हस्ते किटचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सुरज छंचुरे, अथर्व शिंदे, यश तालिकोटी, अथर्व कोळुरे, वेदांत तमशेट्टी, श्रेयस कोळुरे, संदेश शेरीकर, बसवराज बेऊर, राज बेऊर, आकाश वाघमारे, प्रथमेश व्हड्राव, अप्पा साखरे आणि प्रमोद छंचुरे यांनी परिश्रम घेतले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे बावी (आ.) येथील व आसपासचे लोकांना या जाहीर नोटीसी मार्फत कळविण्यात येते की,

आमचे अशिल रोहिणी सोमनाथ उंबरे लग्नानंतरचे नांव - रोहिणी परशुराम उकरंडे असे असून आमच्या अशिलास शितल सोमनाथ उंबरे रा. बावी, ता. बार्शी, जि. सोलापूर ह्या नावाची बहीण होती. आमच्या अशिलाचे आई वडिल मयत झालेले आहेत. आमच्या अशिलांचे व बहिणीचे नावे मौजे बावी, ता. बार्शी येथे जमिन गट नं. ६१४, ६००, ५२६, ४०९ अशा जमिनी आहेत. आमच्या अशिलाची बहिण शितल सोमनाथ उंबरे ही स्वतः १५ वर्षापासून बेपत्ता आहे. आमचे अशिलाने बहिण या नात्याने तिचा शोध घेतला असता ती मिळून आलेली नाही. आमच्या अशिलास जमीनीचे खाते फोड करण्याचे आहे.

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, शितल सोमनाथ उंबरे रा. बावी, ता. बार्शी, जि. सोलापूर ही कोणाला कोठे असल्याची माहिती मिळाल्यास खालील पत्त्यावर तिची माहिती द्यावी अथवा शितल सोमनाथ उंबरे हिने स्वतः आमच्या अशिलास भेटून १५ दिवसात माहिती द्यावी. १५ दिवसाचे आत माहिती न आल्यास आमचे अशिल योग्य ती कारवाई करतील, ही जाहीर नोटीस दिली. ता. १९/०७/२०२६

सही/-
रोहिणी सोमनाथ उंबरे लग्नानंतरचे नांव - रोहिणी परशुराम उकरंडे
रा. मालवंडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ८५३०५७३६११

सही/-
अशिलातर्फे ॲड.
(ॲड. एस.एस. ठोंबरे)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, बार्शी
मो.नं. ९३७११६२४२५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलांनी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि व सब डि सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर ग.व.सु हद्दीतील तालुका उत्तर सोलापूर पैकी पेठ- तक्षशील नगर, उत्तर सदर बझार, सोलापूर या नावांने ओळखल्या जाणा-या नगरातील घर नं.बी १४८ ही मिळकत घरजागा आमचे अशिल सौ.शशिकला गुरप्पा बंदपट्टे यांचे आई कै.शांताबाई सायबण्णा नाईक यांचे नांवावर असून त्यांचे दि.२३/१०/२०१६ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे. तसेच आमचे अशिलाचे वडिल म्हणजे व कै.शांताबाई यांचे पती कै.सायबण्णा हुसेनप्पा नाईक यांचेही दि.०९/१२/२०२१ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे.

सदर ठिकाणी आमचे अशिलाचे मयत आई कै.शांताबाई सायबण्णा नाईक यांचे नांवे घर नं.बी १४८, तक्षशील नगर,कुमठा नाका, उत्तर सदर बझार, सोलापूर येथे १२×२८ = ३३६ चौ.फुट जागेत वीट, मातीने, बांधून वरती पन्हाळी पत्रे घातलेल्या दोन खोल्या असून यात संडास-बाथरूम व लाईट कनेक्शनची सुविधा आहे.

सदरहू घरजागेत आमचे अशिल सौ.शशिकला गुरप्पा बंदपट्टे हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरुपी मयताचे हयातीपासून राहणेस आहेत. सदरहू घर नं.बी १४८, तक्षशील नगर,कुमठा नाका,उत्तर सदर बझार,सोलापूर या मिळकतीवरील मयताचे नांव कमी करुन आमचे अशिल सौ.शशिकला गुरप्पा बंदपट्टे यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे भुमी मालमत्ता विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे वारस नोंद पावती व घरजागेचे भाडेपावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर अन्य कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार,टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा.चे भूमी मालमत्ता विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख- १८/०७/२०२६

सही/-
अशिल

सही/-
ॲड. ढेकणे एस.एम.
ॲडव्होकेट
रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि.सोलापूर
मो.नं.८४५९४२०८०३





# विश्वचषक विजेता स्पेन की अर्जेंटिना

**न्यू यॉर्क, १८ जुलै**
फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेचा अंतिम सामना रविवारी न्यू यॉर्क न्यू जर्सी स्टेडियमवर गतविजेता अर्जेंटिना आणि स्पेन संघादरम्यान खेळला जाणार आहे. एकीकडे लिओनेल मेस्सीचा संघ आपले विश्वविजेतेपद कायम राखत चौथ्यांदा विश्वचषक जिंकण्यास उत्सुक आहे, तर तिकडे लॅमिन यामलचा स्पेन संघ पुन्हा एकदा फिफा विश्वचषक जिंकण्यासाठी सज्ज आहे.



लॅमिन यामल व लिओनेल मेस्सी

अर्जेंटिनाने तीन वेळा फिफा विश्वचषक जिंकला आहे. १९७८ मध्ये अर्जेंटिनामध्ये झालेल्या फिफा विश्वचषकात यजमान अर्जेंटिनाने नेदरलँडसचा पराभव करून विश्वचषकाचा मान मिळविला होता. त्यानंतर १९८६ मध्ये मेक्सिकोमध्ये पश्चिम जर्मनीचा पराभव करत अर्जेंटिनाने दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकले आणि २०२२ मध्ये कतारमध्ये फ्रान्सचा पराभव करून अर्जेंटिनाने तिसऱ्यांदा विश्वचषकाचा मान मिळविला होता. आता अर्जेंटिनाला चौथ्यांदा विश्वचषक जिंकून आपले विश्वविजेतेपद कायम राखण्याची उत्तम संधी आहे.

स्पेनने एकदा फिफा विश्वचषक जिंकला आहे. त्यांनी दक्षिण आफ्रिकेत झालेल्या २०१० च्या स्पर्धेत हे एकमेव विजेतेपद पटकावले, जिथे त्यांनी अंतिम सामन्यात नेदरलँड्सचा १-० असा पराभव केला.

ही लढत फिफा विश्वचषकातील सर्वाधिक गोल करणाऱ्या संघाची आणि स्पर्धेतील सर्वात अभेद्य बचावफळीची आहे. अर्जेंटिनाने सात सामन्यांत १९ गोल केले आहेत, तर स्पेनने केवळ एक गोल स्वीकारला आहे; त्यामुळे न्यू यॉर्क-न्यू जर्सी स्टेडियमवर रविवारी होणाऱ्या या महामुकाबल्यात दोन्ही गोलरक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

**अंतिम सामना**
**स्पेन वि. अर्जेंटिना**
**स्थळ :** न्यू यॉर्क न्यू जर्सी स्टेडियम, न्यू यॉर्क
**वेळ :** रात्री १२.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५)

अर्जेंटिनाचा प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेला गोलरक्षक एमिलियानो मार्टिनेझ आणि स्पेनचा शांत आत्मविश्वासाने खेळणारा उनाई सायमन यांच्या खेळण्याच्या शैलीत मोठा फरक आहे. मात्र, एक गोष्ट त्यांच्यात समान आहे, ती म्हणजे ते जगातील सर्वोत्तम गोलरक्षकांच्या यादीत अग्रस्थानी आहेत. मार्टिनेझने कतार २०२२ मध्ये 'अडिडास गोल्डन ग्लोव्ह' जिंकला होता, तर सायमनने युईएफए युरो २०२४ मधील स्पेनच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

उत्तर अमेरिकेत आयोजित या स्पर्धेत दोन्ही गोलरक्षकांचा फॉर्म उत्कृष्ट राहिला आहे आणि त्यांनी आपल्या संघांना विश्वचषकाच्या अंतिम फेरीपर्यंत पोहोचविण्यात मोलाची मदत केली आहे.

सायमनने तब्बल ६५० मिनिटे कोणताही गोल स्वीकारला नाही. या स्पर्धेतील गोल न स्वीकारण्याचा आतापर्यंतचा सर्वात मोठा कालावधी आहे. उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमला त्याच्याविरुद्ध गोल करण्यात यश आले.

मिकेल ओयारझाबलने या स्पर्धेत पाच गोल केले आहेत आणि अशा प्रकारे विश्वचषकातील स्पेनच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. यापूर्वी एमिलिओ बुत्रागेन्योने १९८६ च्या मेक्सिको विश्वचषकात व डेविड व्हिलाने २०१० च्या दक्षिण आफ्रिका विश्वचषकात प्रत्येकी पाच गोल केले होते. स्पर्धेच्या एकाच आवृत्तीत गोलमध्ये योगदान देण्याच्या बाबतीत ओयारझाबल आणि व्हिला संयुक्तपणे स्पेनच्या संघाच्या विक्रमाचे भागीदार आहेत; दोघांनीही प्रत्येकी सहा वेळा योगदान दिले आहे. (वृत्तसंस्था)

# अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास

**न्यू यॉर्क, १८ जुलै**
स्पेन आणि अर्जेंटिनाचा फिफा विश्वचषक २०२६ फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास रोमांचकारी असून आकडेवारी पाहता लिओनेल मेस्सी आणि लॅमिन यामाल हे खेळाडू प्रामुख्याने समोर येतात.

रोद्रीने उत्तर अमेरिकेत ६४८ 'पासेस' पूर्ण केले आहेत – ही विश्वचषकाच्या इतिहासात कोणत्याही एका खेळाडूने नोंदवलेली सर्वाधिक संख्या आहे. या ३० वर्षीय खेळाडूने स्वतःचाच विक्रम मोडला आहे; त्याने कतार २०२२ मध्ये ६३८ पासेस पूर्ण केले होते. या यादीतील त्यानंतरची सर्वोत्तम कामगिरी स्पेनच्याच एका मिडफिल्डरची आहे – ज्यामध्ये झावीने २०१० मध्ये ५९९ यशस्वी पासेस दिले होते. या स्पर्धेत सर्वाधिक पासेस पूर्ण करण्याच्या बाबतीत रोद्रीला त्याचेच सहकारी खेळाडू - पाऊ कुबारसी (५४७) आणि आयमेरिक लॅपोर्ट (५३३) हेच मुख्य आव्हान देत आहेत.

स्पेनचा संघ सलग ३७ सामन्यांत अपराजित राहिला आहे– हा पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील संयुक्त-विक्रम आहे. मार्च २०२४ मध्ये कोलंबियाविरुद्ध १-० ने झालेल्या पराभवानंतर, स्पेनचा संघ २७ सामने जिंकला आहे आणि १० सामने बरोबरीत (ड्रॉ) सोडविले आहेत. याआधी इटलीने २०१८ ते २०२१ या काळात सलग ३७ सामने न हरता खेळण्याचा पराक्रम केला होता, आणि त्यानंतर अर्जेंटिनाने २०१९ ते २०२२ दरम्यान अशीच कामगिरी केली होती.

स्पेनचा विंगर लॅमिन यामाल याने या स्पर्धेत सर्वाधिक 'ड्रिबल्स' पूर्ण केले आहेतः ३०. त्याच्या पाठोपाठ फ्रान्सचा किलियन एमबाप्पे (२४), ब्राझीलचा विनिसियस ज्युनियर (२३), अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी (२२) आणि बेल्जियमचा जेरेमी डोकू (२१) यांचा क्रमांक लागतो.

**जागतिक स्पर्धेत अर्जेंटिनाचे १९ गोल**
अर्जेंटिनाने या जागतिक स्पर्धेत १९ गोल केले आहेत – म्हणजेच सरासरी प्रति सामना २.७१ गोल. १९७० मध्ये ब्राझीलने इतकेच गोल केले होते; त्यानंतर एकाच विश्वचषकात एखाद्या संघाची ही सर्वाधिक गोलसंख्या आहे. याशिवाय चांगली कामगिरी केवळ चार संघांनी केली आहेः १९५० मध्ये ब्राझील (२२ गोल), १९९८ मध्ये फ्रान्स (२३ गोल), १९५४ मध्ये पश्चिम जर्मनी (२५ गोल) आणि त्याच स्पर्धेत हंगेरी (२७ गोल).

स्पेनने १३ गोल केले आहेत. १९८६ मध्ये एमिलिओ बुत्रागुएनोच्या नेतृत्वाखालील संघाने केलेल्या त्यांच्या सर्वोत्तम कामगिरीपेक्षा (११ गोल) ही संख्या दोनने अधिक आहे, तसेच २०१० मध्ये जेतेपद मिळवताना केलेल्या गोलसंख्येपेक्षा (८ गोल) ती पाचने जास्त आहे.

**अर्जेंटिनाचे सलग १३ सामन्यात दोन गोल**
अर्जेंटिनाने सलग १३ सामन्यांत किमान दोन गोल केले आहेत– हा एक विश्वचषक विक्रम आहे. कतार २०२२ मधील त्यांच्या पहिल्या सामन्यात सौदी अरबविरुद्ध २-१ असा पराभव झाला होता, तेव्हाच त्यांनी एका सामन्यात दोन गोल केले नव्हते.

**अर्जेंटिनाचा विश्वचषकात सर्वाधिक विजयांचा विक्रम**
अर्जेंटिनाने खेळलेल्या सर्व सात सामन्यांत विजय मिळवून एका विश्वचषकात सर्वाधिक विजयांचा विक्रम बरोबरीत आणला आहे. २००२ मध्ये ब्राझीलने सर्व सात सामन्यात विजय नोंदविण्याचा विक्रम केला होता. १९३० मधील उरुग्वे, १९३८ मधील इटली आणि १९७० व २००२ मधील ब्राझील यांच्यानंतर, १०० टक्के विजयाचा विक्रम राखत विजेतेपद पटकावणारा अर्जेंटिना हा केवळ पाचवा संघ ठरू शकतो. (वृत्तसंस्था)

**'गोल्डन बूट'च्या शर्यतीत मेस्सी आघाडीवर**
लिओनेल मेसीने या स्पर्धेत आठ गोल केले आहेत. एकाच विश्वचषकात यापेक्षा जास्त गोल करणाऱ्या खेळाडूंमध्ये पोर्तुगालचा युसेबियो (१९६६ मध्ये ९ गोल), ब्राझीलचा अदेमिर द मेनेझेस (१९५० मध्ये ९ गोल), पश्चिम जर्मनीचा गर्ड मुलर (१९७० मध्ये १० गोल), हंगेरीचा सँडोर कोक्सिस (१९५४ मध्ये ११ गोल) आणि फ्रान्सचा जस्ट फॉन्टेन (१९५८ मध्ये १३ गोल) यांचा समावेश आहे. 'अडिडास गोल्डन बूट'च्या शर्यतीत मेसी हा किलियन एमबाप्पेच्या किंचित पुढे आहे; याचे कारण म्हणजे मेसीने चार 'असिस्ट' (गोलसाठी केलेली मदत) केले आहेत, तर एमबाप्पेने तीन केले आहेत. ५६ वर्षांपूर्वी मुलरने १३ गोलमध्ये योगदान दिले होते; त्यानंतर एका विश्वचषकात मेसीचे १२ गोल-योगदान (गोल आणि असिस्ट मिळून) हे कोणत्याही खेळाडूने नोंदवलेले सर्वाधिक योगदान आहे.

# लॉर्ड्सवर निर्णायक वन-डे आज

## निवृत्तीच्या चर्चांच्या पृष्ठभूमीवर सर्वांचे लक्ष रोहितवर

**लंडन, १८ जुलै**
रविवारी लॉर्ड्सवर इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या मालिकेतील निर्णायक तिसऱ्या वन-डे सामन्यात शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ आणि हॅरी ब्रूकच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघ आमने-सामने उभे ठाकणार आहे. सध्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत भारत आणि इंग्लंड १-१ ने बरोबरीवर आहे, तेव्हा भारताला आता वन-डे मालिका जिंकण्याची नामी संधी आहे. यापूर्वी इंग्लंडने भारतविरुद्धची पाच सामन्यांची टी-२० मालिका ४-० ने जिंकली आहे.



या सामन्यात भारताचा 'वन-डे' क्रिकेटमधील दिग्गज रोहित शर्मा मैदानात उतरेल, तेव्हा संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष त्याच्यावर असेल; कारण त्याच्या भविष्याबाबत सध्या जोरदार चर्चा सुरू आहेत. या चर्चेदरम्यान, बीसीसीआयने स्पष्ट केले आहे की हा सामना रोहितचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील शेवटचा सामना नसेल; तरीही, पहिल्या दोन सामन्यांमधील वाईट कामगिरीनंतर स्वतःची क्षमता सिद्ध करण्याचे आव्हान त्याच्यासमोर नक्कीच आहे.

वेगवान गोलंदाजांविरुद्ध सहजतेने फटकेबाजी करणे व फिरकी गोलंदाजांना लीलया हाताळणे ही रोहितची खरी ओळख आहे. मात्र, या मालिकेत आतापर्यंत त्याला आपला नैसर्गिक लय गवसलेली नाही. त्यामुळे, दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या २०२७ च्या वन-डे विश्वचषकापर्यंत तो खेळत राहील का, याबद्दल चर्चांना उधाण आले आहे. लॉर्ड्स येथील फलंदाजीसाठी अनुकूल खेळपट्टीवर रोहितला कदाचित आपला लय पुन्हा मिळवता येईल व मालिकेच्या निर्णायक सामन्यात तो एक दमदार खेळी साकारू शकेल.

संघाचा कर्णधार म्हणून, रोहितने 'पॉवरप्ले'मध्ये आक्रमक भूमिका बजावत पुढाकार घेतला होता. रविवारी त्याला पुन्हा त्याच रूपात पाहण्याची इच्छा तो चाहते बाळगून असतील. पहिल्या १० षटकांमध्ये जोफ्रा आर्चरचा प्रचंड वेग या अनुभवी सलामीवीरासमोरील सर्वात मोठे आव्हान ठरेल.

सध्याचा कर्णधार शुभमन गिल फलंदाजीमध्ये प्रभावी वाटत आहे. तो मोठी शतकी खेळी साकारण्यासाठी नक्कीच उत्सुक असेल. आणखी एक अनुभवी सुपरस्टार विराट कोहली वन-डेमध्ये आपले वर्चस्व गाजवत आहे. गत सामन्यातील अनुभवातून धडा घेत संघ निर्णायक सामन्यासाठी सज्ज होईल. आजारी केएल राहुलच्या जागी खेळताना, ईशान किशन इतर काही फलंदाजांप्रमाणेच 'आखूड टप्प्याच्या चेंडू'चा बळी ठरला. श्रेयस अय्यरने मधल्या फळीत चांगली कामगिरी केली आहे आणि त्याने आत्मविश्वासपूर्ण खेळ दाखविला. (वृत्तसंस्था)

**भारत वि. इंग्लंड तिसरा वन-डे सामना**
**स्थळ :** लॉर्ड्स मैदान, लंडन
**वेळ :** ३.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्सवर

**जिंकल्यास निवृत्ती : कुकुरेला**
**न्यू यॉर्क :** जर रविवारी होणाऱ्या फिफा विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात स्पेन संघाने गतविजेत्या अर्जेंटिनाचा पराभव केला, तर मी आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला पूर्णविराम देऊ शकतो, असे स्पेनचा बचावपटू मार्क कुकुरेला याने जाहीर केले आहे. 'युईएफए युरोपियन चॅम्पियनशिप' आणि 'विश्वचषक' ही दोन्ही जेतेपदे जिंकल्यानंतर माझ्यासाठी साध्य करण्यासारखे फार काही उरणार नाही, असे तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# अंतिम सामना 'सूक्ष्म बाबींवर' ठरेल

**नवी दिल्ली, १८ जुलै**
अर्जेंटिना आणि स्पेन यांच्यातील फिफा विश्वचषकाचा अंतिम सामना हा 'मेस्सी विरुद्ध यामल' या दोन वैयक्तिक ताऱ्यांमधील नव्हे, तर दोन उत्कृष्ट संघांमधील संघर्ष आहे. हा अंतिम सामना 'सूक्ष्म बाबींवर' ठरेल; यात स्पेनची सतत दबाव टाकणारी (प्रेसिंग गेम) शैली आणि अर्जेंटिनाची विजेतेपदाची मानसिकता व दबावाखालील संयम यांच्यात मुख्य लढत असेल, असे मत भारताचे माजी बचावपटू आणि कर्णधार गौरमांगी सिंग यांनी व्यक्त केले.

विश्वचषकांत आतापर्यंत दोन्ही संघांनी खूप उत्कृष्ट कामगिरी केली आहे. दोन्ही संघांनी पूर्णपणे भिन्न, पण तितक्याच प्रभावी शैलीचा उत्तमरीत्या अवलंब करून अंतिम फेरीत स्थान मिळविले आहे, त्यामुळे या अंतिम सामन्यात नक्की कोणाचे पारडे जड आहे, हे सांगणे कठीण आहे. हा सामना अतिशय सूक्ष्म बाबींवर ठरेल, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

## ड्युरंड चषकाचे सात सामने रांचीत होणार

**रांची, १८ जुलै**
प्रतिष्ठेच्या १३५ व्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेतील सात सामने रांची येथे खेळविले जाणार आहेत. या पृष्ठभूमीवर या ठिकाणी ड्युरंड करंडकाच्या प्रदर्शनाचा शुभारंभ करण्यात आला. झारखंडचे क्रीडा मंत्री सुदिव्य कुमार यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेतील सात सामन्यांचे यजमानपद झारखंड भूषवणार असून, या सामन्यांची सुरुवात २६ जुलैपासून होणार आहे. झारखंडची राजधानी रांची एका महत्त्वपूर्ण प्रसंगाची साक्षीदार ठरणार आहे, कारण येथे ड्युरंड कपचे सामने खेळवले जाणार आहेत. आम्हाला एकूण सात सामन्यांचे यजमानपद मिळाले आहे. ड्युरंड चषक सामन्यांसाठी झारखंड सज्ज आहे. (वृत्तसंस्था)

# जागतिक बॅडमिंटन स्पर्धेचा शुभंकर 'पीको'चे अनावरण

**नवी दिल्ली, १८ जुलै**
आगामी १७ ते २३ ऑगस्टदरम्यान भारताच्या यजमानपदाखाली बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन स्पर्धा येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये होणार आहे. शनिवारी येथे केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया आणि बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष व आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमंता बिस्वा सरमा यांच्या हस्ते 'बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, नवी दिल्ली २०२६' साठीच्या अधिकृत शुभंकर 'पीको'चे अनावरण करण्यात आले आणि स्पर्धेचे अधिकृत गीत प्रदर्शित करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे बॅडमिंटनच्या या सर्वात मोठ्या स्पर्धेसाठी ३० दिवसांची अंतिम उलटी मोजणी सुरू झाली आहे. पी.व्ही. सिंधू, लक्ष्य सेन, सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी, चिराग शेट्टी आणि जागतिक स्पर्धेसाठी निवडलेला भारताचा १६ सदस्यांचा संपूर्ण संघ यांचा समावेश असलेले हे गीत, भारतीय बॅडमिंटनची ऊर्जा, महत्त्वाकांक्षा आणि एकता दर्शविते.

**शुभंकर - 'पीको'**
'पीको' असे नाव असलेला हा शुभंकर भारतीय मोराचे प्रतिनिधित्व करतो. मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी आहे, हा पक्षी मूळचा भारतीय उपखंडातील आहे. नवी दिल्लीतील उद्याने आणि ऐतिहासिक वास्तूंच्या परिसरात मोर मोठ्या संख्येने आढळतात, त्यामुळे ते या शहराची एक खास ओळख बनले आहेत. या मोराचा पेहराव एका स्कर्टसारखा आहे, ज्याचा आकार बॅडमिंटनमध्ये वापरले जाणारे फूल उघड्या भागासारखा ठेवण्यात आला आहे; यामुळे त्याला बॅडमिंटनशी संबंधित असा एक वेगळा लूक मिळतो.





१७ वर्षानंतर भारतात होणाऱ्या या सर्वात मोठ्या स्पर्धेच्या पृष्ठभूमीवर, भारतीय बॅडमिंटनचे एक नवीन आणि आधुनिक रूप या गीतातून मांडले आहे. यात सर्व १६ भारतीय खेळाडू पहिल्यांदाच कोर्टाबाहेर एकत्र दिसतात.

भारतीय मोरापासून प्रेरित असलेल्या 'पीको' या अधिकृत शुभंकरासोबतच, हे गीत देशभरातील चाहत्यांशी संवाद साधण्याच्या मोहिमेचे नेतृत्व करेल.

या अनावरण समारंभास साईचे महासंचालक हरी रंजन राव, बीएआयचे सरचिटणीस संजय मिश्रा, भारतीय बॅडमिंटनचे दिग्गज पुलेला गोपीचंद, तसेच वरिष्ठ अधिकारी आणि बॅडमिंटन क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाद्वारे स्पर्धेच्या तयारीच्या अंतिम टप्प्याची अधिकृत सुरुवात झाली. (वृत्तसंस्था)

# पी. व्ही. सिंधू अंतिम फेरीत

**टोकियो, १८ जुलै**
दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू शनिवारी जपान ओपनमध्ये आपल्या कारकिर्दीतील पहिल्या 'सुपर ७५०' स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचली. चीनच्या चेन युफेईने हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे सामना अर्धवट सोडल्याने सिंधूला ही संधी मिळाली. ४४ मिनिटे चाललेल्या या उपांत्य सामन्यात सिंधूचे पूर्ण वर्चस्व होते; चौथ्या मानांकित चेन युफेईने सामना सोडला तेव्हा सिंधू २१-१९, १५-१० अशी आघाडीवर होती.



हा दमदार विजय एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे, कारण गत सात वर्षांत सिंधूने टोकियो २०२० ऑलिम्पिक विजेती चेन युफेईला पराभूत करण्याची कामगिरी पहिल्यांदाच केली आहे. तसेच, २०२४ मधील सय्यद मोदी इंटरनॅशनल स्पर्धेनंतर तिची ही पहिलीच 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर' अंतिम फेरी आहे.

'बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन स्पर्धेला अवघा एक महिना शिल्लक असताना सर्वोत्तम लयीत असलेली सिंधू आता अंतिम सामन्यात विद्यमान जागतिक विजेती अकाने यामागुची हिचा सामना करेल. प्रतिस्पर्ध्याच्या मायदेशात खेळताना, या मोठ्या अंतिम सामन्यात सिंधू जपानी स्टारविरुद्ध १५-१४ अशी अत्यंत निसटती आघाडी घेऊन उतरणार आहे. (वृत्तसंस्था)

# मीराबाई, लवलिना ध्वजवाहक

## राष्ट्रकुल उद्घाटन सोहळा २३ जुलै रोजी

**नवी दिल्ली, १८ जुलै**
ग्लासगो येथे होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात ऑलिम्पिक पदक विजेत्या मीराबाई चानू व लवलिना बोरगोहेन या भारताच्या ध्वज आणि बॅटन वाहक म्हणून जबाबदारी पार पाडतील, अशी घोषणा भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने (आयओए) शनिवारी केली. या बहु-क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन सोहळा २३ जुलै रोजी होणार आहे.



लवलिना बोरगोहेन



मीराबाई चानू

ओव्हीओ हायड्रो येथे मीराबाई व लवलिनाला हा सन्मान मिळणे ही अभिमानाची बाब आहे. मी या दोन्ही खेळाडूंना आणि संपूर्ण पथकाला शुभेच्छा देते, असे आयओएच्या अध्यक्षा पी.टी. उषा यांनी म्हटले आहे.

उद्घाटन सोहळ्यात 'टीम इंडिया'चे प्रतिनिधित्व करण्यासाठी दोन महिलांची निवड होणे ही अभिमानाची गोष्ट आहे; या सोहळ्यामुळेच स्पर्धेचे वातावरणनिर्मिती आणि दिशा निश्चित होणार आहे.

मीराबाई व लवलिना या दोघींनीही आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतासाठी वारंवार आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. सध्या त्या इंग्लंडमध्ये होणाऱ्या या स्पर्धेसाठी पूर्ण निष्ठेने सराव करत आहेत, असेही उषा यांनी नमूद केले.


८ ऑगस्ट रोजी ३२ वर्षांची होणारी मीराबाई ही गत सुमारे एका दशकापासून भारताची आघाडीची भारोत्तोलक आहे. तिने २०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ४९ किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकले होते आणि त्यानंतर २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले होते. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ती कामगिरी करू शकली नाही, तरीही ग्लासगोमध्ये भारताच्या पदकाच्या प्रबळ दावेदारांपैकी ती एक आहे.

दुसरीकडे, लवलिना बोरगोहेनने टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले होते व त्यानंतर २०२३ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविले होते. तिने हँगझोऊ हांगझू येथील २०२३ च्या आशियाड क्रीडा स्पर्धेत रौप्यपदकही जिंकले होते आणि ग्लासगोमध्ये भारताच्या प्रमुख पदक-दावेदारांपैकी ती एक असेल अशी अपेक्षा आहे. (वृत्तसंस्था)

# सोबर्स जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटू : गावस्कर

**नवी दिल्ली, १८ जुलै**
सर गारफील्ड सोबर्स हे जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटू होते. लहानपणी जेव्हा आपण पहिल्यांदा बॅट किंवा चेंडू हातात घेतो, तेव्हा आपल्याला जे काही बनायची स्वप्न पडतात, ते सर्वस्व म्हणजे सोबर्स होते, असे भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी म्हटले आहे. सोबर्स हे अद्वितीय होते, असे मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर म्हणाला.

क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळखले जाणारे सोबर्स यांचे शुक्रवारी बार्बाडोस येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले; त्यांच्या ९० व्या वाढदिवसाला अवघे ११ दिवस शिल्लक असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



सर गारफील्ड सोबर्स

वेस्ट इंडीजसाठी ९३ कसोटी सामने खेळताना, फलंदाज, गोलंदाज आणि क्षेत्ररक्षक अशा तिन्ही आघाड्यांवरील आपल्या उत्कृष्ट कामगिरीने त्यांनी या खेळाच्या कक्षा रुंदावल्या.

क्रिकेटच्या खेळासाठी हा कदाचित सर्वात दुःखद दिवस आहे. जगातील सर्वोत्तम क्रिकेटपटू आता आपल्यात राहिलेले नाहीत. सर गारफील्ड सोबर्स या क्रिकेटपटूचे वर्णन करण्यासाठी शब्दही अपुरे पडतील. लहानपणी जेव्हा आपण बॅट किंवा चेंडू हातात घेतो, तेव्हा आपल्याला जे काही बनायची स्वप्न पडतात, ते सर्वस्व म्हणजे सोबर्स होते, असे गावस्कर म्हणाले.

सचिन तेंडुलकर याने सोबर्स यांच्यासोबत घालवलेल्या वेळेच्या आठवणींना उजाळा दिला. "सर गॅरी आता आपल्यात नाहीत, यावर विश्वास ठेवणे अत्यंत कठीण आहे. मी आमच्या अनेक वर्षांच्या आठवणींना उजाळा देत आहे. २००३ च्या विश्वचषकात त्यांनी माझ्याकडे 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'ची ट्रॉफी सोपवण्यापासून ते शतकाचा टप्पा गाठल्याबद्दल माझा सत्कार करताना त्यांनी काढलेल्या कौतुकास्पद शब्दांपर्यंत. ते नेहमीच अत्यंत प्रेमळ आणि सौजन्यशील होते, असे तेंडुलकर म्हणाला.

काही वर्षांपूर्वी लंडनमध्ये आमची भेट झाली होती, त्या क्षणांची आठवण पुन्हा पुन्हा येत आहे. आम्ही बसून खेळाबद्दल गप्पा मारत होतो आणि ती आमची शेवटची भेट होती. ते खरोखरच 'अद्वितीय' होते. त्यांची खूप आठवण येईल, असे तेंडुलकरने एक्सवर लिहिले. (वृत्तसंस्था)

**एलपीएलमध्ये खेळाडू काळ्या फीत बांधणार**
शनिवारी लंका प्रीमियर लीगमधील खेळाडू सर गारफील्ड सोबर्स यांच्या सन्मानार्थ काळ्या फीत बांधतील.सोबर्स यांचा श्रीलंकेच्या क्रिकेटवर मोठा प्रभाव होता; त्यांनी १९८० च्या दशकाच्या सुरुवातीपासून ते १९८३ पर्यंत राष्ट्रीय संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पाहिले होते. क्रिकेटच्या या महान सुपुत्राप्रती आदर व्यक्त करण्यासाठी, श्रीलंका क्रिकेट आजच्या लंका प्रीमियर लीग सामन्यांच्या सुरुवातीपूर्वी एक मिनिटाचे मौन पाळणार आहे, असे श्रीलंका क्रिकेटच्या निवेदनात म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## महाराष्ट्र विद्यालयाचे एशिया पॅसिफिक ग्रुप ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये यश

**बार्शी, दि. १८ जुलै-**

महाराष्ट्र विद्यालयातील इयत्ता पाचवीच्या तब्बल ३१८ विद्यार्थ्यांनी सामूहिक दिंडी नृत्याचे सादरीकरण करुन 'एशिया पॅसिफिक ग्रुप ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये स्थान मिळवले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार राजेंद्र राऊत तर अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव होते. यावेळी संस्थेचे सचिव पी. टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, रमेश पाटील, डी. बी. पाटील, प्रा. सुरेश लांडगे, विद्यालयाच्या प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भगवान विठ्ठल-रुक्मिणी, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन करचन झाली. प्राचार्या के. डी. धावणे यांनी प्रास्ताविक केले. यानंतर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध, आकर्षक आणि मनमोहक असे सामूहिक दिंडी नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांच्या तालबद्ध सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या विश्वविक्रमासाठी कोल्हापूर येथील सागर बगाडे, राजेंद्र बनसोडे, करण मिरजकर आणि अक्षय कांबळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. त्यांच्या हस्ते सर्व निकषांची पडताळणी करण्यात आली. कार्यक्रमानंतर ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या अधिकृत निकालात महाराष्ट्र विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सर्व निकष यशस्वीरित्या पूर्ण केल्याने 'एशिया पॅसिफिक ग्रुप ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' प्राप्त झाल्याची घोषणा करण्यात आली. यानंतर पंचांनी वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र आणि मानचिन्ह प्राचार्या के. डी. धावणे यांच्याकडे सुपूर्द केले. दिंडी नृत्यासाठी विद्यालयातील सहशिक्षक राजेश पवार यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन के. जी. मदने यांनी केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या डॉ. मिरा यादव, सदस्य एस. बी. शेळवणे व बी. के. भालके, प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### रोहन चव्हाण



**सोलापूर, दि. १८ जुलै-**

रोहन सिद्राम चव्हाण (वय ३१) यांचे १५ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर रुपाभवानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील, दोन भाऊ असा परिवार आहे.

### तम्माराव पाटील



**सोलापूर, दि. १८ जुलै-**

सोलापूर शेगाव (तालुका अक्कलकोट) येथील रहिवाशी तम्माराव शिवप्पा पाटील (वय ७० ) यांचे शनिवारी दि. १८ जुलै रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास निधन झाले त्यांच्यापश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई सुना नातवंडे परिवार आहे. त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंकार करण्यात आले

### गंगाबाई उटगे



**सोलापूर, दि. १८ जुलै-**

श्री मव्द्रिशैव पट्टशाली कोष्टी समाजाच्या जेष्ठ सदस्या गंगाबाई महादेव उटगे (वय ८७) वर्ष यांचे शनिवार दि. १८ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर लिंगायत रुद्रभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चत तीन मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे. श्री मव्दिरशैव पट्टशाली कोष्टी समाजाचे सचिव शिवराज उटगे याच्या त्या मातोश्री होत.

### बेबा जाधव



**मोहोळ, दि. १८ जुलै-**

घोडेश्वर येथील बेबा बाळासाहेब जाधव (वय ५५)यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. घोडेश्वर येथील सामाजिक कार्यकर्ते महेश जाधव यांच्या त्या मातोश्री होत्या.

### राजेंद्र जाधव



**सोलापूर, दि. १८ जुलै-**

कृषिभूषण दत्ताजी देशमुख पतसंस्थेचे माजी चेअरमन राजेंद्र नारायण जाधव यांचे वयाच्या ५६ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

### राजेशम चिलका



**सोलापूर, दि. १८ जुलै-**

नवीन विडी घरकुल येतील रहिवासी राजेशम ईरय्या चिलका दीर्घ आजाराने त्यांचे दिनांक १७ जुलै रोजी निधन झाले. Intas harmaceuticals district Manager कै रमेश चिलका यांचे वडिल होते. मृत्यू समयी ७६ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, एक मुलगा व सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### प्रकाश कस्तुरकर



**सोलापूर, दि. १८ जुलै-**

विजापूर रस्त्यावरील सन्मती नगर येथील व वालचंद कला, शास्त्र महाविद्यालयातील निवृत्त कार्यालय अधीक्षक प्रकाश हरिभाऊ कस्तुरकर (वय ७५) यांचे शनिवारी १८ जुलै सकाळी अल्पशा अजाराने निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन मुले असा परिवार आहे.

# 'विठू माऊली'च्या गजरात जिल्ह्यातील शाळांमध्ये रंगली बालदिंडी

## संतांच्या वेशभूषेत चिमुकले वारकरी मंत्रमुग्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये आज बालदिंडी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात शाळकरी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी पोशाख, तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संतांची हुबेहूब वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. टाळ-मृदंगाचा गजर आणि 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या विठूनामाच्या जयघोषात चिमुकल्यांनी संपूर्ण परिसर भक्तिमय करून सोडला. डोक्यावर तुळशींवृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या सुंदर रूपातील बालके या पालखी सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली.



## पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पंढरपूर

पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये तीनशे विद्यार्थ्यांसह वारकरी दिंडी व वृक्षदिंडी उत्साहात साजरी करण्यात आली. या दिंडी कार्यक्रमास प्रमुख उपस्थित पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी सुधीर पटवर्धन, मुख्याध्यापिका सुनीता मोहोळकर तसेच कमिटी मेंबर्स अपर्णा सुतार व पल्लवी जाधव यांच्या हस्ते विठुल रुक्मिणीच्या मूर्तीचे तसेच पालखीचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य,विठुलाच्या गाण्यांवर नृत्य सादर केले. इयत्ता नर्सरी पासून बाल चिमुकले कोणी पांडुरंग, कोणी रुक्मिणी, कोणी मुक्ताई व वारकऱ्यांच्या वेशभूषेत आले होते. प्रत्येक विद्यार्थ्यांनी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी वृक्ष घेतले होते. छोट्या वारकऱ्यांनी रिंगण सादर केले. याप्रसंगी संस्थेचे सेक्रेटरी माननीय सुधीर पटवर्धन आणि पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका मोहोळकर यांच्या हस्ते मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काळे, जगताप, जाधव, पोरे, शिंदे, दुरुगकर, चोबे, हुच्चे, वीरकर, शहा, क्षितिज मोहोळकर, पृथ्वीराज पाटील, निखिल घोडके, प्रवीण उत्पात उपस्थित होते.

## सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज



सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक शाळा, अकलूज येथे आज (१८ जुलै २०२६) जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पालखी आगमन सोहळ्यानिमित्त दिंडी पालखी सोहळा पार पडला.

या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून हभप ज्ञानेश्वर (माऊली) कदम उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका शेख होत्या. यावेळी सर्व इयत्ता प्रमुख आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजन आणि प्रतिमा पूजनाने झाली. याप्रसंगी वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व अभिरूप पात्र साकारलेल्या विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताई, संत एकनाथ, संत नामदेव आणि संत चोखामेळा यांच्या रूपातील बालसंतांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मुख्याध्यापिका शेख यांच्या हस्ते प्रमुख अतिथी हभप ज्ञानेश्वर कदम सरांचा सन्मान करण्यात आला.

सोहळ्यात प्रशालेतील विद्यार्थिनी शताक्षी बोडके हिने माझे माहेर पंढरी हा अभंग सादर केला. त्यानंतर प्रशालेतील सहशिक्षिका थोरात यांनी सुंदर गवळण व अभंग सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यानंतर प्रशालेतून पालखीची भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक स.मा.वि. प्राथमिक शाळा - सदुभाऊ चौक - महावीर स्तंभ - गांधी चौक - महावीर स्तंभ - सदुभाऊ चौक - स.मा.वि. प्राथमिक शाळा अशा मार्गाने काढण्यात आली. मिरवणुकीत भालदार, चोपदार आणि पोलीस वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या दिंडी सोहळ्यात इयत्ता ३ री व ४ थी चे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षिका हरिनामाचा जयघोष करत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीनंतर प्रशालेच्या प्रांगणात अतिशय शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात 'गोल रिंगण सोहळा' पार पडला. यामध्ये सर्वप्रथम पताकाधारी, हातात तुळस घेतलेल्या विद्यार्थिनी, टाळकरी आणि विणेकरी यांनी रिंगण पूर्ण केले. कार्यक्रमाचे सुंदर क्षणचित्र (छायाचित्र) फोटोग्राफर कादर शेख यांनी कॅमेऱ्यात कैद केले.



## भोसलेवस्ती जिल्हा परिषद शाळा, श्रीपूर

आषाढी एकादशीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोसलेवस्ती (महाळुंग) व मुंडफणेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या बालदिंडीने संपूर्ण परिसर विठुलमय झाला. विद्यार्थ्यांच्या मुखातून घुमणाऱ्या 'ज्ञानोबा-तुकाराम', 'विठुल विठुल जय हरी विठुल' या अखंड नामघोषाने वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. दिंडीत दोन्ही शाळांतील विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विठुल-रुक्मिणी तसेच वारकरी यांची पारंपरिक वेशभूषा परिधान करून आकर्षक सहभाग नोंदविला. टाळ, मृदुंग, वीणा, भगव्या पताका आणि अभंगांच्या गजरात काढण्यात आलेल्या दिंडीने उपस्थित ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. मार्गात ग्रामस्थांनी बालवारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक समीर लोणकर, मोहिनी कलढोणे व इम्रान मुलाणी यांनी विशेष परिश्रम घेतले. पालक नितीन गुंड यांनी सर्व बाल वारकऱ्यांना केळी वाटप केली.

## विवेक वर्धिनी विद्यालय, पंढरपूर



विवेक वर्धिनी विद्यालय या प्रशालेमधील विद्यार्थ्यांनी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर दिंडी सोहळा सादर केला. या दिंडी सोहळ्याची सुरुवात प्राचार्य डॉ. यू.आर मुंढे यांचे हस्ते पालखीचे पूजन करून करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक ए.ए.पवार तसेच सांस्कृतिक विभागातील सर्व शिक्षक शिक्षिका उपस्थित होते. ही दिंडी शहराच्या मध्यवर्ती भागातून काढण्यात आली यामध्ये समाजप्रबोधन पर भारुड ,पथनाट्य ,पर्यावरण विषयक संदेश, विविध संतांची वचने विद्यार्थ्यांनी सांगून प्रबोधन केले. या विद्यार्थ्यांनी काढलेल्या दिंडी सोहळ्याचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष डॉ.मदन क्षीरसागर, उपाध्यक्ष प्रा.शिवाजी वाघ, सचिव ॲड .वैभव टोमके, सहसचिव अजित नडगिरे, खजिनदार सलीम वडगावकर, सुनीता मोरे, ज्येष्ठ संचालक आप्पासाहेब चोपडे, दिलीप घाडगे, अनिरुद्ध सालविठ्ठल, विजयकुमार माळवदकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



## विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल, माळशिरस

आषाढी वारीचे औचित्य साधत विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलमध्ये 'आनंदवारी'चा भक्तिमय, संस्कारमय आणि सांस्कृतिक सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पांडुरंगाच्या पालखीच्या पूजनाने झाली. विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गेजगे सर तसेच विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या इनामदार यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

यावेळी इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी संत चोखामेळा महाराजांचा 'अबीर गुलाल उधळीत रंग' हा अभंग अत्यंत भावपूर्ण पद्धतीने सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच राजमाने यांनी भक्त पुंडलिकाची प्रेरणादायी कथा सांगत भक्ती, सेवा आणि मातृ-पितृभक्तीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून विठुल-रुक्मिणीचे झेंडे, टाळ, मृदुंग, वीणा आणि भगव्या पताका हातात घेत 'ज्ञानोबा-तुकाराम' च्या जयघोषात दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## मारुतीनाना कुलकर्णी विद्यालय, माळशिरस



मारुतीनाना कुलकर्णी प्राथमिक विद्यालयात शुक्रवारी रोजी नवभारत साक्षरता अभियानांतर्गत साक्षरता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक वर्गाला दिंडी क्रमांक व संतांची नावे दिली होती. एकूण नऊ दिंड्या होत्या. या साक्षरता दिंडीतून जनतेला पर्यावरण संवर्धन, प्लास्टिक मुक्ती मोहीम, स्वच्छता अभियान व आरोग्याचे महत्त्व, बेटी बचाओ बेटी पढाओ, शिका साक्षर व्हा! असे सामाजिक संदेश देण्यात आले.



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केडगाव

जेऊर (ता.करमाळा) येथे बाल दिंडी सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात श्री विठुल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ-मृदुंगाच्या गजरात 'ज्ञानोबा-तुकाराम' आणि 'पुंडलिक वरदे हरी विठुल' या जयघोषात गावातून दिंडी काढली. या दिंडीत पालखी, भगवे ध्वज, तुळशी वृंदावन तसेच वारकरी वेशातील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.यावेळी विद्यार्थ्यांनी संतपरंपरेवर आधारित अभंग, भजन, हरिपाठ,कीर्तन,भक्तिगीते तसेच वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविणारे मनमोहक सांस्कृतिक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गावकऱ्यांनीही दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. दिंडीनंतर सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र बसून प्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य शाळेतील सर्व शिक्षक,पालक, ग्रामस्थ आणि शिंदे महाराज तसेच वारकरी मंडळी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# यंदा प्रथमच दर्शनरांगेत २० पत्राशेडची निर्मिती

## आषाढी यात्रा : मंदिर समितीकडून दर्शनरांगेचे सूक्ष्म नियोजन

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ जुलै-**

आषाढी यात्रेनिमित्त श्री विठुल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. या पार्श्वभूमीवर मंदिरे समितीने दर्शनरांगेचे अत्यंत सूक्ष्म नियोजन करून अत्याधुनिक सुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्यामुळे भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित व जलद होत असून, कमीत कमी वेळेत श्रींचे दर्शन घडत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

दर्शनरांगेत भाविकांच्या सोयीसाठी सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे, दिशादर्शक व माहिती फलक, भक्तीसंगीतासाठी अत्याधुनिक ध्वनीप्रणाली, लाईव्ह दर्शनासाठी एलईडी व्हॅन व एलईडी टीव्ही, हरवले-सापडले केंद्र, फॅब्रिकेटेड शौचालये, जेटिंग व सक्शन मशिनद्वारे स्वच्छता व्यवस्था, आयसीयू व प्रथमोपचार केंद्र, पुरेसा वैद्यकीय कर्मचारी, सार्वजनिक सूचना प्रसारण प्रणाली, विश्रांती कक्ष, बसण्याची व्यवस्था, आपत्कालीन मार्ग, अग्निशमन व्यवस्था, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र, अत्याधुनिक विद्युत व्यवस्था तसेच फॅन व कुलरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच अन्नदानेश्वर महाराज व जळगाव सेवा समिती यांच्या माध्यमातून २४ तास अन्नदान सुरू होत असून, मंदिर समितीमार्फत भाविकांना मिनरल वॉटर, चहा, तांदळाची खिचडी व साबुदाणा खिचडी मोफत उपलब्ध करून दिली जात आहे. दर्शनरांगेतील अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाची उड्डाणपुलेही उभारण्यात आली आहेत.

यंदा दर्शन रांगेत कायमस्वरूपी दर्शनमंडपाचे बांधकाम सुरू असल्यामुळे अतिरिक्त पत्राशेड उभारण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, खाजगी जागा उपलब्ध झाल्याने हा प्रश्न मार्गी लागला. त्या ठिकाणी २०० द्व १४० फूट आकाराचे अत्याधुनिक सलग तात्पुरते पत्राशेड उभारण्यात आले आहे. यामुळे दर्शनरांगेत कायमस्वरूपी ४ व अतिरिक्त १६ अशा एकूण २० पत्राशेडची निर्मिती करण्यात आली आहे. अतिरिक्त पत्राशेडपैकी कायमस्वरूपी पत्राशेडच्या अगोदर ६, त्याच्या शेजारी २ आणि श्री लक्ष्मण पाटील मंदिर ते गोपाळपूर या मार्गावर ८ पत्राशेड उभारण्यात आले आहेत.

सलग पत्राशेडमुळे हवा खेळती राहत असून दर्शनरांग अधिक वेगाने पुढे सरकत आहे. तसेच भाविकांचे ऊन व पावसापासून संरक्षण होत आहे. आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन पत्राशेडच्या पुढील व मागील बाजूस पुरेशी मोकळी जागा ठेवण्यात आली आहे. याशिवाय, २४ तास दर्शन व्यवस्था, भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा तात्पुरत्या बंद ठेवणे, घुसखोरी रोखण्यासाठी विशेष उपाययोजना, व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, मॅन-काउंटिंग मशिनचा वापर, प्रशिक्षित कमांडो व सुरक्षा कर्मचारी यांची नियुक्ती आणि इतर प्रभावी नियोजनामुळे दर्शनरांग शिस्तबद्ध व गतिमान झाली आहे, यामुळे भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ व सुखकर होत असून अल्पावधीत श्री

> मंदिर समितीने दर्शनरांगेतील वारकरी भाविकांना केंद्रस्थानी ठेवून केलेले सूक्ष्म नियोजन, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या प्रभावी समन्वयामुळे यंदाची दर्शन व्यवस्था अत्यंत सुरळीत झाली आहे. लाखो वारकऱ्यांना जलद, सुरक्षित आणि सुखकर दर्शन घडत असून भाविकांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद हा मंदिर समितीच्या नियोजनाचा सर्वोत्तम सन्मान आहे.
>
> **गहिनीनाथ महाराज औसेकर,** (सह अध्यक्ष)

## महत्वाचे...



### पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने श्री गजानन महाराज पालखीचे स्वागत

**सोलापूर, दि.१८ जुलै-**

श्रीक्षेत्र शेगांव निवासी श्री संत गजाजन महाराजांची पालखी टाळमृदुंगाचा गजर करत विठ्ठलनामाच्या घोषात कुचन प्रशालेच्या प्रांगणात आगमन झाली. संस्थेनी पालखीच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून वेगवेगळया रंगानी रांगोळी काढून सजविले, रांगोळी व फुलांच्या पायगड्या घातल्या. पद्मशाली शिक्षण संस्थेने पालखी आगमन झाल्यानंतर पालखीचे भव्य स्वागत करुन संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम यांच्या हस्ते पालखीचे स्वागत करुन श्री संतांचे मनोभावे पूजन करुन दर्शन घेतले. यावेळी सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेद्र कोठे हे सपत्नीक उपस्थित राहून पालखीचे दर्शन घेतले. यंदा पालखी आगमनाचे ५७ वे वर्ष होते. प्रशालेच्या प्रांगणात स्वागतासाठी प्रशालेचे बँड पथक सज्ज होते. संध्याकाळी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झालेली होती. माऊलींच्या टाळमृदुंगानी संपूर्ण परिसर दुमदुमून गेले. वारकरी संप्रदाय व भगव्या फताकांनी परिसर फुलून गेले. यावेळी दिनेश यन्नम, मधुकर कट्टा, संगीता इंदापुरे, विजयकुमार गुल्लापल्ली, गणेश गुज्जा, प्रभाकर आरकाल, श्रीनिवास गड्डम, नरेश श्रीराम, अंबादास गज्जम, श्रीनिवास इप्पाकायल, काशीनाथ गड्डम, रामचंद्र जन्नू, कुमुदिनी अंकाराम, यशवंत इंदापुरे, प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, मल्लिकार्जुन जोकारे, प्रणिता सामल आदी उपस्थित होते.



### व्ही.आर. पवार सारीजच्या आषाढी महाबचत सेलला प्रतिसाद : अमर पवार

**५ ते ७०% टक्क्यापर्यंतची महाबचत**

**सोलापूर, दि.१८ जुलै-**

महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या साडी शोरूममध्ये आषाढी महाबचत सेल सुरु झाले असून यामध्ये ५ ते ७०% पर्यंतचे डिस्काउंट देत असून ग्राहकांची महाबचत होत असल्याचे व्ही. आर. पवार सारीज चे संचालक अमर पवार यांनी सांगितले. चाटी गल्ली येथील नावाजलेल्या व्ही. आर. पवार शोरूम मध्ये आषाढी महाबचत सेल सुरू असून यामध्ये ५ ते ७० टक्क्यापर्यंतची महाबचत होऊ शकते असे अमर पवार म्हणाले. काठपदर साडी, कांजीवरम साडी, पैठणी साडी, डिझायनर साड्या, ड्रेस मटेरियल तसेच सुटिंग - शर्टिंगवर ही दर्जानुसार साड्यावर डिस्काउंट ठेवण्यात आलेले आहे. फॅन्सी,स्टोन कसर, सिल्क, मारवाडी पॅटन, ड्रेस मटेरियल मध्ये वन पीस, लेगिन्स, टॉप, कुर्तीज मध्ये उपलब्ध असून याकरिता तरुणींचा मोठया प्रमाणात खरेदीसाठी झुंबड उडाले असल्याचे दिसून येत आहे.सोलापूर शहर, लातूर, धाराशिव, बीड, पुणे, मुंबई येथून खास सेल च्या दरात असलेल्या साड्या खरेदी करण्यासाठी महिला ग्राहकांचा इथे व्ही. आर. पवार सारीज ला आवर्जून भेट देतात. सोलापूर शहर व परिसरातील ग्राहकांनी या आषाढी महाबचत सेल चा लाभ घ्यावा असे आवाहन महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.

### आजारी असतानाही डॉ.सतीश कोपूरवाड घेताहेत आरोग्य व्यवस्थेचा आढावा

**सोलापूर, दि.१८ जुलै -**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड हे स्वत: किडनी स्टोनच्या तीव्र वेदनांमुळे रुग्णालयात उपचारासाठी दाखल असतानाही त्यांनी बेडवरून वारीच्या आरोग्य व्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवले आहे. मागील काही दिवसांपासून त्यांना किडनी स्टोनचा त्रास होत होता. वेदना सहन करत त्यांनी वारीच्या तयारीत कोणतीही कसूर होऊ दिली नाही. मात्र, गुरुवारी प्रकृती अधिक बिघडल्याने डॉक्टरांच्या सल्लयानुसार त्यांना रुग्णालयात दाखल व्हावे लागले. उपचार सुरू असतानाही त्यांनी मोबाइलद्वारे सर्व अधिकारी व कर्मचार्यांच्या संपर्कात राहून दिवसातून दोन ते तीन वेळा व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वारीच्या आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेत आवश्यक सूचना देत आहेत.

पंढरपूर येथे आरोग्य विभागामार्फत उभारण्यात आलेल्या मार्ग शिबिराच्या नियोजनावरही त्यांनी रुग्णालयातूनच लक्ष ठेवले आहे. स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता वारकऱ्यांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देर्णाया डॉ. कोपूरवाड यांच्या या कर्तव्यनिष्ठ वृत्तीबद्दल आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचार्यांकडून अभिमान व्यक्त केला जात आहे. त्यांच्या या सेवाभावी कार्यामुळे आषाढी वारीतील आरोग्य यंत्रणेचे मनोबलही उंचावले आहे.

# पालकमंत्र्यांनी बुलेटवर फिरत केली दर्शन रांग अन् मंदिर परिसराची पाहणी

**▶▶ व्हीआयपी दर्शन बंद झाल्याने भाविकांतून समाधान**

**▶▶ भाविकांशी साधला संवाद; स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे निर्देश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/पंढरपूर, दि. १८ जुलै-**

आषाढी वारी २०२६ च्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज पंढरपूर येथील पत्रा शेडजवळील रिद्धी-सिद्धी दर्शन रांग, वाळवंट, मंदिर परिसर व भक्तीसागर या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी केली. आषाढी वारीच्या सोहळ्यासाठी पंढरपुरात भाविकांची मोठी गर्दी आत्तापासूनच व्हायला सुरुवात झाली आहे. गर्दीमध्ये व्हीआयपी वाहनांचा ताफा नको, म्हणून प्रोटोकॉल बाजूला ठेवून ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी थेट बुलेट वरून पाहणी केली.

यावेळी दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाविकांशी पालकमंत्री गोरे यांनी संवाद साधला व प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधांविषयी विचारपूस केली. दर्शन रांगेतील भाविकांनी प्रशासनाने केलेल्या व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले. पालकमंत्री गोरे म्हणाले, गेल्या दीड महिन्यांपासून प्रशासनाने आषाढी वारीनिमित्त भाविकांसाठी चांगल्या सुविधा निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले आहेत. केलेल्या कामाबद्दल आपण समाधानी असून येथे येणाऱ्या वारकरी-भाविकांचे उत्साहाने



स्वागत करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.

पालकमंत्र्यांनी दर्शन रांगेतील भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या शौचालयाच्या व्यवस्थेची पाहणी केली. शौचालयाची स्वच्छता नियमित राखण्याबाबत त्यांनी मुख्याधिकारी रोकडे यांना निर्देश दिले. तसेच वाळवंट व भक्तीसागर परिसराची पाहणी करून या ठिकाणी स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांना आवश्यक सूचना दिल्या.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविक पंढरपुरात दाखल होत असून त्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. तसेच व्हीआयपी दर्शन बंद झाल्यामुळे सात ते आठ तास भाविकांना ताटकळत उभे राहण्याचा वेळ कमी झाला असल्याचेही त्यांनी सांगितले. पालकमंत्री जयकुमार गोरे हे शासकीय विश्रामगृह ते पत्रा शेड येथील दर्शन रांगेपर्यंत स्वतः बुलेट घेऊन दर्शन रांगेच्या पाहणीसाठी आले, पाठीमागे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन होते. तर दर्शन रांग ते वळवंट परिसरापर्यंत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बुलेट घेतली. यावेळी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्यासह संबंधित ठिकाणचे स्थानिक अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

#### भाविकांना तांदळाच्या खिचडीचे वाटप

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने दर्शन रांगेतील भाविकांसाठी मोफत अन्न दानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आज पालकमंत्री जयकुमार गोरे हे दर्शन रांगेची पाहणी करण्यासाठी आले असताना त्यांनी स्वतः दर्शन रांगेतील भाविकांना तांदळाच्या खिचडीचे वाटप केले.



### संत संगतीमधील 'सुख' हे सर्वोत्तम ह.भ.प.सुधाकर महाराज इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

संत संगती मधील सुख हे सर्वोत्तम सुख असून, ते इतर ठिकाणी कुठेच मिळत नाही. त्यासाठी माऊलींनी वारी परंपरा सुरु केली आहे,असे उद्गार उळे येथील पालखी मुक्कामस्थळी आयोजित कार्यक्रमामधील हभप सुधाकर इंगळे यांनी संत गजानन महाराज पालखी समोरील कीर्तनात काढले. आषाढी वारीनिमित्त हा पालखी सोहळा प्रति वर्षा प्रमाणे यंदाही निघाला आहे. ते पुढे असे म्हणाले की, आषाढी वारी ही परंपरा पायी चालत जाण्याची असली तरी भागाभागा मध्ये पालखीच्या माध्यमातून लोकांना दर्शन मिळावे. सतसंग मिळावा हा दृष्टीकोन ठेऊन मार्गक्रमण केले जात आहे. हा त्यांचा दोन महिन्याचा प्रवास आहे.

संत संगतीचे काय सांगू सुख । या संत उक्ती प्रमाणे विलक्षण सुख प्राप्त करणेसाठी वारी केली पाहिजे. वारी ही महासत्संग असून, संस्काराचा मोठा श्रोत आहे. सध्या याची खूप गरज असलेने पालखी सोहळ्यात संख्या वाढताना दिसत आहे. श्रद्धा आणि संस्कार यांचा मिलाप झाला की, त्याचा परिणाम ताबडतोब दिसून येतो. म्हणून सध्या संख्यात्मक वाढ होताना दिसत आहे. कीर्तन सेवा केल्यामुळे गजानन महाराज पालखी सोहळा प्रमुखांकडून हभप इंगळे महाराज यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी दत्तात्रय क्षीरसागर महाराज, गुरुसिद्ध गायकवाड, अनिकेत भोसले आदींसह स्थानिक भाविकांची मोठी उपस्थिती होती.

### आरोपी पलायन प्रकरणी तीन पोलिस कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**मंगळवेढा, दि. १८ जुलै-**

मंगळवेढा सबजेल मधून एक आरोपी पळून गेल्या प्रकरणी कारागृहावर कर्तव्या बजावर्णाया तिघा पोलीस कर्मचार्यांना पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून कारणे दाखवा नोटीस बजावून खुलास मागविण्यात आल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

या घटनेची हकीकत अशी,यातील आरोपी महेश बंडगर हा कर्नाटकामधील असून तो एका गुन्ह्यात मंगळवेढा सबजेल मध्ये न्यायालयीन कोठडीत होता. सदरचा आरोपी ९ जून रोजी भरदुपारी १२.३५ वाजता तीन पोलीस कर्मचारी कर्तव्यावर असताना त्याने पलायन केले होते. सायंकाळी हजेरी घेतल्यानंतर आरोपी पळाल्याचे पोलीसांच्या लक्षात आले होते. या घटनेनंतर पोलीस दल दारुन गेले. त्याच्या शोधासाठी एक पथक कर्नाटक मध्ये पाठवून त्याचा शोध घेवून त्याला ताब्यात घेण्यात आले होते. तद्नंतर त्याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला. ही गंभीर घटना असल्याने याचा अहवाल मंगळवेढा पोलीस प्रशासनाकडून पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांना पाठविण्यात आला होता. भर दिवसा तीन पोलीस कर्मचारी गार्डवर असताना तो पळून गेल्यामुळे येथील नागरिकामधून उलटसुलट चर्चा सुरु होती. तीन पोलीस कर्मचारी असताना तो कसा केला याबाबत तर्कवितर्क काढले जात होते. यापुर्वीही जुन्या कारागृहामधून आरोपी पळून गेल्याचे ज्वलंत उदाहरण असताना नवीन कारागृह सुरक्षित असताना जुन्या कारागृहात आरोपी आणून ठेवण्यामागे नेमका कोणाचा हात होता? याबाबत तपास होणेही तितकेच महत्वाचे आहे. आरोपी पलयान केल्याप्रकरणी पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून तीन पोलीस कर्मचार्यांना कारणे दाखवा नोटीसा पाठवून खुलासा मागविण्यात आल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. पोलीस अधिक्षक आता यांच्यावर नेमकी काय कारवाई करणार याकडे तमाम मंगळवेढा शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

## सुरतगाव, तामलवाडीत श्री संत गजानन महाराज पालखीचे जंगी स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

श्रीक्षेत्र शेगाव येथून पंढरीच्या विठुरायांच्या भेटीसाठी निघालेल्या संत गजानन महाराज पालखीचे तुळजापूर तालुक्यातील सुरतगाव व तामलवाडी येथे दिंडीतील वारकऱ्यांसाठी फुलांच्या पायघड्या घालून, पुष्पवृष्टी व वाद्यांचा गजर करत जंगी स्वागत करण्यात आले.

सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील सर्वच गावांमध्ये या दिंडीचे स्वागत करण्यात आले. काही भाविकांनी महाप्रसादही वाटप केला. पांढरा पोशाख, डोक्यावर टोपी, कपाळी टिळा, गळ्यात टाळ, खांद्यावर भगवी पताका घेऊन ७०० वारकरी दिंडीत दाखल झाले आहेत. पंढरपूरकडे निघालेल्या श्री गजानन महाराज पालखीतील श्रींच्या दर्शनासाठी तुळजापूर-सोलापूर मार्गावर गावो गावी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या दिंडीने तामलवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत माळुंब्रा येथे प्रवेश केल्यानंतर तामलवाडी पोलिस ठाण्याच्या वतीने सपोनि.



विजय आटोळे, उपनिरीक्षक प्रदीप टेकाळे, ईश्वर नांगरे यांनी श्रींना पुष्पहार अर्पण करून दर्शन घेत स्वागत केले. सांगवी, ( मार्डी ), माळुंब्रा, सांगवी (काटी), सुरतगाव, तामलवाडी आदी ठिकाणी गावकऱ्यांनीही पालखीसह भाविकांचे जोरदार स्वागत केले.

पालखी सोहळा राष्ट्रीय महामार्गावरून येणार असल्याने, रस्त्यावर अनेकांनी जागोजागी अन्नदानाचे स्टॉल उभारले होते. दुपारी १२ वाजता सुरतगाव येथे रस्त्यावर रांगोळीची आरास केली होती. वेशीला आंब्याची पाने, फुलांचे तोरण बांधले होते. सुरतगाव येथे पालखी सोहळ्याचा दोन तासांचा विसावा असल्याने शुक्रवारी संत गजानन महाराज पालखीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी येथे गर्दी केली होती. यावेळी अन्नदाते सतीश पांडुरंग कुलकर्णी, दत्तात्रय महादेव नकाते, विठ्ठल गुंड, सुनील नकाते, राम गुंड, राम कोंडीबा गुंड, ग्रामसेवक भीमराव झाडे, माजी उपसरपंच आण्णासाहेब गुंड विजय देवकर तानाजी गुंड, उपसरपंच बाबासाहेब गुंड, पवन गुंड, विजय नकाते, गणेश नकाते, नागेश नकाते, अजय नकाते, ब्रह्मानंद काळे, देवानंद काळे आदींसह स्थानिक नागरिकांनी वारकऱ्यांची सेवा केली.

#### माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी घेतले श्रींचे दर्शन

संत गजानन महाराज पालखीचे सुरतगाव येथे आगमन झाल्यानंतर तुळजापूर तालुक्याचे माजी आमदार, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी संत गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत केले व महाराजांच्या मुर्तीस पुष्पहार अर्पण करून मनोभावे दर्शन घेतले.

#### वाद्यांच्या गजरात झाली पुष्पवृष्टी

सुरतगावात पालखीचे आगमन होताच, वाद्याच्या गजरात पुष्पवृष्टी करण्यात आली. पालखी विसाव्याच्या ठिकाणी भव्य मंडप उभारण्यात आला होता. त्यात पालखी येऊन थांबताच, सतीश कुलकर्णी परिवाराच्या वतीने श्रींची पूजा करण्यात आली. दिंडीतील वारकऱ्यांसह सुमारे चार हजार भाविकांच्या महाप्रसादाची व्यवस्था यावेळी करण्यात आली होती.

# संत श्री गजानन महाराज पालखीचे टाळ-मृदुंगाच्या गजरात आगमन

## महापौर विनायक कोंड्याल यांच्यासह पदाधिकारी, अधिकाऱ्यांच्या हस्ते पालखीचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जुलै-**

आषाढी वारीनिमित्त शेगाव येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे आज सोलापूर शहरात टाळ-मृदुंगाच्या गजरात, 'गण गण गणात बोते'च्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. रुपाभवानी चौक येथे पालखीचे आगमन होताच सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल व धनश्री कोंड्याल यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, सभागृह नेते नरेंद्र काळे, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे,पोलीस आयुक्त एम राजकुमार, महिला व बालकल्याण सभापती निर्मला जंगम, शहर सुधारणा सभापती स्वाती बडगु. भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर,पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर उपायुक्त सोनाली यादव, नगरसेवक संजय कोळी, अविनाश पाटील, राजकुमार पाटील, नगरसेविका श्रीदेवी फुलारी, राजश्री दोडमनी, श्वेता





#### महापालिकेचे सर्व अधिकारी,कर्मचारी अहोरात्र कार्यरत

सोलापूर शहरात आगमन करणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला सुरक्षित, स्वच्छ आणि सर्व सुविधायुक्त वातावरण मिळावे, ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. त्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, प्रकाश व्यवस्था, मुक्कामाची सोय तसेच आपत्कालीन सेवांची २४ तास उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे. वारकरी हे आपल्या शहराचे मानाचे पाहुणे आहेत. त्यांच्या सेवेत कोणतीही कमतरता राहू नये यासाठी महानगरपालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी अहोरात्र कार्यरत आहेत. संतांच्या आशीर्वादाने आषाढी वारीचा हा सोहळा निर्विघ्न, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पार पडेल, असा विश्वास महापौर कोंड्याल यांनी व्यक्त केला.

खरात, माजी नगरसेवक लता फुटाणे, ॲड. विजय मराठे आदी उपस्थित होते.

१८ व १९ जुलै रोजी सोलापूर शहरात संत श्री गजानन महाराज पालखीचा आहे. वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी महानगरपालिकेने सर्व विभागांना सतर्क ठेवत २४ तास सेवा व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. पालखी मार्गावरील रस्त्यांची आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली. संपूर्ण मार्गावर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणी म्हणजे कुचन प्रशाला, उपलप मंगल कार्यालय येथे पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, आरोग्य सुविधा, प्रकाश व्यवस्था, कचरा व्यवस्थापन यांसह इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, असेही त्यांनली सांगितले.

याप्रसंगी यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी पालखी सोहळ्यादरम्यान शहरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून वाहतूक सुरळीत राहण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आल्याची माहिती दिली. नागरिकांनी वाहतूक सूचनांचे पालन करुन प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सारोळा बु. येथून १२ वर्षीय मुलाचे अपहरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

सारोळा बु. (ता. व जि. धाराशिव) येथील शाळेतून १२ वर्षीय मुलाला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्वज्ञ रमेश पाटील (वय १२, रा. सारोळा बु.) हा शारदा विद्यालय निकेतन हायस्कूल, सारोळा बु. येथे शिक्षण घेत आहे. १२ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी त्याला शाळेतून पळवून नेल्याची तक्रार करण्यात आली आहे.



याप्रकरणी मुलाचे मामा शिवाजी राजेंद्र मसे (वय ५५, रा. सारोळा बु.) यांनी १७ जुलै रोजी फिर्याद दिली. त्यानुसार धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अन्वये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलिसांकडून मुलाचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### क्रिकेटपटू तिलक वर्मा यांनी घेतले तुळजाभवानी देवीचे दर्शन

**तुळजापूर, दि.१८ जुलै -**

भारतीय टी-२० क्रिकेट संघाचे उपकर्णधार तिलक वर्मा यांनी आज श्रीक्षेत्र तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. यावेळी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांनी तिलक वर्मा यांचा देवीची प्रतिमा व प्रसाद देऊन सत्कार केला. यावेळी विधानपरिषदेचे आ. विक्रम काकडे उपस्थित होते. मंदिर संस्थानच्या वतीने तिलक वर्मा यांना आगामी क्रिकेट कारकिर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामोरे, तहसीलदार माया माने, मंदिर संस्थानचे अधिकारी, कर्मचारी, पुजारी बांधव व भाविक उपस्थित होते.

### सुमेध सोनकांबळे याना नीट मध्ये ५०८ गुण

**उमरगा, दि.१८ जुलै -**

उमरगा तालुक्यातील एकोंडी जहागीर येथील सुमेध दत्तात्रय सोनकांबळे यांनी राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट-युजी) मध्ये ५०८ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सुमेध यांनी लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातून बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर नीट परीक्षेची तयारी करून हे यश मिळविले. त्यांच्या यशामुळे एकोंडी जहागीरसह संपूर्ण उमरगा तालुक्यात आनंदाचे वातावरण असून विविध मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार व ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या यशामागे कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास तसेच पालक व शिक्षकांचे मार्गदर्शन असल्याची भावना व्यक्त होत आहे.





### रौफ बागवान यांचा सत्कार

**लोहारा, दि.१८ जुलै -**

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या लोहारा शहराध्यक्षपदी रौफ बागवान यांची निवड झाल्याबद्दल मित्र परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जिल्हा परिषद सदस्य महेश देशमुख, युवक काँग्रेस शहराध्यक्ष प्रकाश होंडराव, संग्राम जगताप, इस्माईल मुल्ला, तुकाराम वाकळे, केशव सरवदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### अणदूरच्या समर्थ लंगडेचे नीट मध्ये ५९४ गुण

**अणदुर, दि.१८ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील सामान्य कुटुंबातील समर्थ मल्लिनाथ लंगडे याने पहिल्याच प्रयत्नात नीट परीक्षेत ५९४ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून त्याचे अभिनंदन होत आहे. कठोर परिश्रम, जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि अथक सरावाच्या बळावर समर्थने हे यश मिळविले. त्याच्या या यशाबद्दल जवाहर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, ॲड. दीपक आलूरे, सरपंच रामचंद्र आलूरे, दीपक घोडके, करबसप्पा धमुरे, साहेबराव घुगे, महादेव मुळे, श्रीकांत अणदूरकर व अविनाश मोकाशे यांनी अभिनंदन केले.





### महाआरोग्य व रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**नळदुर्ग, दि.१८ जुलै -**

पवित्र मोहरम महिन्यानिमित्त पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशन व सिद्धेश्वर रक्तपेढी, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात ७०० रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले, तर ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन नायब तहसीलदार मनीषा कोळगे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते. सोलापूर येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी मूत्रपिंड, हृदयरोग, स्त्रीरोग, मधुमेह, थायरॉईड, अस्थिरोग, मेंदुरोग आदी विविध आजारांवरील तपासणी करून रुग्णांना मोफत औषधे दिली. तसेच शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयामार्फत नेत्रतपासणी करण्यात आली असून मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष शहबाज काझी यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले.

# निकृष्ट मुरुमामुळे बांगरवाडी रस्ता चिखलमय; अडीच किमी प्रवास जीवघेणा



**ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट...**

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१८ जुलै -**

कळंब तालुक्यातील बांगरवाडी गावाच्या एकमेव संपर्क रस्त्याच्या मजबुतीकरणाच्या कामात निकृष्ट दर्जाचा मुरूम वापरण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पावसामुळे सुमारे २६०० मीटरचा रस्ता चिखलमय झाल्याने दुचाकी घसरत असून चारचाकी वाहनेही अडकत आहेत. त्यामुळे ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी आणि नोकरदारांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

येरमाळा-बांगरवाडी या साडेचार किलोमीटर लांबीच्या रस्त्यापैकी २६०० मीटर रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी ३०-५४ योजनेतून निधी मंजूर झाला आहे. मात्र, ठेकेदाराने पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न करता मजबुतीकरणासाठी निकृष्ट दर्जाचा मुरूम टाकल्याने रस्त्यावर दलदल निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या रस्त्यावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, महिला, शेतकरी आणि नोकरदारांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. रुग्णवाहिका किंवा अन्य चारचाकी वाहनातून रुग्णांना दवाखान्यात नेताना अपघात होण्याची भीतीही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणा आणि ठेकेदाराच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने रस्त्याचे मजबुतीकरण पूर्ण करून दर्जेदार खडीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे. अन्यथा पावसाळ्यात गावाचा संपर्क धोक्यात येऊन एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**सरपंचांचे स्पष्टीकरण**

बांगरवाडीचे सरपंच राजाभाऊ बांगर यांनी सांगितले की, रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर काम सुरू करण्यात आले आहे. मजबुतीकरणाचे दोन स्तर पूर्ण झाले असून मुरूम व्हायब्रेटर रोलरने दाबल्यामुळे काही ठिकाणी चिखल होत आहे. ज्या ठिकाणी चिखल निर्माण झाला आहे, तेथे अतिरिक्त मुरूम टाकून नागरिकांची गैरसोय दूर करण्यात येईल.

## सोनम वांगचुक यांच्या शांततापूर्ण आंदोलनावरील कारवाईचा निषेध....

# संवादातून प्रश्न सोडवावेत : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

लडाखचे प्रसिद्ध पर्यावरणवादी, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसेवक सोनम वांगचुक यांच्या शांततापूर्ण व संविधानिक आंदोलनावर करण्यात आलेल्या कारवाईचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) धाराशिवचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात डॉ. पाटील यांनी सांगितले की, सोनम वांगचुक यांनी लडाखमधील पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास, हिमालयीन परिसंस्थेचे संरक्षण तसेच स्थानिक नागरिकांच्या हक्कांसाठी सातत्याने कार्य केले आहे. शिक्षण क्षेत्रातही त्यांनी नाविन्यपूर्ण प्रयोग राबवून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी दिशा दिली असून, पर्यावरण संरक्षण, जलसंधारण, हवामान बदल आणि स्थानिक संस्कृतीच्या जतनासाठी त्यांचे योगदान देशभरात गौरविले जाते.

अशा व्यक्तीच्या शांततापूर्ण आणि संविधानिक आंदोलनावर बळाचा वापर करणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे डॉ. पाटील यांनी नमूद केले. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला शांततेच्या मार्गाने आपले मत व्यक्त करण्याचा आणि आंदोलन करण्याचा अधिकार दिला असून, मतभेदांचे निराकरण दडपशाहीने नव्हे तर संवाद, चर्चा आणि लोकशाही प्रक्रियेतूनच व्हावे, असे त्यांनी म्हटले.

शासनाने सोनम वांगचुक यांच्यासह आंदोलनकर्त्यांशी सकारात्मक संवाद साधून पर्यावरण, स्थानिक नागरिकांचे प्रश्न आणि लडाखच्या संवेदनशील विषयांवर न्याय्य तोडगा काढावा, अशी मागणीही डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली. लोकशाही मूल्ये आणि संविधानिक अधिकारांचा सन्मान राखणे हीच खरी लोकशाहीची ओळख असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जवाहर महाविद्यालयाच्या संशोधकांना भारत सरकारचे पेटंट

## संस्कृत व्याकरणासाठी विकसित केले अभिनव ई-इंक उपकरण

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१८ जुलै -**

अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभागाचे अभ्यासक व संशोधक डॉ. गुरबसप्पा नीलकंठ करपे आणि मुंबईस्थित त्यांच्या भगिनी कल्पना माशाळकर यांनी विकसित केलेल्या 'व्याकरण शिकण्यासाठीचे ई-इंक उपकरण' या अभिनव शैक्षणिक साधनाच्या डिझाइनला भारत सरकारकडून अधिकृत पेटंट मंजूर झाले आहे. या यशामुळे संस्कृत शिक्षण क्षेत्रात अणदूरच्या संशोधकांनी नवा मानाचा तुरा रोवला आहे.



या संशोधन प्रकल्पात सोलापूर येथील ज्येष्ठ विधिज्ञ ड. मल्लिनाथ शहाबादे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भूगर्भशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. मंगेश वेदपाठक यांचाही सहभाग आहे.

भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवणारे हे उपकरण ई-इंक तंत्रज्ञानावर आधारित स्पर्शसंवेदी शैक्षणिक साधन आहे. उपकरणाच्या विविध पृष्ठभागांवर पाणिनींची व्याकरणसूत्रे, रूपरचना-वृक्ष, शब्दनिर्मितीची प्रक्रिया आणि निवडक उदाहरणे प्रदर्शित होतात. उपकरण फिरवत विद्यार्थी संस्कृत व्याकरणातील विविध संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेऊ शकतात. त्यामुळे धातुरूपांपासून शब्दनिर्मिती आणि अर्थविकासापर्यंतचा अभ्यास अधिक सुलभ आणि प्रभावी होतो.

या उपकरणामध्ये एनएफसी तंत्रज्ञानाचाही वापर करण्यात आला आहे. विशेष अध्ययन कार्ड उपकरणाला स्पर्श करताच विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार संस्कृत धडे, आवश्यक सूत्रे, शब्दसंग्रह आणि रूपरचनात्मक विश्लेषण तत्काळ उपलब्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने आणि स्वतःच्या गतीने अध्ययन करणे शक्य होते. हे उपकरण शाळा, महाविद्यालये, गुरुकुल, संस्कृत विद्यापीठे तसेच स्वयंअध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उपयुक्त ठरणार असून, पारंपरिक व्याकरण अध्यापनाला डिजिटल आणि परस्परसंवादी स्वरूप देण्याची क्षमता त्यात आहे. विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत विषयाबाबत आवड निर्माण करण्यासही या नवकल्पनेची मोठी मदत होणार आहे.

या संशोधनाला मिळालेली भारत सरकारची पेटंट मंजुरी ही भारतीय भाषाविज्ञान, शैक्षणिक तंत्रज्ञान आणि संस्कृत शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची उपलब्धी मानली जात असून, पाणिनींच्या व्याकरणशास्त्राला आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर नव्या स्वरूपात सादर करण्याच्या दिशेने हे संशोधन मोलाचे योगदान देणार आहे.

## लोहारा तहसील कार्यालयात २० जुलैला लोकशाही दिन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ जुलै -**

तालुक्यातील नागरिकांच्या शासकीय कामकाजासंदर्भातील तक्रारी व अडचणी सोडविण्यासाठी सोमवार, २० जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता तहसील कार्यालयात लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, नागरिकांनी शासकीय कामाबाबतच्या तक्रारी लेखी स्वरूपात व आवश्यक पुराव्यांसह तहसील कार्यालयात सादर कराव्यात, असे आवाहन तहसीलदार रणजित कोळेकर यांनी केले आहे.

# कळंब पोलिसांची कारवाई : चार चोरीच्या मोटारसायकलींसह एकाला अटक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

कळंब पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणांहून चोरीस गेलेल्या चार मोटारसायकलींचा छडा लावत पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून सुमारे ७० हजार रुपये किमतीच्या चार चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

याबाबत कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११५/२०१५, २८७/२०२६, २८६/२०२६ तसेच कर्नाटक पासिंगच्या ट्विस्टर मोटारसायकल चोरीप्रकरणी स्वतंत्र गुन्हे दाखल होते. या प्रकरणांचा तपास



पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. पोनि. शेख यांच्या नेतृत्वाखाली पोह. अजीज शेख, जुबेर काझी तसेच पोअं. परमेश्वर कदम आणि अमोल माळी यांच्या पथकाने गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे लखन उर्फ रमेश उत्रेश्वर दळवी (रा. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव) याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपीने मोटारसायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याकडून चोरीच्या चार मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# ईट येथे हुंड्यासाठी छळ व अनैतिक संबंधांच्या संशयातून विवाहितेची आत्महत्या; पाच जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

भूम तालुक्यातील ईट येथे २२ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध हुंड्यासाठी छळ आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निकीता अमरनाथ थोरात (वय २२, रा. ईट, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी १४ जुलै २०२६ रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती.

या प्रकरणी जिजाबाई सुदाम कांबळे (रा. लांजेश्वर, ता. भूम) यांनी १७ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून पती अमरनाथ उद्धव थोरात (फौजी), मुद्रुका उद्धव थोरात, उद्धव जगन्नाथ थोरात (सर्व रा. ईट, ता. भूम), तसेच गीता अश्विन मोरे (रा. विमाननगर,





सम्राट चौक, लेन क्र. १४, पुणे) आणि अश्विनी पांडुरंग खवळे (वय २२) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, माहेरहून हुंडा आणण्याची मागणी तसेच पतीच्या कथित अनैतिक संबंधांच्या कारणावरून निकीता यांना शारीरिक व मानसिक त्रास दिला जात होता.

या छळाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी वाशी पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे.

# नळदुर्गमध्ये वसंतराव नाईक स्मारक अंतिम टप्प्यात; शहराच्या पर्यटनाला मिळणार नवी ओळख

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ जुलै -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने गोलाई चौकात उभारण्यात येत असलेले हरीत क्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे भव्य स्मारक अंतिम टप्प्यात पोहोचले असून, लवकरच हे स्मारक पूर्णत्वास येणार आहे. या स्मारकामुळे नळदुर्ग शहराच्या सौंदर्यात भर पडण्याबरोबरच पर्यटनालाही चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून साकार होत असलेल्या या स्मारकासाठी २ कोटी ७७ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. नगरपालिकेमार्फत स्मारकाचे बांधकाम सुरू असून, मराठवाड्यातील वसंतराव नाईक यांचे हे पहिले भव्य स्मारक ठरणार आहे.

नगरपालिकेच्या प्रशासकीय कालावधीत रखडलेल्या या कामाला नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्ष व नगरसेवक मंडळाने गती दिली. सध्या स्मारक परिसरात संरक्षक भिंत, पेव्हर ब्लॉक, लॉन आणि पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असून, आकर्षक उद्यानही विकसित करण्यात येत आहे. वृक्षलागवड पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण प्रकल्प शंभर टक्के पूर्ण होणार आहे.

हे स्मारक सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग, नळदुर्ग-अक्कलकोट मार्ग आणि नळदुर्ग-तुळजापूर मार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे प्रवाशांसाठीही ते आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.



दरम्यान, या प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचा समावेश नसल्याने तो लोकवर्गणीतून उभारावा लागणार आहे. पुतळा उभारल्यानंतरच स्मारकाला पूर्णत्व व अधिक भव्यता प्राप्त होईल.

याबाबत बंजारा समाज तसेच स्थानिक नागरिक काय निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार आणि नगरपालिकेतील सर्व नगरसेवक हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. स्थानिकांच्या मते, हे स्मारक नळदुर्गच्या विकासात आणि पर्यटनवृद्धीत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

## संक्षिप्त...

## नुतन वनपरीमंडळ अधिकारी संतोष बन यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १८ जुलै : येथे वन परिमंडळ अधिकारी म्हणून नव्याने रुजू झालेले संतोष बन यांचा अहमदपूर येथे नुकताच सत्कार करण्यात आला. अहमदपूर येथील वन अधिकारी कार्यालयात वनपरीमंडळ अधिकारी म्हणून रुजू झाले असून त्यांचा नुकताच सत्कार भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी केला. संतोष बन कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून परिचित आहेत. या अगोदर निलंगा, लातूर येथे वन विभागात सेवा केली असून आता अहमदपूर येथे वन परिमंडळ अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत.

आजपर्यंत केलेल्या कामाची दखल घेऊन नुतन वनपरीमंडळ अधिकारी संतोष बन यांचा सत्कार गोविंद गिरी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी हरिश्र्चंद्र गिरी, संकेत गिरी,सोमनाथ गिरी,विजय पुरी, बालाजी गिरी, डॉ. सुधाकर मुरुडकर,सौ.सविता गिरी,श्रीधर गिरी, संजय पुरी, बळीराम पुरी यांच्या सह अनेकजण उपस्थित होते.

## शहरातील मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १८ जुलै : शहरामध्ये मोकाट भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्र्न अत्यंत गंभीर बनला आहे. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करताना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून, कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनांमध्येही सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे भटक्या व मोकाट कूत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

या गंभीर समस्येबाबत नगर परिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अहमदपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना नगरसेविका सौ.तनूजाताई सिद्धार्थकुमार सूर्यवंशी व माजी नगरसेवक डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.

यापूर्वीही या प्रश्र्नासंदर्भात नगर परिषदे कडे निवेदन देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अहमदपूर शहरातील मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करून नागरिकांच्या जीवित व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात, तसेच मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी प्रभावी मोहीम राबविण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नगर परिषद प्रशासनाने या प्रश्र्नाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती नागरिकांसमोर जाहीर करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

सदर निवेदन अहमदपूर नगर परिषदेचे माजी गटनेता तथा नगरसेवक डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी आणि नगरसेविका सौ. तनुजाताई सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## टी. सी. हरवली आहे

बापूराव अशोकराव भोसले या नावाची टि.सी. हरवली आहे. लातूर येथून चाकूर कडे दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता बसने लातूर येथून चाकूर कडे प्रवास करीत असताना शाहू विद्यालय, शेळगावची बापूराव अशोकराव पाटील या नावाची दहावी पासची टि. सी. व इतर शैक्षणिक साहित्य हरवले आहेत.

टि. सी. व कागदपत्रे सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावे.

बापूराव अशोकराव भोसले मु. पोस्ट. शेळगाव
ता.चाकूर जि.लातूर
मो. ८७८८०३३६००

# औशात कृषी विज्ञान केंद्रांसाठी केंद्रीय कृषिमंत्री सकारात्मक आ. अभिमन्यू पवार यांचा पाठपुरावा



तभा वृत्तसेवा

औसा दि. १८ जुलै : केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची दिल्ली येथे भेट घेऊन औसा मतदारसंघातील विविध कृषीविषयक प्रश्र्नांबाबत आ. अभिमन्यू पवार यांनी सविस्तर चर्चा केली. तसेच औसा येथे स्वतंत्र कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्याच्या मागणीचा त्यांनी पुन्हा पाठपुरावा केला.

औसा व परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, संशोधन, प्रशिक्षण आणि वैज्ञानिक मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, यासाठी औसा येथे स्वतंत्र कृषी विज्ञान केंद्राला लवकरात लवकर मंजुरी देण्याची विनंती यावेळी करण्यात आली. या मागणीवर केंद्रीय कृषिमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिल्याचे पवार यांनी सांगितले.यावेळी आमदार पवार यांनी 'जी राम जी' या पूर्वीची मनरेगा योजनेतील एका महत्त्वाच्या मुद्द्याकडेही केंद्रीय मंत्र्यांचे लक्ष वेधले. सध्या या योजनेत नवीन सिंचन विहिरीसाठी अनुदान उपलब्ध असले तरी जुन्या विहिरींचे खोलीकरण आणि गाळ उपसा करण्यासाठी कोणतेही अनुदान मिळत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

अनेक शेतकऱ्यांकडे मोठ्या क्षेत्रावर शेती असूनही आर्थिक मर्यादांमुळे त्यांना नवीन विहीर घेणे किंवा जुन्या विहिरींचे खोलीकरण करणे शक्य होत नाही. परिणामी सिंचनाची क्षमता कमी होत असून शेती क्षेत्रावर त्याचा परिणाम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या योजनेतून जुन्या विहिरींचे खोलीकरण व गाळ उपसा या कामांनाही अनुदानाचा लाभ देण्याचा निर्णय घ्यावा.अशी मागणी त्यांनी केली.

आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी केलेल्या मागण्याचा केंद्रीय कृषिमंत्र्यांनी सकारात्मक दखल घेत राज्य सरकारकडून तसा प्रस्ताव पाठवा, आम्ही मंजुरी देऊ. असे आश्र्वासन दिल्याची माहिती आ. अभिमन्यू पवार यांनी दिली.

या संदर्भात राज्य सरकारशी समन्वय साधून मुख्यमंत्री यांच्याकडेही हा विषय मांडण्यात येणार असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या या मागण्यांसाठी पुढील काळात सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

## निलंगा एस.टी.आगारात नवीन बसेस चे लोकार्पण सोहळा उत्साहात



तभा वृत्तसेवा

निलंगा - निलंगा एस टी आगारात नव्याने दाखल झालेल्या राजमाता जिजाऊ या बसेस चा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने लातूर जिल्ह्यास देण्यात आलेल्या नवीन बसेसपैकी निलंगा आगारास पाच राजमाता जिजाऊ बसेस देण्यात आले असून या नवीन एस टी बसेस चा लोकार्पण सोहळा शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी शिवाजी माने, जिल्हा प्रमुख, शिवसेना (शिंदे गट), लातूर व नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या शुभहस्ते विधिवत पूजन करून मोठ्या थाटामाटात व उत्साहात संपन्न झाला.

यावेळी नवीन बसेस फुगे व फुलांनी सजविण्यात आल्या होत्या. उपस्थित मान्यवरांनी बसेसची पाहणी करून बसमधून प्रवास करत समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजी माने, नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, नगरसेवक ईश्र्वर पाटील, शिवसेना महिला प्रमुख रेखा पुजारी, हरिभाऊ सगरे, पिंटू पांचाळ , आगार व्यवस्थापक अनिल बिडवे, मच्छिंद्र कोळी, दत्तू जाधव, प्रमोद जीवणे, रूपसेन जाधव, शरद पवार, आगारातील सर्व अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.

# रघुवीर सांगुळे यांचा सेवापूर्ती कार्य गौरव सोहळा



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १८ जुलै : तालुक्यातील तांबटसांगवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रघुवीर सांगुळे हे ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने शालेय व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांच्या वतीने तांबटसांगवी येथील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात सेवापूर्ती कार्य गौरव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. कृष्णदास महाराज सताळकर यांची तर प्रमुख अतिथी केंद्रप्रमुख अरविंद पुलगूर्ले, केंद्रीय मुख्याध्यापक दत्तात्रय गुरमे, भारत रोकडे, बालाजी शिंदे, तुकाराम पलमंटे, भिवाजी पवार, मारुती कदम, राजकुमार चामे, ज्ञानोबा जाधव,बळीराम जटाळ, वसंत भोसले,किशन चव्हाण, बालासाहेब तिर्थकर, जीवन नवटक्के,हरिबाई बिरादार मॅडम, भोसले मॅडम, मिनाक्षी पाटील मॅडम,महात्मा गांधी महाविद्यालयाचे उपप्राचार्य रोहिदास कदम,भाजपा जिल्हा सरचिटणीस रामानंद मुंडे, लांजी- तांबटसांगवीचे सरपंच कालिदास कदम,अभंग गंगाबोणे, गणेश तिर्थकर,दिपक भदाडे,सत्कारमूर्ती रघुवीर सांगुळे,सौ.रेखा सांगुळे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक एस.जी.कांबळे सौ. मिनाक्षी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सेवापूर्तीचे सत्कारमूर्ती रघुवीर सांगुळे यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक,सामाजिक, धार्मिक कार्याचा गौरव ह.भ.प.कृष्णदास महाराज, रोहिदास कदम, बालाजी शिंदे, वैजनाथ कदम, मारोती कदम , तुकाराम पलमंटे ,भारत रोकडे, कालीदास कदम, दत्तात्रय गुरमे,यांच्या मनोगतातून व्यक्त करण्यात आला, तर सत्कारमूर्ती रघुवीर सांगुळे यांनी आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील सुरुवात ते सेवापूर्ती सोहळ्याच्या दिवसा पर्यंतच्या ३९ वर्ष केलेल्या सेवेच्या जिवनातील प्रवासाची माहिती देत शालेय शिक्षण समिती व ग्रामस्थांनी केलेला सेवापूर्ती सत्कार सोहळा माझ्या जिवनातील महत्वपूर्ण क्षण असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जीवन नवटक्के यांनी केले तर प्रास्ताविक सटवाजी कांबळे, उपस्थितांचे आभार शिवसेना तालुका संघटक तथा एस टी कामगार सेना प्रमुख मार्गदर्शक अनिकेत फुलारी यांनी मानले.

यावेळी शालेय शिक्षण समिती व ग्रामस्थांच्या वतीने सत्कारमूर्ती रघुवीर सांगुळे,सौ.रेखाताई सांगुळे, मुख्याध्यापक एस.जी.कांबळे सौ.मिनाक्षी कांबळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा.सरपंच संतोष कदम, शालेय समितीचे अध्यक्ष हनुमंत कदम, उपाध्यक्ष सोपान कदम गावातील जेष्ठ नागरिक विठ्ठलराव कदम, किशनराव नरवटे,नरवटे,राजपंगे, गोपाळ राजपंगे, बालाजी कदम, शिवाजी कदम, भोसले, कदम, पुंडलिक कदम, मदतनीस पार्वती सोळंके, सुनिता सोळंके,संताबाई नरवटे, गावातील युवक,नागरिक, महिला, विद्यार्थी, पालक यांची उपस्थिती होती.

## दोन मोटारसायकलच्या अपघातात एकाचा मृत्य, एक जण गंभीर जखमी



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १८ जुलै : चाकूर तालुक्यातील घरणी येथे दोन मोटारसायकलींच्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. गंभीर व्यक्तीवर चाकूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला शासकीय रुग्णालय, लातूर येथे पाठविण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,चाकूर तालुक्यातील लातूर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील घरणी गावाजवळ, ग्रामीण आयटीआयसमोर मोटारसायकल क्रमांक एम .एच.२४ बि.सी.९३८३ आणि एम.एच.५५ डी.७६०७ या दोन मोटारसायकलीची समोरासमोर धडक झाली.या भीषण अपघातात देविदास सखाराम चव्हाण वय ५० वर्षे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. ते अहमदपूर तालुक्यातील वरवटी तांडा येथील रहिवासी असल्याचे समजते.तर शेख रहमान गुलाब वय २२ वर्षे रा. चाकूर हे गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले.जखमी शेख रहमान यांना तातडीने चाकूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करून प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना लातूर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे.या घटनेचा पुढील तपास चाकूर पोलीस करीत आहेत.

## तनिष्का पाटीलची NEETमध्ये देशात ६०२ वी रँक



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ, दि. १८ जुलै : येथील कु. तनिष्का शिवानंद पाटील हिने छएएढ-२०२६ परीक्षेत ६६७ गुण मिळवत देशभरातील सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांमधून ६०२ वा क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या दैदिप्यमान यशामुळे शिरूर अनंतपाळच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

तनिष्का ही लातूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. संभाजीराव पाटील व ॲड. जयश्रीताई पाटील यांची नात असून, डॉ. वृषाली शिवानंद पाटील यांची कन्या आहे.

तिच्या यशाबद्दल काँग्रेस पक्षाचे नेते बसवराज मठपती तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी तिचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी ॲड. संभाजीराव पाटील, ॲड. जयश्रीताई पाटील, डॉ. वृषाली शिवानंद पाटील, सेवानिवृत्त शिक्षक महादेव पारशेटे, उमाकांत सिंदाळकर, माधव बैलेवाड, बालाजी कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना महादेव आवाळे म्हणाले, अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर तनिष्काने हे यश संपादन केले आहे. तिचे हे यश केवळ तिच्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण शिरूर अनंतपाळसाठी अभिमानाची बाब आहे. वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तनिष्काची यशोगाथा निश्र्चितच प्रेरणादायी ठरेल.

तनिष्काच्या या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, मित्रपरिवार व नागरिकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# सुश्रुत जयंतीनिमित्त समता आयुर्वेदिक महाविद्यालयात 'अग्नी विद्ध कर्म' विषयावर एकदिवसीय सीएमई व हँड्स–ऑन कार्यशाळा उत्साहात




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १८ जुलै : समता आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, आलंद येथील शल्यतंत्र विभागाच्या वतीने सुश्रुत जयंतीनिमित्त अग्नी विद्ध कर्म या विषयावर एकदिवसीय सतत वैद्यकीय शिक्षण (उचए) व हँड्स-ऑन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या शैक्षणिक उपक्रमास राज्यभरातील आयुर्वेद क्षेत्रातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक आणि वैद्य यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात नोंदणी व अल्पोपहाराने झाली. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. शन्मुकप्पा इरन्नावर, एम.एस. (आयु.), पीएच.डी., प्राध्यापक व विभागप्रमुख, शल्यतंत्र विभाग यांनी भूषविले. त्यांनी उपस्थित मान्यवर व सहभागींचे स्वागत करत आचार्य सुश्रुत यांच्या शल्यवैद्यकीय परंपरेचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. एम. डी. समुद्री, एम.एस. (आयु.), प्राचार्य व वैद्यकीय अधीक्षक, संशोधक, आयुर्वेदिक शल्यचिकित्सक व शिक्षणतज्ज्ञ यांनी शल्यचिकित्सा व्यवहारातील अनुशस्त्र कर्माची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक वैद्यकीय उपचारपद्धतीमध्ये पारंपरिक आयुर्वेदिक शल्यक्रियांचे महत्त्व अधोरेखित करत युवा आयुर्वेदिक शल्यचिकित्सकांनी व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. चंद्रकुमार देशमुख, बीएएमएस, डीवायएनडी (सुवर्णपदक विजेते), आयुर्वेद आचार्य व विद्ध कर्म तज्ज्ञ, पुणे यांनी विद्ध अग्नी कर्माचे प्रात्यक्षिक व हँड्स-ऑन प्रशिक्षण या विषयावर सविस्तर व्याख्यान देत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. त्यांनी अग्नी विद्ध कर्माची तत्त्वे, संकेत, निषिद्धता, आवश्यक उपकरणे, कार्यपद्धती, खबरदारी तसेच उपचारानंतरची काळजी याबाबत सखोल माहिती दिली.

कार्यशाळेत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, हँड्स-ऑन प्रशिक्षण, केस चर्चा, पॅनेल चर्चा आणि संवादात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले. वैज्ञानिक सत्रांमध्ये अग्निकर्म व विद्धकर्माची मूलतत्त्वे, पुराव्यावर आधारित वेदना व्यवस्थापन, सुरक्षिततेचे निकष आणि गुंतागुंत व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या थेट क्लिनिकल सत्रामध्ये विविध अस्थि-स्नायू व वेदनासंबंधित विकारांनी ग्रस्त ३० हून अधिक रुग्णांवर तज्ज्ञांच्या देखरेखीखाली अग्नी कर्म व विद्ध कर्म उपचार करण्यात आले.. या उपचारांमुळे रुग्णांना लक्षणीय आराम मिळाल्याचे दिसून आले. तसेच सहभागी डॉक्टर व विद्यार्थ्यांना रुग्णांचे मूल्यमापन, उपचार पद्धती आणि उपचारानंतरची काळजी याबाबत प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

या सीएमईमध्ये विविध महाविद्यालयांतील ५०० हून अधिक विद्यार्थी, इंटर्न, पदव्युत्तर विद्यार्थी, प्राध्यापक आणि आयुर्वेदिक वैद्यांनी सहभाग घेतला. सहभागींच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आयुर्वेदिक शल्यचिकित्सा आणि कौशल्याधारित शिक्षणाबाबत वाढत असलेली जागरूकता अधोरेखित झाली.

समारोप समारंभात सहभागींचे अभिप्राय घेऊन प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्ता, व्यावहारिक प्रशिक्षण आणि आयुर्वेद क्षेत्रातील व्यावसायिकांचे ज्ञान व क्लिनिकल कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल या सीएमईचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

# महाराष्ट्र महाविद्यालयास शैक्षणिक, प्रशासकीय अंकेक्षणात 'ओ' ग्रेड



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १८ जुलै : येथील महाराष्ट्र महाविद्यालयास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामार्फत राबवण्यात आलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण (---) प्रक्रियेत 'ज' ग्रेड (उत्कृष्ट) प्राप्त झाला आहे. या अंकेक्षणात महाविद्यालयास ८०० पैकी ७७० गुण मिळाले असून ९६.२५% गुण प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र महाविद्यालयाने शै.वर्ष २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षात राबवलेल्या विविध शैक्षणिक, शिक्षणेत्तर, सामाजिक, संशोधनपर व सांस्कृतिक उपक्रमांचे मुल्यमापन विद्यापीठाच्या तज्ञ समितीने केले व त्याद्वारे हा ग्रेड प्रदान करण्यात आला.

सदरील अंकेक्षण महाविद्यालयांच्या गुणवत्ता सुधार योजनेचा एक भाग असून विद्यापीठ परिक्षेत्रातील मोजक्याच महाविद्यालयांना 'ज' ग्रेड मिळवण्यात यश आले आहे.

या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष मा. विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी कौतुक केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी, समिती समन्वयक डॉ. नरेश पिनमकर, सदस्यदत्ता माने, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तसेच विद्यार्थ्यांचे या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्गात ५३ व्या वर्षी भागवत सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ जुलै -**
नळदुर्ग येथील आदर्श शिक्षक वसंतराव अहंकारी यांच्या निवासस्थानी २३ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पारंपरिक भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, येथे सन १९७३ पासून सलग ५३ वर्षांपासून भागवत सप्ताह साजरा होत असून ही एक दुर्मिळ परंपरा कायम राखली जात आहे.

सप्ताहास २३ जुलै रोजी सकाळी ७ वाजता प्रारंभ होणार असून २७ जुलै रोजी गोवर्धन काला, २८ जुलै रोजी सुदामाचे पोहे ही कथा आणि २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी सप्ताहाची सांगता होणार आहे. केज येथील वेदशास्त्र संपन्न श्रीराम जोशी बुवा महाराज गेल्या २० वर्षांपासून भागवत कथा निरूपण करत आहेत.

या सप्ताहात मोठ्या संख्येने भाविक, विशेषतः महिला, उपस्थित राहतात. सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहंकारी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



# तुळजापूर शहराच्या विविध विकासकामांसाठी ५ कोटींचा निधी मंजूर

## खासदार ओमराजे निंबाळकरांच्या पाठपुराव्याला यश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**
तुळजापूर शहरातील प्रलंबित नागरी विकासकामांना गती देण्यासाठी खासदार ओम राजे निंबाळकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने तुळजापूर नगरपरिषदेसाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

१७ जुलै २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, रस्ता अनुदान (अनिवार्य) योजनेअंतर्गत ४ कोटी ४५ लाख रुपये तर वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत ५५ लाख रुपये, असा एकूण ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीतून शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांचे मजबुतीकरण व काँक्रीटीकरण, भूमिगत गटारे, नाल्यांची उभारणी, पावसाच्या पाण्याचा निचरा तसेच अन्य आवश्यक नागरी विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. त्यामुळे नागरिकांना मूलभूत सुविधांचा लाभ मिळण्यासह तुळजापूरच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.



खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक प्रलंबित विकासकामे आता मार्गी लागणार असल्याचे सांगितले जात आहे.

याबद्दल खासदार निंबाळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार मानले. मंजूर झालेली सर्व विकासकामे दर्जेदार आणि विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# नळदुर्गमध्ये कल्याण मटका अड्ड्यावर छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**
नळदुर्ग पोलिसांनी जुगारविरोधी कारवाई करत




खंडोबा मंदिराजवळील जुन्या दवाखान्यासमोरील परिसरात कल्याण मटका जुगार अड्ड्यावर छापा टाकून २,८०० रुपयांचे जुगार साहित्य व रोख रक्कम जप्त केली. या प्रकरणी विश्वनाथ मनोहर करपे (वय ४६, रा. अणदूर, ता. तुळजापूर) यांच्याविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धाराशिवमध्ये केंद्रीय विद्यालयाचा मार्ग मोकळा...

# जागेचा प्रश्न निकाली, सोमवारी पाहणीसाठी केव्हीएस पथक येणार : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**
धाराशिव येथे प्रस्तावित केंद्रीय विद्यालयाच्या स्थापनेतील सर्वात मोठा अडसर असलेला जागेचा प्रश्न निकाली निघाल्याने विद्यालय सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्रीय विद्यालय संघटनेचे (केव्हीएस) पथक सोमवारी धाराशिव येथे येऊन प्रस्तावित तात्पुरत्या व कायमस्वरूपी जागेची पाहणी करणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून तसेच जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून केंद्रीय विद्यालयासाठी आवश्यक अटी पूर्ण करण्यात आल्या आहेत. तात्पुरती व कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या निवासी वसाहतीमागील सुमारे पाच एकर शासकीय जागा कायमस्वरूपी विद्यालयासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्रीय विद्यालय संघटनेकडे पाठविण्यात आला आहे.

केव्हीएसचे पथक या जागेसह तात्पुरत्या इमारतीची व आवश्यक पायाभूत सुविधांची पाहणी करून अहवाल केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करणार आहे. मंजुरी मिळाल्यानंतर केंद्रीय विद्यालय सुरू करण्याचा आदेश जारी होणार आहे.



आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले की, केंद्रीय विद्यालयासाठी तात्पुरत्या स्वरूपात डीआयसी रोडवरील जिल्हा परिषदेची प्रशस्त इमारत उपलब्ध करून देण्याचा ठराव यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार डाएट इमारतीसमोरील जिल्हा परिषद प्रशालेतील २५ वर्गखोल्या, सुसज्ज ग्रंथालय, मोठे सभागृह, वाहनतळ आणि सुमारे तीन एकर जागा केंद्रीय विद्यालयासाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

केंद्रीय विद्यालय सुरू झाल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना सीबीएसई अभ्यासक्रमावर आधारित राष्ट्रीय दर्जाचे शिक्षण, आधुनिक प्रयोगशाळा, संगणक शिक्षण, क्रीडा व सहशैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील. तसेच गएए, छएएढ, छऊ आणि उणएढ यांसारख्या राष्ट्रीय स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे.

याशिवाय, केंद्रीय व राज्य सरकारी कर्मचारी तसेच संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणात सातत्य राहण्यास मदत होईल. पुणे, सोलापूर आणि लातूरसारख्या शहरांमध्ये शिक्षणासाठी स्थलांतर करण्याची गरज कमी होऊन पालकांचा आर्थिक भार हलका होईल. त्यामुळे धाराशिवच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होऊन जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# तामलवाडीत ८.४१ लाखांचा प्रतिबंधित गुटखा व कार जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**
तामलवाडी पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करत तुळजापूर-सोलापूर महामार्गावरील माळुंब्रा गावाजवळ ८ लाख ४१ हजार २२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार जप्त केली. या प्रकरणी बीड जिल्ह्यातील एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तामलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आटोळे यांना महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या विमल पान मसाल्याची (गुटखा) अवैध वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार १७ जुलै रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास तुळजापूर-सोलापूर महामार्गावरील माळुंब्रा गावाजवळ सापळा रचण्यात आला.

यावेळी एमएच-४६-पी-३४७१ क्रमांकाची मारुती सुझुकी स्विफ्ट कार अडवून तपासणी केली असता, चालक अशोक गोरख गिते (वय २४, रा. मंजरी घाट, पो. पाचगरी, ता. पाटोदा, जि. बीड) याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी कारची झडती घेतली असता १,५४० केसरयुक्त विमल पान मसाला पुडे व १,६५० व्ही-१ तंबाखू पुडे, असा ३ लाख ४ हजार २२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला.



पोलिसांनी गुटख्यासह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ८ लाख ४१ हजार २२० रुपये आहे.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील संबंधित तरतुदींनुसार तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आटोळे, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप टेकाळे तसेच त्यांच्या पथकाने केली.

दरम्यान, महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा व सुगंधित तंबाखूची विक्री, साठवणूक किंवा वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ तामलवाडी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# मोबाईल हॅक करून निवृत्त शिक्षकाची ४.९९ लाखांची ऑनलाइन फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**
लोहारा येथील एका ज्येष्ठ नागरिकाचा मोबाईल हॅक करून सायबर गुन्हेगारांनी ४ लाख ९९ हजार २२० रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी धाराशिव सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैजनाथ शिवलिंगअप्पा होळकुंदे (वय ६१, रा. शिक्षक कॉलनी, पाटोदा रोड, लोहारा, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांचा मोबाईल २३ जून २०२६ रोजी सायंकाळी ५.४५ ते २४ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजण्यापूर्वी अज्ञात व्यक्तीने हॅक केला. त्यानंतर त्यांच्या खात्यातून विविध व्यवहार करून ४,९९,२२० रुपयांची फसवणूक करण्यात आली.

याप्रकरणी वैजनाथ होळकुंदे यांनी १७ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये नेल्सन मंडेला जागतिक दिन उत्साहात साजरा




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**
पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली नेल्सन मंडेला जागतिक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मानवता, सेवा, समानता, शांतता आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नेल्सन मंडेला यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची, वर्णद्वेषाविरुद्धच्या त्यांच्या संघर्षाची तसेच मानवतेसाठी दिलेल्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांनी भाषणे, विचारमांडणी, घोषवाक्य लेखन तसेच समाजसेवा आणि स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्वतःसाठी नव्हे, तर समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी, असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

या कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता पाचवीचे वर्गशिक्षक आदर्श कांबळे आणि कार्यक्रमाधिकारी सुप्रिया रायगुडे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांनी विद्यार्थ्यांना नेल्सन मंडेला यांच्या विचारांचे अनुसरण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या शिक्षकांनी केले.

# नगरपालिकेच्या कारवाईला सुरुवात; नळदुर्ग शहर डुक्करमुक्तीच्या दिशेने

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ जुलै -**
नगरपालिकेच्या सक्त आदेशानंतर नळदुर्ग शहरात मोकाट फिरणाऱ्या वराह (डुकरां)ना पकडण्याची मोहीम सुरू झाली असून, शनिवारी (१८ जुलै) मोठ्या संख्येने डुकरे पकडून शहराबाहेर हलविण्यात आली. ही मोहीम सातत्याने राबविल्यास नळदुर्ग शहर लवकरच डुक्करमुक्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शहरात डुकरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांना अस्वच्छता, दुर्गंधी आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होत होत्या.

याबाबत नागरिकांनी नगरपालिकेकडे वारंवार तक्रारी केल्यानंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेत कारवाई सुरू केली.



नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, भाजप गटनेते दत्तात्रय दासकर, पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव, बांधकाम समितीचे सभापती शशिकांत पुदाले, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर तसेच नगरसेवकांनी डुक्कर पालन करणाऱ्यांची बैठक घेऊन शहरातील सर्व डुकरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

याबाबत संबंधितांना एक महिन्याची मुदत देत नोटिसाही बजावण्यात आल्या होत्या.

या आदेशानंतर १८ जुलैपासून वराह पालकांनी शहरातील मोकाट डुकरे पकडण्यास सुरुवात केली. पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने डुकरे पकडून शहराबाहेर हलविण्यात आली. ही मोहीम नियमितपणे सुरू राहिल्यास शहरातील मोकाट डुकरांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, नगरपालिकेने हाती घेतलेल्या या कारवाईचे नळदुर्गकर नागरिकांनी स्वागत केले असून, ही मोहीम सातत्याने राबविण्याची मागणीही केली आहे.

# वारकऱ्यांसाठी मोफत दाढी-केस कटींग सेवा

## दहिफळच्या बालाजी गोरे यांचा प्रेरणादायी उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१८ जुलै -**
आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे पायी निघालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी दहिफळ येथील स्मार्ट जेन्टस् पार्लरचे संचालक बालाजी गोरे यांनी अनोखा समाजोपयोगी उपक्रम राबवत सुमारे १२५ वारकऱ्यांची मोफत दाढी व केस कटींग करून सेवाभावाचा आदर्श घालून दिला.

वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात वारीदरम्यान सलग पायी प्रवास



करणाऱ्या वारकऱ्यांची स्वच्छता व नीटनेटकेपणाची गरज लक्षात घेऊन कोणताही मोबदला न घेता ही सेवा देण्यात आली.

मोफत सेवा मिळाल्याने वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करत बालाजी गोरे यांचे मनापासून आभार मानले. व्यवसायासोबत सामाजिक उत्तरदायित्व जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे दहिफळ परिसरासह विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

यावेळी बालाजी गोरे म्हणाले, वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आनंद हीच माझ्या सेवेला मिळालेली खरी पावती आहे. विठ्ठल भक्तांची सेवा करण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य समजतो.

वारकरी संप्रदायातील सेवाभावाची परंपरा जपत बालाजी गोरे यांनी समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# परंड्यात अवैध मद्यसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**
परंड्यात पोलिसांनी शहरातील हॉटेल सह्याद्री, पापपिंपळा रोड परिसरात कारवाई करून अवैध विक्रीसाठी ठेवलेल्या १०,९२० रुपये किमतीच्या देशी-विदेशी मद्याच्या ५३ सीलबंद बाटल्या जप्त केल्या.

या प्रकरणी सुखदेव महादेव तिंबोळे (वय २५, रा. कंडारी, ता. परंडा) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा कलम ६५(ई) अन्वये परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# अखेर वाशी तालुक्यात सर्वदूर पावसाची हजेरी

## कोमेजलेल्या सोयाबीनला मिळाले जीवदान

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१८ जुलै -**
अनेक दिवसांच्या खंडानंतर वाशी तालुक्यात शुक्रवारी (१७ जुलै) हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावल्याने कोमजलेल्या सोयाबीन पिकाला काही प्रमाणात जीवदान मिळाले आहे. त्यामुळे चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये पुन्हा आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.



यंदा सुरुवातीला झालेल्या अपुऱ्या पावसावर शेतकऱ्यांनी सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने पिकांची वाढ खुंटली होती आणि अनेक ठिकाणी सोयाबीन करपू लागले होते. त्यामुळे खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली होती.

शुक्रवारी झालेल्या पावसामुळे काही भागांत शेतात ओलावा निर्माण झाला असून, पिकांची वाढ पुन्हा सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र हा पाऊस तालुक्यात सर्वत्र समान प्रमाणात झालेला नसल्याने परिस्थिती अद्याप पूर्णपणे सुधारलेली नाही.

दरम्यान, विहिरी आणि बोअरवेलच्या पाण्याच्या पातळीतही अपेक्षित वाढ झालेली नसल्याने शेतीसाठी पाण्याची समस्या कायम आहे. त्यामुळे खरीप पिकांना आधार मिळण्यासाठी आगामी काळात दमदार आणि सलग पावसाची आवश्यकता असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. सध्या शेतकऱ्यांचे लक्ष पुढील पावसाकडे लागले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## एमआयडीसी उपकेंद्रातील कामामुळे आज काही भागांचा वीजपुरवठा बंद राहील

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : महापारेषण कंपनीच्या १३२ केव्ही एमआयडीसी उपकेंद्र, लातूर येथे तातडीची दुरुस्ती व देखभाल तसेच ३३ केव्ही मेन बस सेक्शनवरील आवश्यक तांत्रिक कामे करण्यात येणार असल्यामुळे रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.०० ते १०.३० वाजेपर्यंत काही भागांचा वीजपुरवठा बंद राहणार असल्याची माहिती महावितरणने दिली आहे.

या कालावधीत ३३ केव्ही एमआयडीसी, ३३ केव्ही जीआयएस, ३३ केव्ही टीना आणि ३३ केव्ही आर्वी या फिडरवरील वीजपुरवठा बंद राहणार आहे. या दरम्यान ३३ केव्ही मेडिकल-आर्वी फिडरवरील बस साईड जंप बदलणे, टीएफ-२ एलव्ही सीटी ऑईल गळती तपासणी व कलरिंग, त्रैमासिक उपकेंद्र देखभाल तसेच बस आयसोलेटरची दुरुस्ती व देखभाल ही कामे करण्यात येणार आहेत. या कामामुळे खाडगाव रोडचा पश्चिम भाग, पोतदार स्कूल परिसर, दयानंद कॉलेज, बार्शी रोडवरील पाण्याची टाकी परिसर, एक नंबर चौक, चौधरी नगर, प्रकाश नगर, झी माउंट लिटरा, नावंदर सोसायटी, संगीत महाविद्यालय, शिवाजी चौक, साईबाबा मंदिर परिसर, स्वामी समर्थ मंदिर परिसर, पीव्हीआर टॉकीज परिसर, सोना नगर, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जुनी एमआयडीसी, किर्ती गोल्ड, टीना मिल, कळंब रोड, अंबाजोगाई रोड, एसपी कार्यालय परिसर, खोरी गल्ली, कायामखानी पंप, श्याम नगर, विशाल नगर, जुना व नवीन रेणापूर नाका, आंबा हनुमान मंदिर परिसर, पापविनाश रोड, मयूरबन, अजिंक्य नगर, शारदा नगर, इंडिया नगर, दीपज्योत नगर, श्रीनगर, रेल्वे स्टेशन परिसर, भांबरी चौक, मेडिकल कॉलेज, आर्वी, साई रोड, काशीलिंगेश्र्वर, गंगासागर, डी-मार्ट व पद्मावती नगर या परिसरातील वीजपुरवठा बंद राहणार आहे.



## विविध वृत्त....

### शिक्षकांना SIR मधून मुक्त करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : SIR मुळे शाळेची वेळ बदलली असली तरी SIR चं काम वेगाने पूर्ण होतयं का? हे बघावे लागेल . विशेष म्हणजे शिक्षणाधिकारी यांनी पहिला आदेश काढून शाळेची वेळ बदलली असून ती सकाळी७:३० ते१२:३० अशी केली आहे . दुसरा आदेश काढून जे शिक्षक बि.एल ओ . नाहीत, त्यांनी बी.एल ओ . ना मदत करावी . असे आदेशात नमूद केले आहे . पण यात अडचण दिसते की, जे शिक्षक बी.एल ओ नाहीत ते शाळा सुटली की लगेच घरी जातात . आणि जे बी एल ओ चे काम करत आहेत.

### धूर फवारणीची

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : शहरातील लेबर कॉलनी परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पाऊस पडत नसल्याने गटारी तुंबल्या आहेत. रिमझिम पावसामुळे काही ठिकाणी पाण्याचे डबके साचले आहेत. या डबक्यांत डोसोत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आ-है. डासांसोबतच माशांचाही प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे लेबर कॉलनी परिसरात धुर फवारणी करावी, उघड्यावर पडलेला कचरा उचलावा आदी मागण्या नागरिकांनी केल्या.

### तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाचे नीट परीक्षेत यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) च्यावतीने जून २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा निकाल गुरुवारी रात्री जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत येथील तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे.

कुलदीप कैलासराव झोल हा विद्यार्थी ५५६ गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम, प्रमोद ज्ञानोबा बावचे ४६४ द्वितीय तर कुलस्वामिनी कैलासराव झोल ही विद्यार्थिनी ३९७ गुण मिळवत महाविद्यालयात तृतीय आली आहे. यासोबतच अन्य विद्यार्थ्यांनीही या परीक्षेत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. व्ही. व्ही. लोहारे आदींनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# बारावीनंतरच पदवीसोबत यूपीएससी-एमपीएससीची तयारी

## 'एमआयटी-एडीटी'चा अभिनव उपक्रम; प्रशासकीय अधिकारी होण्याचा मार्ग अधिक सुकर




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी), बँकिंग, कर्मचारी निवड आयोग (एसएससी) तसेच अन्य स्पर्धा परीक्षांसाठी दरवर्षी लाखो विद्यार्थी प्रयत्न करतात. मात्र, पदवी पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रपणे स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वेळ आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. ही गरज लक्षात घेऊन एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठाच्या एमआयटी स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसने (एसआयसीएस) बारावीनंतरच पदवी शिक्षणासोबत यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि इतर स्पर्धा परीक्षांची एकात्मिक तयारी करून देणारा बी.ए. (ॲडमिनिस्ट्रेशन) हा अभिनव अभ्यासक्रम सुरू केला आहे, अशी माहिती स्कूलचे प्राध्यापक डॉ. अरूण तुपे यांनी दिली.

याप्रसंगी, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी प्रा.चंद्रकांत बोरुडे, लातूरच्या एमआयटी शैक्षणिक संकुलाचे जनसंपर्क अधिकारी श्रीधर घुले आदी उपस्थित होते.

डॉ. तुपे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेले विषय पदवी शिक्षणासोबतच शिकता यावेत, यासाठी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यासक्रमाचा आराखडा यूपीएससी, एमपीएससी आणि बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत ठेवण्यात आला आहे. त्यामुळे पदवी पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी होण्यास मदत होते.

या अभ्यासक्रमात भारतीय राज्यघटना, सार्वजनिक प्रशासन, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यव्यवस्था, आंतरराष्ट्रीय संबंध व भू-राजकारण, सुशासन, सार्वजनिक धोरण, सार्वजनिक वित्त, भारतीय व जागतिक अर्थव्यवस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण, शाश्र्वत विकास, डिजिटल प्रशासन, कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा प्रशासनावरील प्रभाव, पर्यावरणीय धोरणे, चालू घडामोडी, विश्र्लेषणात्मक विचार, तार्किक क्षमता, संवाद कौशल्य, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, व्यक्तिमत्त्व विकास, उत्तरलेखन आणि मुलाखत कौशल्य यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी एकाच शैक्षणिक चौकटीत करता येणार असून, स्वतंत्र वेळ आणि अतिरिक्त खर्चाची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

स्पर्धा परीक्षांसोबतच विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेवरही या अभ्यासक्रमात भर देण्यात आला आहे. शासन, सार्वजनिक क्षेत्र, बँकिंग, प्रशासन, धोरण विश्र्लेषण तसेच विविध स्पर्धात्मक करिअर क्षेत्रांसाठी आवश्यक कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

एमआयटी एसआयसीएसमध्ये विद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्राध्यापकांचे (प्रोफेसर इन प्रॅक्टिस) मार्गदर्शन, नियमित टेस्ट सिरीज, उत्तरलेखनाचा सराव, मुलाखत प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. पदवी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची नियोजनबद्ध तयारी केल्यास वेळ, खर्च आणि प्रयत्नांची बचत होऊन यशाची शक्यता अधिक वाढते. याच उद्देशाने एमआयटी-एडीटी विद्यापीठाने शिक्षण आणि स्पर्धा परीक्षा तयारीचा प्रभावी संगम घडवून आणणारा हा अभ्यासक्रम विकसित केला असल्याचे प्रा.चंद्रकांत बोरुडे यांनी सांगितले.

## लातूर जिल्ह्यातील ४१४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ जुलै : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये लातूर जिल्ह्यातील मुदत संपलेल्या आणि आगामी काळात मुदत संपणाऱ्या एकूण ४१४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणक प्रणालीद्वारे मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, तसेच सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींसाठी हा निवडणूक मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी कळविले आहे.

या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करताना १५ एप्रिल २०२६ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी वापरण्यात यावी, असे निर्देश निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाले आहेत. या कार्यक्रमानुसार शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. या प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना आपल्या हरकती व सूचना दाखल करण्यासाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ ते बुधवार, २९ जुलै २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. सर्व हरकती व सूचनांचा योग्य विचार करून मंगळवार, ०४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. नागरिकांनी व इच्छुकांनी विहित मुदतीत मतदार यादीची पडताळणी करून घ्यावी आणि आवश्यक असल्यास आपल्या हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## महा राजस्व अभियानाच्या तयारीचा उपविभागीय अधिकाऱ्याकडून आढावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान शिबिर येथे घेतले जाणार आहे. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी रोहिणी नन्हे-विरोळे यांनी दि. १४ जुलै रोजी आढावा बैठक घेतली. त्यात संबंधीत अधिकाऱ्यांना त्यांनी सूचना केल्या. शासनाने २२ जुलै, २५ जुलै व २६ जुलै या तीन दिवसांपैकी एका दिवशी हे शिबिर घ्यावे, असे आदेश दिले आहेत. येथे दि. २२ जुलै रोजी हे शिबिर होण्याची शक्यता आहे. त्यासंदर्भात बैठकीत आढावा घेतला. जनतेला एका छताखाली विविध योजनांचा लाभदेण्यासाठी हे शिबिर आहे.

## आ. अमित देशमुख यांनी घेतली डॉ. राठोड कुटुंबीयांची भेट



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : येथील सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. मेहुल राठोड यांचे नुकतेच अकस्मित निधन झाले आहे. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १७ जुलै रोजी शहरातील बार्शी रोड भागातील एम. जे. हॉस्पीटल या ठिकाणी असलेल्या डॉ. राठोड यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या आई श्रीमती मीनाताई राठोड, पत्नी डॉ. प्रियांका राठोड व राठोड परिवाराची भेट घेतली, त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला.

यावेळी लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललितभाई शाह, ट्वेन्टी-वन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को-ऑपरेटीव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन ॲड. समद पटेल यांच्यासह राठोड कुटुंबीय उपस्थित होते.

## नीट परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : वैद्यकीय प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. वेदांत पाटील या विद्यार्थ्याने नीट परीक्षेत ५९५ गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे शिवम तिवारी या विद्यार्थ्याने ५५५ गुण घेऊन महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे व आयुष गावंड या विद्यार्थ्याने ५४८ गुण घेऊन महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळविला आहे. ५०० पेक्षा अधिक गुण घेणारे १० विद्यार्थी आहेत. प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांने जीवशास्त्र विषयातही उल्लेखनीय कामगिरी

करत सर्वोच्च ३६० पैकी ३५६ गुण मिळवले असून, पाच विद्यार्थ्यांनी जीवशास्त्र विषयात ३५० गुण मिळवले आहेत. महाविद्यालयातून ३९० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यातील ३०४ विद्यार्थी वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

## राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे नीट परीक्षेत यश



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) च्यावतीने जून २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा निकाल गुरुवारी रात्री जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची घवघवीत परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत ९ विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले आहे.

कृष्णा रंगनाथ निरगुडे हा विद्यार्थी ७२० पैकी ६११ गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम, प्रथमेश कैलास नागरगोजे ५५५ द्वितीय, तर सोहम संजय लटपटे हा ५१५ गुण मिळवून तृतीय आला आहे. यासोबतच प्रतिक्षा प्रदीप तोरे हिने ४७६ गुण, प्रिया आदिनाथ राख ४५०, अनुराग अंकुश खरवतेकर ४३८, समरीन वाजिद शेख ४२४, अथर्व लक्ष्मण आडे ३७५, तर विश्र्वजीत विठ्ठल केंद्रे याने ३७० गुण मिळवत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दीपक चवने, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, डॉ. सी. आर. बावीसकर, के. ए. जायेभाये, प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, स्वाती केंद्रे, अश्र्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. ए. व्ही. क्षीरसागर आदींनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## सुदानच्या उच्चस्तरीय कृषी शिष्टमंडळाची पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठाला भेट

### बांबु शेती व बांबु उद्योग, कापूस संशोधन, बियाणे तंत्रज्ञान, ग्रीन हायड्रोजन व कौशल्य शिक्षणात सहकार्याची तयारी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १८ जुलै : सुदानमधील कसला प्रांताचे कृषिमंत्री डॉ. खिदिर रमादान सादिग मोहंमद यांच्या नेतृत्वाखालील उच्चस्तरीय कृषी व व्यापार शिष्टमंडळाने लोदगा (ता. जि. लातूर) येथील पाशा पटेल स्किलटेक विद्यापीठाला भेट देऊन कृषी शिक्षण, कौशल्य विकास आणि भारत-सुदान कृषी सहकार्याच्या विविध संधींवर चर्चा केली.

बैठकीत बांबु शेती व बांबु उद्योग,कापूस संशोधन, बियाणे तंत्रज्ञान, ड्रोन-आधारित शेती, प्रिसिजन ॲग्रिकल्चर, ग्रीन हायड्रोजन, हरित ऊर्जा, बांबू अर्थव्यवस्था, सौर उर्जा पवन ऊर्जा आणि कृषी निर्यात या क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार करण्याबाबत चर्चा झाली. तसेच, सुमारे १०० सुदानी विद्यार्थ्यांना विद्यापीठात कृषी कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण देण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला.

यावेळी कृषिमंत्री डॉ. खिदिर रमादान सादिग मोहंमद यांनी अफ्रीकी-एशियाई ग्रामीण विकास संगठन (--ठऊज) चे महासंचालक यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून या उपक्रमांसाठी --ठऊज च्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. कृषी शिक्षण, क्षमता विकास, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये --ठऊज अंतर्गत येणार्या आशिया आणि आफ्रिकेतील सुमारे ३२ देशांतील विद्यार्थ्यांना लोदगा येथे शिक्षण, संशोधन आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी सक्रिय सहकार्य करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

गेल्या काही वर्षांतील अस्थिरतेनंतर सुदान आपल्या कृषी अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात असून, विशेषतः जगप्रसिद्ध कापूस उत्पादन पुन्हा उभे करण्यासाठी भारतासोबतचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. सुदान आणि महाराष्ट्रातील हवामान तसेच जमिनीच्या प्रकारातील साम्यामुळे हे सहकार्य अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरेल, असा विश्र्वास दोन्ही बाजूंनी व्यक्त करण्यात आली.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्र्यांच्या पर्यावरण व शाश्र्वत विकास कृती दलाचे कार्याध्यक्ष पाशा पटेल यांनी भारत-आफ्रिका कृषी सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे सांगितले. बैठकीस फिनिक्स फाउंडेशनचे समन्वयक डॉ. परवेज पाशा पटेल, राज्याचे चखढठ-संस्थेच्या बांबू विभागाचे प्रमुख तथा माजी महासंचालक श्री. नंदकुमार आणी विद्यापीठाचे पदाधिकारी तसेच दोन्ही देशांतील प्रतिनिधी उपस्थित होते.

## हरंगूळ - हडपसर रेल्वेगाडी कायमस्वरूपी करण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

मुरुड दि. १८ जुलै : हरंगुळ हडपसर ही रेल्वे गाडी मागील दोन वर्षापासून रेल्वे विभागाने प्रायोगिक तत्वावर सुरू केली आहे. ती रेल्वे कायमस्वरुपी ठेवण्यात यावी, अशी मागणी रेल्वे संघर्ष समिती मुरुडच्यावतीने खासदार सुप्रिया सुळे यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदरील रेल्वेस मोठ्या प्रमाणात प्रवाशांचा प्रतिसाद मिळत आहे. सदरील रेल्वे प्रायोगिक तत्वावर असल्याने तिकिटाचे दर ३० टक्के अधिक आहे. या संदर्भात दि ६ जानेवारी २०२६ रोजी खासदार सुप्रिया सुळे यांना रेल्वे संघर्ष समिती, मुरुडच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. निवेदनाच्या अनुषंगाने खासदार सुप्रिया सुळे यांनी सदरील निवेदन ट्विट केले होते. त्यानंतर रेल्वे बोर्डाने खासदार सुळे यांच्या ट्वीटची दखल घेऊन दि १७ मार्च २०२६ रोजी हरंगुळ हडपसर गाडी कायमस्वरूपी करावी असे परिपत्रक काढले.

सदरील परिपत्रक काढून ४ महिने झाले तरी मध्य रेल्वेने सदरील परिपत्रक लागू केलेले नाही. त्यामुळे हरंगुळ हडपसरसह मध्य रेल्वेच्या ८ रेल्वे गाड्या प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहेत. हरंगुळ - हडपसर रेल्वे संदर्भात दि १७ मार्च २०२६ परिपत्रक तात्काळ लागू करावे. यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई या ठिकाणी समितीच्या सदस्यानी भेट घेतली. यासंदर्भात संसदेच्या दि २० जुलै २०२६ रोजी पासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात सदरील विषय मांडू आणि हरंगुळ हडपसर सर्व ८ रेल्वे गाडी कायमस्वरूपी ठेवू असे आश्र्वासन सुप्रिया सुळे यांनी दिले.